# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५१

निर्णय दिनांक १६-०४-२००८

श्री. रविंद्र नामदेव इंगळे, : अपिलार्थी
संपादक, साप्ता सावज सावधान, ७६,
फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर,
धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास),
उत्तर धुळे विभाग, शहादा,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, उत्तर धुळे
उपविभाग शहादा जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक नंदुरबार वनविभाग शहादा जिल्हा नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : उप वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, शहादा जिल्हा नंदुरबार

# <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र नामदेव इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक नंदुरबार वनविभाग शहादा श्री. सुरेश रेता मोरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, शहादा श्री. नागेनाहल्ली रुपेद्रगौडा प्रवीण (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष नारसिंग ए पावरा हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. एन. ए. पावरा वन परिक्षेत्र अधिकारी शिरपूर यांच्यासंदर्भात खालील प्रमाणे एकूण ७ मुद्दाावर माहिती मागितली होती.

" १. शासकीय सेवेत दाखल झाल्याचा दिनांक व धारण केलेले पद.

२. शासकीय सेवेत दाखल होतानांचे वेतनश्रेणी प्रथम महिन्याचे एकूण मासिक वेतन व कपात व निव्वळ वेतन.

३. शासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर महाराष्ट्र मुलकी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चा नियम (स्थावर किंमती मालमत्ता) नियम १ प्रमाणे श्री. एन. ए. पावरा यांनी शासनास सादर केलेल्या विवरण पत्राच्या सत्यप्रती.

४. वर्तणूक नियम १९७९ नियम १९ (३) प्रमाणे शासनास सादर केलेल्या विवरण पत्राच्या प्रती (शासकीय सेवा कालावधीतील).

५. शासकीय सेवा कालावधीत श्री. पावरा यांची शासकीय चौकशी झाली आहे काय ? असल्यास त्याचा तपशील.

६. सध्याची वेतनश्रेणी व एकूण मासिक वेतन व कपात व निव्वळ वेतन याचा तपशील.

७. सेवा पुस्तकाची झेरॉक्स सत्यप्रत. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांचा सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षास अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्याकडील दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अवगत केले. त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास उद्देशून त्यांच्याकडील दिनांक १६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यास अपिलार्थीने विचारलेली माहिती देण्यास सहमती दिली नाही. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागितलेली त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहिती देण्यास नकार दिला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येत नाही. मात्र यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे प्रथम अपील, त्रयस्थ पक्षाने त्यांची

माहिती पुरविण्यास जन माहिती अधिकारी यांना सहमती न दिल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास नकार देवून त्यांचे प्रथम अपील फेटाळून लावले.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपील फेटाळतांना कलम ८ (घ) चा आधार घेतल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायद्यातील तरतुदीविषयी विसंगत निर्णय घेऊन त्यांना माहितीच्या अधिकारापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांना शास्ती लावावी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीची संधी नाकारुन त्यांचे अपील फेटाळले त्यामुळे त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची शासनास शिफारस करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली नाही, लोकसभा अथवा विधानसभेस जी माहिती नाकारली जाऊ शकत नाही ती माहिती देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमात असतांना देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नसल्याने त्यांना या प्रकरणाविषयी काहीही माहिती नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्याच्याकडे तयार असून ते ती माहिती अपिलार्थीस

आता विनामूल्य देण्यास तयार आहेत. माहिती अधिकार अधिनियम अपिलार्थीने अर्ज करण्याच्या सुमारास नुकताच लागू झाला असल्याने त्याच्या अंमलबजावणीसंर्भात त्यांच्याकडील क्षेत्रीय अधिका-यांना फारशी जाण नसल्यामुळे व त्रयस्थ पक्षाने माहिती अपिलार्थीस माहिती देण्यास नकार दिल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०७-२००६ रोजीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक ११-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. त्रयस्थ पक्षाने त्यांची माहिती उघड करण्यास असहमती दर्शविल्यामुळे त्यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती अपिलार्थीस दिली नाही. अपिलार्थीने मागितलेल्या त्रयस्थ पक्षासंबंधातील माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने ७ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती. या ७ मुद्यापैकी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ४ व्दारे त्यांनी त्रयस्थ पक्षाने शासनास सादर केलेल्या विवरण पत्राच्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. सदर विवरणपत्र म्हणजे त्रयस्थ पक्षाची मत्ता व दायित्व यासंबंधीची कागदपत्रे होत. प्रचलित सेवानियमाप्रमाणे प्रत्येक शासकीय कर्मचा-याने या विवरणपत्राव्दारे त्यांच्याकडे असलेल्या सर्व स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती शासनास सादर करावयाची असते त्यामध्ये कर्मचा-यांना त्यांच्या वडिलोपार्जीत मालमत्तेची अथवा त्यांना नातेवाईकांकडून मिळालेल्या कोणत्याही स्वरुपातील मालमत्तेची माहिती द्यावयाची असते. आयोगाच्या मते संबंधीत कर्मचा-याचे विवरणपत्र हे सार्वजनिक माहितीचा विषय होऊ शकत नाही कारण अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उघड करण्याचे ठरविल्यास कलम ८ (त्र) व (ड.) चा भंग होईल. प्रत्येक शासकीय कर्मचा-याने त्यांचे स्वतःचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र

शासनास त्यांचे शासनाबरोबर स्थापीत झालेल्या विश्वासीत संबंधामुळे दिलेले असते. तसेच सदर माहिती उघड केल्याने संबंधीत कर्मचा-याच्या खाजगी बाबी अगंतूक हस्तक्षेप होईल असे आयोगास वाटते. याचबरोबर अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या विवरणपत्रासंबंधीत मागितलेल्या माहितीने फार व्यापक जनहित साध्य होईल असे आयोगास वाटत नाही. त्यांना ही माहिती केवळ स्वतःच्या उपयोगाकरिता हवी आहे. एकूणच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ४ संदर्भातील माहिती अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होणार नाही हे उघड आहे. मात्र अपिलार्थीने मागणी केलेल्या उर्वरीत ५ मुद्यावरील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देणे बाकी आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ५ मध्ये त्यांनी त्रयस्थ पक्षाची शासकीय चौकशी झाली आहे काय, असल्यास त्याचा तपशील अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. सदर चौकशीची प्रक्रिया पूर्ण होऊन त्यावर जर निर्णय झाला असेल तर ती माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिका-यास भाग आहे.

उपरोक्त प्रकरणी त्रयस्थ पक्षाची कोणतीही शासकीय चौकशी झाली नाही किंवा तसे करण्याचे प्रस्तावितही नाही असे आयोगासमोर उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. तेव्हा जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ४ सोडून उर्वरीत ५ ही मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये शासकीय सेवक हे त्रयस्थ पक्ष ठरु शकत नाही अशा अर्थाचे विधान केले आहे. सदर विधान अपिलार्थीने चुकीच्या गृहीतकावर आधारलेले असून प्रत्येक शासकीय

व्यक्ती ही भारताची स्वतंत्र नागरिकही असू शकते ही बाब त्यांनी हे विधान करताना लक्षात घेतली नसावी असे वाटते. प्रत्येक शासकीय कर्मचा-यास देशाच्या इतर स्वतंत्र नागरिकांइतकाच एक स्वतंत्र नागरिक म्हणून जगण्याचा भारतीय घटनेने दिलेला मूलभूत हक्क, त्यांच्यावरील शासकीय सेवा अधिनियमाने प्राप्त होणारी बंधने वगळता आहे हे या प्रकरणी विसरता येणे अथवा त्याकडे दुर्लक्ष करणे शक्य होणार नाही. अधिनियमातील कलम २ (ढ) मध्ये ''त्रयस्थ पक्ष'' या शब्दाची व्याख्या स्पष्ट केली आहे. त्यामध्ये अपिलार्थी व्यतिरिक्त अन्य एखादी (कोणतीही) व्यक्ती असे स्पष्टपणे नमूद केले आहे हे पाहता शासकीय कर्मचारी / अधिकारी हे त्रयस्थ व्यक्ति असू शकत नाहीत हा अपिलार्थीचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ व ४ सोडून उर्वरीत ५ मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र नामदेव इंगळे, संपादक, साप्ता सावज सावधान, ७६, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक नंदुरबार वनविभाग शहादा जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वन विभाग, शहादा जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९४

निर्णय दिनांक १६-०४-२००८

श्रीमती सुनिता केशव कोल्हे, : अपिलार्थी
मु. पो. सावदा (स्वामिनारायण
मंदिराजवळ), तालुका रावेर,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती सुनिता केशव कोल्हे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. दयाराम धोंडू पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण

उपसंचालक, नाशिक विभाग यांचे प्रतिनिधी उप निरिक्षक श्री. लिंबाजी सोनवणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. शंकर काशिराम पवार हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " मी २२-११-९९ ते दोन वर्ष एन. जी. पाटील माध्यमिक विद्यालय उदळी येथे उपशिक्षिका कार्यरत होते. त्या कालावधीमध्ये मा. मुख्याध्यापक यांनी आपणाकडे माझ्या मान्यतेविषयी जो प्रस्ताव पाठविलेला होता त्या प्रस्तावाची साक्षांकीत झेरॉक्स प्रत मिळावी."
>
> वरिल प्रस्तावाला आपण जे उत्तर पाठविलेले असेल त्या उत्तराची झेरॉक्स प्रत मिळावी.
>
> दि. २३-११-९८ ते २०-२-९९ या रजेच्या कालावधीमध्ये मी काम केलेले आहे. त्याविषयी मुख्याध्यापकांनी आपणाकडे पाठविलेल्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत मिळावी.
>
> त्या प्रस्तावाला आपण जे उत्तर दिले असेल उत्तराचे साक्षांकीत झेरॉक्स प्रत मिळावी.
>
> मी (श्रीमती सुनिता केशव कोल्हे) दि. ३-७-०२ धनाजी नाना विद्यालय १०-१०-०२ ह्या काळामध्ये धनाजी नाना विद्यालय रजेवर गेलेल्या शिक्षकांच्या जागेवर उपशिक्षिका म्हणून काम केलेले आहे. विद्यालयाने माझ्या मान्यता विषयी आपणाकडे पाठविलेल्या प्रस्तावाची साक्षांकीत झेरॉक्स प्रत मिळावी आपण ह्या प्रस्तावाला दिलेल्या उत्तराची साक्षांकीत झेरॉक्स प्रत मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक एन. जी. पाटील माध्यमिक विद्यालय उदळी यांना उद्देशून लिहिले आहे व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. सदर पत्र अपिलार्थीस पोहोचल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०८-२००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००६ रोजी यासंदर्भात एक पत्र पाठविले असून त्यांनी (सदर पत्र दिनांक ०५-०८-२००६ रोजी प्रत्यक्षात दिले गेले) या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या अर्जाची प्रत देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्याचे दिसून येते. या पत्राची प्रत देखील त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदर पत्र अपिलार्थीस दिल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचे अपील अर्जावर दिनांक १४-११-२००६ रोजी सुनावणी ठेवल्याचे

कळविले. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलाची सुनावणी ४५ दिवसाच्या आत न केल्याने व मध्यंतरीच्या काळामध्ये व्दितीय अपील केले असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या या सुनावणीस हजर राहण्यास नकार दिला आहे.

मध्यंतरीच्या काळात आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला असून सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले आहे. या पत्राव्दारे त्यांनी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती दोन शाळांशी संबंधित होती. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर त्यांनी मुख्याध्यापक धनाजी नाना विद्यालय खिरोदा व मुख्याध्यापक एन. जी. पाटील माध्यमिक विद्यालय उदळी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याचे त्यांच्याकडील दिनांक १८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले आहे. सदर

माहिती धनाजी नाना विद्यालयाच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. तथापि दुस-या मुख्याध्यापकाने अपिलार्थीच्या नेमणुकीच्या मान्यतेचा प्रस्ताव जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला नव्हता. अपिलार्थीच्या प्रस्तावास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी दिलेले उत्तर अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीस पाठविलेल्या माहिती व्यतिरिक्त अपिलार्थीस अतिरिक्त माहितीची आवश्यक असल्यास ती देण्याची त्यांची तयारी आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये असेही स्पष्ट केले की, शिक्षकांच्या नेमणूकांसंदर्भातील मान्यतेचा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर या प्रस्तावासोबतच त्यांच्या कार्यालयाचा निर्णय संबंधित संस्थेला मूळ प्रस्तावासोबत नेहमी पाठविला जातो त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०१-०८-१००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. सदर अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये (जे प्रत्यक्षतः ०५-०८-२००६ रोजी निर्गमीत केले गेले) जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्याचे सूचित केले होते. तदनंतर त्यांनी दिनांक १४-११-२००६ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थीने नकार दिल्याने प्रत्यक्षतः ती सुनावणी होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने

त्यांच्या दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस अंतीमतः दिनांक ३०-०८-२००६ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहिती अत्यंत सरळ व सोपी आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती दोन शाळेच्या मुख्याध्यापकापाशी उपलब्ध असूनही अपिलार्थीस सदर माहितीपैकी फक्त एकाच मुख्याध्यापकाने (धनाजी नाना विद्यालय यांनी दिल्याचे दिसून येते) दुस-या मुख्याध्यापकाने (एन. जी. पाटील माध्यमिक विद्यालय उदळी) अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. थोडक्यात अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती पूर्णतः प्राप्त होऊ शकली नाही. सुमारे सहा महिन्याच्या विलंबाने अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती देखील अर्धवट स्वरुपात प्राप्त झाली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास त्यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागितलेली माहिती जास्तीत जास्त ३० दिवसामध्ये उपलब्ध व्हावी अशी तरतूद आहे. या तरतुदीचे पालन या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केले नसल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास प्रथम अप्रत्यक्ष प्रतिसाद त्यांच्याकडील दिनांक ०२-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिला होता. हा प्रथम अप्रत्यक्ष प्रतिसाद देखील त्यांनी २२ दिवसाच्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. तदनंतर अपिलार्थीने देखील प्रथम अपील विहित कालावधीपेक्षा ३ महिने इतक्या उशिराने केले. सदर अपिलाच्या सुनावणीची स्थिती जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगाच्या निदर्शनास आणून दिली आहे. येथे देखील जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचा कोणताही अवलंब न करता अधिनियमातील विहित कालावधीचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. अशा त-हेने अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यासाठी अपिलार्थी स्वतः, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे सर्व जबाबदार आहेत असे आयोगाचे मत

आहे.  मात्र अपिलार्थीस मिळालेल्या अर्धवट माहितीबाबत फक्त जन माहिती अधिकारी हे त्यास जबाबदार असल्याचे दिसून येत आहे.  त्यांनी संबंधीत मुख्याध्यापककडे फक्त दोनदाच पाठपुरावा केल्याचे दिसून येते.  जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कारवाई कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.  अपिलार्थीस उर्वरीत माहिती देण्यासंदर्भात त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती पैकी उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक  १६-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती सुनिता केशव कोल्हे, मु. पो. सावदा (स्वामिनारायण मंदिरा जवळ), तालुका रावेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९६

निर्णय दिनांक १६-०४-२००८

श्री. विजय धनाजी चौधरी, : अपिलार्थी
शिवाजीनगर, माणिक मास्तर चौक,
तालुका जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अपर आयुक्त आदिवासी विकास
विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त आदिवासी विकास विभाग,
नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोद जिल्हा नंदुरबार |
| | जन अपिलीय अधिकारी | : | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोद, जिल्हा नंदुरबार |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विजय धनाजी चौधरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा जिल्हा नंदुरबार श्री. उध्दव गोविंद पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोद, जिल्हा नंदुरबार श्री. गुलाबसिंग नरशी वळवी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), सहाय्यक आयुक्त, अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय नाशिक, त्रयस्थ पक्ष श्री. सुहास नारायण पाटील, अनु. प्राथमिक आश्रमशाळा सोनखांब तालुका नवापूर जिल्हा नंदुरबार व त्रयस्थ पक्ष श्री. जगन्नाथ बाबुराव मोरे अनु. प्राथमिक आश्रमशाळा तलावडी तालुका तळोदा जिल्हा नंदुरबार हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. सु. ना. पाटील व श्री. ज. बा. मोरे उप शिक्षक यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. प. खा. भि. से. मंडळ नंदुरबार संचलीत आ. शा. सोनखांब ता. नवापूर येथील उपशिक्षक सु. ना. पाटील व तलावडी येथील उपशिक्षक श्री. मोरे यांच्या पगारास मान्यता दिली असल्यास मान्यता वर्ष व वेतनश्रेणी माहिती.

२. सदर शिक्षकांचे सन १९९९ पासून सेवा खंडीत असून संस्थेने त्यांना नेमणूक आदेश दिलेला नाही, तरी खंडीत कालावधीचा पगारास मंजूरी दिली काय ? दिली असल्यास त्याबाबतचे शासन निर्णय आहेत काय ? असल्यास लेखी माहिती द्यावी.

३. बनावट कागदपत्राव्दारे डी. एड केल्यामुळे व प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्यांच्या पगारास मंजूरी देऊ नये म्हणून २७/४/२००६ पत्रावर आपण काय निर्णय घेतला तो माहिती.

४. प्रकल्प नंदुरबार कडील पत्रावर आपण त्यांची चौकशी केली असल्यास लेखी माहिती. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असून त्यामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने सदर अपील आयुक्त आदिवासी विकास आयुक्त नाशिक यांना उद्देशून केले होते. आदिवासी विकास आयुक्त कार्यालयाने अपिलार्थीचा सदर अर्ज अपर आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या पत्राने पाठविला. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्व्ये अपिलार्थीस त्यांना दिनांक ०४-०९-२००६ रोजी माहिती पुरविल्याचे कळविले व यासोबत संबंधीत २ शिक्षकाच्या मान्यतेच्या आदेशाच्या प्रती अपिलार्थीस पाठविल्या.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य

माहिती आयोगाकडे दिनांक २७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीनंतर ५० दिवसांनी माहिती प्राप्त झाली असल्याचे नमूद करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची, असत्य व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक ०४-०९-२००६ रोजी माहिती प्राप्त झाली. सदर माहिती चुकीची, असत्य व दिशाभूल करणारी आहे. श्री. पाटील व श्री. मोरे हे दोन्ही शिक्षक सेवेत नसतांनाही त्यांना संबंधीत शिक्षण संस्थेमार्फत पगार अदा केला जात होता व त्यांनी वेळोवेळी यासंदर्भात आयुक्त यांच्या निदर्शनास ही बाब आणली होती. प्रकल्प अधिकारी नंदुरबार यांनी अपर आयुक्त कार्यालयास सदर शिक्षक सेवेत नसल्याचे कळवूनही या शिक्षकांच्या पगारास आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून देखील अशा प्रकारचे पत्र आदिवासी विकास आयुक्ताला पाठविले होते. परंतु त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १४-०६-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. पत्रातील माहिती तत्कालीन परिस्थितीनुसार सत्य आहे. श्री. पाटील व श्री. मोरे या २ शिक्षकांना अपर आयुक्त आदिवासी विकास यांच्या कार्यालयाने त्यांच्या दिनांक ३०-०५-२००६ रोजीच्या पत्राने मान्यता दिली व त्याप्रमाणे त्यांचे पगार काढण्यात आले. तथापि यासंदर्भात झालेल्या तक्रारीच्या चौकशीनंतर संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांना त्यांच्या पगारापोटी अदा केलेल्या रक्कमेची वसूली

करण्याचे आदेश आयुक्त आदिवाशी विकास यांनी दिनांक १०-०४-२००८ रोजी दिले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी का घेतली नाही असे विचारले असता यावर त्यांनी कोठलेही उत्तर दिले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १४-०६-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. सदर प्रतिसाद अधिनियमातील तरतुदीपेक्षा ५२ दिवस इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. प्रकल्प अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच श्री. मोरे व श्री. पाटील यांना संबंधीत विभागाने ते सेवेत नसतांनाही त्यांच्या पगारास मंजुरी देऊन शासनाची फसवणूक केली गेली आहे असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने त्यांच्या या माहितीसंदर्भात आदिवासी विकास आयुक्त यांच्याकडे वेळोवेळी अर्ज केले होते. यावर आता आदिवासी विकास आयुक्त यांनी संबंधीत शिक्षकांना अदा केलेले जादा वेतन त्यांच्याकडून वसूल करण्यासंदर्भात दिनांक १०-०४-२००८ रोजी आदेश दिले गेले आहेत. श्री. पाटील यांना जादा पगार दिल्याने त्यांच्याकडून सदर पगाराच्या वसुलीचे आदेश आयुक्त यांनी दिले असून श्री. मोरे यांना कोणतेही वेतन अदा केले गेले नसल्याने त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची वसूली होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक ०४-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या माहितीमध्ये बरीचशी माहिती प्रकल्प अधिकारी नंदूरबार यांच्या स्तरावरील आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची सद्यःस्थिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध असून अपिलार्थीने ज्या

शिक्षकासंदर्भात तक्रार केली होती त्या तक्रारीवर निर्णय झाला आहे. सदर शिक्षकांना दिलेल्या गेलेल्या जादा वेतनाची वसुली त्यांच्याकडून करण्याचे आदेश देखील आदिवासी विकास आयुक्त यांनी दिलेले आहेत हे पाहता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची सद्यःस्थिती जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास माहिती देण्यासाठी लावलेल्या ५२ दिवसाच्या विलंबाबाबत त्यांना राज्य माहिती आयोगार्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळून माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करावी अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधीत प्रकल्प अधिकारी यांच्याकडून उशीरा माहिती प्राप्त झाली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे (५) ५ च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक व कर्मचारी यांना माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक व कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबा संदर्भात आयुक्त आदिवासी विकास यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

संबंधीत प्रकल्प अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त आदिवासी विकास यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत आयुक्त आदिवासी विकास यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

४. संबंधीत प्रकल्प अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर आयुक्त आदिवासी विभाग यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत यथायोग्य

प्रशासकीय कार्यवाही करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक  १६-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजय धनाजी चौधरी, शिवाजीनगर, माणिक मास्तर चौक, तालुका जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोद जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोद, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०५२

निर्णय दिनांक : १६.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. ईश्वर काशीराम शिरसाठ,<br>८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ,<br>देवपूर, धुळे, जि. धुळे | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा सहायक वन संरक्षक मेवासी वनविभाग,<br>तळोदा, जि. नंदूरबार. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपवनसंरक्षक, मेवासी वनविभाग,<br>तळोदा, जि.नंदूरबार. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, मेवासी वन विभाग, तळोदा, जि.नंदूरबार श्री. नामदेव गुमानसिंगम पटले, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, मेवासी,

वन विभाग, तळोदा जि. नंदूरबार श्री.विजय शेळके ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १७.२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वनमजूरांबाबतची १९८९ ते १९९४ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"१) सन १९८९ ते १९९४ पर्यंतच्या कालावधीच्या कायम केलेल्या वनमजुरांना दिलेले, कायम केल्याचे विभागीय आदेश.

२) त्यापूर्वी शासनाचा व वरिष्ठांना विभागाने सादर केलेल्या वॉर्डवाईज हजर दिवसांच्या रो.ह.यो. व नॉर्मलच्या वनमजूरांच्या विभागीय जेष्ठता याद्या.

३) तत्कालीन रो.ह.यो. व नॉर्मलच्या वनमजूरांच्या विभागीय जेष्ठता याद्या.

४) तत्कालीन व त्या लगतच्या कालावधीतील पात्र व अपात्र वनमजुरांच्या याद्या

५) ता. १.११.९४ पासून आतापावेतो सदर प्रत्येक वनमजूरास अदा केलेली वेतने व फरक बीले यांची यादी.

५) सद्यस्थितीतील कायम वनमजुरांची जेष्ठता यादी.

६) वनमजुरांसंबंधीच्या आरोपांबाबतच्या विभागीय चौकशा असल्यास त्यांची कागदपत्रे."

सदर माहिती अपिलार्थीने साक्षांकित स्वरुपात शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ अर्ज श्री. डी.बी.बैसाने, सहायक वन संरक्षक यांचे नावाने केला असल्याने अपिलार्थीचा अर्ज श्री. बैसाने यांना प्राप्त झाला. घैसाने यांचा या प्रकरणाशी, ते जन माहिती अधिकारी या पदावरुन दोन वर्षापूर्वीच बदली झाली असल्याने, काही संबंध नव्हता, म्हणून त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ६.३.२००६ रोजी पाठविला. थोडक्यात

अपिलार्थी यांचा दि. १७.२.२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. ६.३.२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागितलेली माहिती वनक्षेत्रपाल स्तरावरील असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये वनक्षेत्रपाल यांचेकडून मागितली. त्यांचे दि. १७.३.२००६ च्या पत्रास अनुसरुन सर्व वनक्षेत्रपाल यांनी दि. २३.३.२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे पाठविण्याबाबत स्मरणपत्र दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.६.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. अपिलार्थीने सदर अपिल अर्ज स्पीड पोस्टद्वारे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे पाठविला होता तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपिल त्यांचे कार्यालयात प्राप्त झाले नसल्याचे आयोगास आज सुनावणीमध्ये त्यांच्याकडील दि. २९.४.२००६ रोजीचे पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुं. ३५५/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचविले. तथापि सदर रकमेचा भरणा अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.८.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती अपूर्ण, अर्धवट असल्याचे नमुद करुन त्यांच्या प्रथम अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नसल्याचे आयोगास निदर्शनास आणून दिले. संबंधित जन माहिती

अधिकारी यांनी अर्धवट स्वरुपात माहिती दिली व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेवर दंडनीय कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अचूक स्वरुपात विनामूल्य मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २९.४.२००६ रोजी प्राप्त झालेली माहिती अर्धवट असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ८.५.२००६ व १०.५.२००६ रोजी पत्र लिहिले आहे, तरी आजपर्यंत जन माहिती अधिकारी यांचेकडून अचूक स्वरुपात माहिती प्राप्त झाली नाही. वन विभागाने जे वनमजूर कायम केले त्या ५३ मजूरांची नावे या यादीमध्ये समाविष्ट नाहीत. त्यामुळे त्यांना सदर माहिती अर्धवट व चुकीची वाटते.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या विभागातील ज्या ५३ मजूरांना कायम स्वरुपात सेवेत सामावून घेतले आहे त्या मजूरांच्या हजेरीसंबंधी माहिती  हवी आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या ५३ मजूरांची नावे त्यांनी अपिलार्थीस दि. २९.४.२००६ रोजी दिलेल्या माहितीतील यादीमध्ये समावेश नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना आता तात्काळ पुरविण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. २ विषयी संबंधित माहिती अद्यापही पुरविली नाही. वास्तविकतः अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांचेकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते, असे असतांनाही अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याचे निःसंशयपणे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात त्यांनी माहिती दिली नाही, हे जन माहिती अधिकारी हे स्वतः आयोगासमोर कबूल करीत आहेत, त्यांची ही कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, सचिव (वने) यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याच्या आत करावी व आयोगास अनुपालन अहवाल तद्नंतर एक महिन्याचे आत सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना साक्षांकित स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

२. सचिव (वने) यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत, त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. ईश्वर काशीराम शिरसाठ, से.नि.वनक्षेत्रपाल, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारीजवळ,देवपूर, धुळे, जि. धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, मेवासी वनविभाग,तळोदा, जि. नंदूरबार.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, मेवासी वनविभाग,तळोदा, जि. नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव(वने), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११५२

निर्णय दिनांक : १६.०४.२००८

१ श्री. दुष्यंतकुमार कल्याणकर : अपीलार्थी

द्वारा हरीश चव्हाण,

'योगक्षेम', ३३ भाग्यनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी

तथा अध्यापक,

मिलीनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट,

औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,

तथा संचालक, व्यवस्थापन शास्त्र विभाग,

डॉ. रफीक झकेरीया एज्यूकेशन ट्रस्ट,

मिलीनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट,

औरंगाबाद.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. दुष्यंतकुमार कल्याणकर (त्यांना यापुढे

अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अध्यापक,मिलीनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, औरंगाबाद. श्री. खान मोहम्मद अब्दुल इमरान, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, मिलीनियम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेट, औरंगाबाद डॉ. शेख सलीम ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे आपले वकील श्री.अमोल एम. काकडे, यांचेसह हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ११.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेतील व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमासाठी भरण्यात आलेल्या व्यवस्थापन कोटयातील जागेसंदर्भात शैक्षणिक वर्ष २००० ते २००५ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे एकूण पाच मुद्यांवर मागितली होती.

"१) व्यवस्थापन कोटयातुन भरण्यात आलेल्या (प्रवेश देण्यात आलेल्या) विद्यार्थ्यांची यादी (नाव, पत्ता व डि.टी.ई.) स्कोर सहीत)

२) ज्यांनी प्रवेशासाठी ‘‘नोंदणी’’शुल्क म्हणून २००/-रु. (दोनशे रुपये फक्त) महाविद्यालयात भरले आहेत. परंतु त्यांना व्यवस्थापन कोटयात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांची यादी (नाव, पत्ता व डि.टी.ई.स्कोरसहीत)

३) व्यवस्थापन कोटयात प्रवेश देण्यापूर्वी अथवा विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करण्यासाठी आपण गुणवत्ता यादी जाहीर केली होती काय ? (नोटीस बोर्डावर लावली होती काय ?

४) जाहिर केली "असल्यास" अथवा नोटीस बोर्डावर लावली असल्यास "ती" यादी देण्यात यावी.

५) जर आपण यादी लावली नसेल तर त्याचे कारण काय "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.११.२००७ रोजी प्रथम अपील सादर केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१२.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमुद करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांचेकडून अप्राप्त आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे सहजपणे उपलब्ध असून देखिल ते माहिती देण्यास वारंवार टाळत आहेत. सदर माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेतर्फे त्यांचे ॲडव्होकेट अमोल काकडे यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांनी ज्या संस्थेकडून माहिती मागितली आहे, ती संस्था माहिती अधिकार अधिनियमातील विहित प्राधिकरणाच्या व्याख्येत बसत नाही. कारण अधिनियमातील कलम २ (ज) मधील कोणतीही तरतुद या संस्थेला लागू होत नाही. कारण सदर संस्था ही विनाअनुदानित संस्था आहे. तसेच अपिलार्थी यांनी संस्थेकडे मागणी केलेली माहिती ही असद्हेतूने केली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती दुसऱ्या शासकीय प्राधिकरणाकडून प्राप्त होऊ शकेल (जसे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग औरंगाबाद) त्यामुळे अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात यावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेली माहिती एका विनाअनुदानित शिक्षण संस्थेकडे मागितली आहे. सदर संस्था धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंद झालेली संस्था आहे. धर्मादाय आयुक्त यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती सदृश माहिती या संस्थेकडून प्राप्त होऊ शकते. संस्थेच्या संपूर्ण वित्तीय कारभारावर धर्मादाय आयुक्त यांचे नियंत्रण असते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. त्यामध्ये " 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यमध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल, अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो", असा उल्लेख आहे. या प्रकरणी धर्मादाय आयुक्त हे सार्वजनिक प्राधिकरण आहे तर अपिलार्थी यांनी ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे ही खाजगी संस्था आहे. जर ही माहिती धर्मादाय आयुक्त किंवा शासनाच्या इतर प्राधिकरणास, जसे सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, यांना जर प्राप्त होऊ शकते तर ती अपिलार्थीस प्राप्त होण्यास काही हरकत असल्याचे कारण नाही, असे आयोगाचे मत आहे. कारण सार्वजनिक प्राधिकरणास प्राप्त झालेल्या माहितीस ती माहिती त्यांचेकडे प्राप्त होताच आपोआप सार्वजनिक माहितीचे स्वरुप प्राप्त होत असते.

जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे तर्फे केलेल्या युक्तीवादाचे वेळी सदर संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासन मदत मिळत नसल्यामुळे ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण होऊ शकत नाही, असा युक्तीवाद मांडला आहे. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेतर्फे मांडलेला सदर युक्तीवाद आयोग मान्य करीत नाही. अशा

प्रकारच्या कोणत्याही संस्थेतील प्राध्यापकांच्या नेमणूकीस अंतिमतः तंत्र शिक्षण संचालनालयाची मान्यता घ्यावी लागते. या शिक्षण संस्थेमधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांला संबंधित विद्यापिठाची पदवी प्राप्त होते.शिक्षक/प्राध्यापकांच्या नेमणूका करण्याची पध्दत, अभ्यासक्रम या सगळयांची त्यांनी राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्राधिकरणाकडून मान्यता घ्यावी लागते. त्यामुळे जरी शासनाकडून सदर संस्थेला वित्तीय स्वरुपात कोणतीही मदत प्राप्त झाली नाही, तरी सदर संस्थेवर सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नियंत्रण असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ३ व ५ वगळता उर्वरित संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ५ शी संबंधित माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असून माहितीचा अधिकार अधिनियमामधील माहिती या शब्दाशी सुसंगत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त होणे अनुज्ञेय नाही.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ५ वगळता उर्वरित सर्व माहिती, त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.दुष्यंतकुमार कल्याणकर, द्वारा हरीश चव्हाण, 'योगक्षेम', ३३ भाग्यनगर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यापक,मिलीनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक,मिलीनियम इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६८

निर्णय दिनांक १७-०४-२००८

श्री. मोहन काळुराम यादव, : अपिलार्थी
यादव कॉम्प्लेक्स, नवा मोंढा,
व्ही. आय. पी. रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

२ जन माहिती अधिकारी
तथा लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, कंधार

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण
विभाग, नांदेड

### निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहन काळुराम यादव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा लागवड

अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग श्री. मोईनोद्दीन खाजा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग श्री. अनिल तुकाराम थोरात (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००६-२००७ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत रोजगार हमी योजनेसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" कामाची अंदाजपत्रकीय रक्कम व त्यावर कामा केलेल्या मजुराचे हजेरी पत्रकाची झेरॉक्स प्रत मिळणेसंबंधी. रोजगार हमी योजना अंतर्गत २००६-२००७ वनीकरणाची कामे घेण्यात आली असून ती माहिती मा. उपसंचालक आ. वि. नांदेड यांनी पुरविली आहे. उर्वरीत नांदेड अर्धापूर मुदखेड कंधार आणि लोहा या तालुक्यात पहिल्या वर्षी व दुस-या वर्षीची कामे करण्यात आली असून सदरील माहितीची अभ्यासाकरिता आवश्यकता आहे. "

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी कामांची नांवे व अंदाजित रक्कमेसदर्भात अपिलार्थीस माहिती कळविली. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील रोहयो कामे व मजुरांच्या मजुरीच्या झेरॉक्स प्रती अपिलाथर्ीस त्यांनी पुरविल्या नसल्याचे दिसून येते. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०३-२००७ रोजी खाजगी करिअर संस्थेमार्फत पाठविले होते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने व त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे आपले म्हणणे लेखी पत्राने न मांडल्यामुळे अपिलार्थीचे अपील अर्जाची सुनावणी होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिी दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज अधिनियमाव्दारे निश्चीत केलेल्या प्रपत्रात केला नव्हता. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या रोहयो कामावरील मजुरांच्या मस्टरच्या प्रती उपसंचालक सामाजिक वनीकरण यांच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. तसेच अपिलार्थीने त्यांच्याकडील

माहिती मागवितांना केलेल्या अर्जावर कोणत्याही प्रकारचे कोर्ट फीस स्टॅम्प डकविलेले नाहीत. अपिलार्थीस दिनांक २६-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे पत्र त्यांनी रजिस्टर पोस्टाने पाठविले होते. तथापि सदर पत्र स्विकृत करण्यास अपिलार्थीने नकार दिल्याने सदर रजिस्टर पत्र त्यांच्या कार्यालयास विनातामीली परत प्राप्त झाले. परिणामी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्याच्या दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या आदेशान्वये निकाली काढले. सदर बाब अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील दिनांक २७-०४-२००७ व दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणण्यात आली आहे. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करावे अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये शेवटी आयोगाकडे विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने विहित नमुन्यात अर्ज न करता देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविली आहे. या माहितीवर अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील वर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक २७-०४-२००७ रोजी पारीत केले आहेत. त्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी प्रथमतः असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या अर्जाव्दारे माहितीची मागणी केली आहे तो अर्ज अधिनियमाव्दारे विहित केलेल्या नमुन्यात नाही. एवढेच नव्हे तर या अर्जावर अपिलार्थीने दहा रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प देखील चिटकविले नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध नसलेली माहिती उपसंचालक सामाजिक

वनीकरण यांच्या कार्यालयाकडून घेण्याचे सूचित केले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खाजगी कुरिअर सर्व्हिस मार्फत पाठविले होते व त्याचा पुरावा म्हणून त्यांनी वेस्ट इंडिया कुरिअर सर्व्हिस या कुरिअर सर्व्हिसच्या दिनांक १०-०३-२००७ रोजीच्या १६७९५ या क्रमांकाच्या पावतीची सत्यप्रतही सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे माहिती पाठविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जर मूळ अर्ज अधिनियमाव्दारे विहित केलेल्या प्रपत्रात केला असता तर सदर माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हवी आहे किंवा पोस्टाव्दारे हवी आहे याचा खुलासा त्यांच्या प्रथम अर्जात करता आला असता. परंतु अशा कोणत्याही तपशीलाअभावी त्यांनी अपिलार्थीस खाजगी कुरिअर मार्फत माहिती देणे पसंत केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी बोलाविले असता व सदर पत्र रजिस्टर पोस्टाव्दारे अपिलार्थीस पाठविले असता अपिलार्थी हे घरी उपस्थित नसल्याने या पत्राची अपिलार्थीस तामीली होऊ शकली नाही. अपिलार्थीने ज्या माहिती अधिका-याकडे माहिती मागविली आहे ते व उपसंचालक सामाजिक वनीकरण हे एकाच प्राधिकरणाचे २ भाग असल्यामुळे येथे अपिलार्थीने प्रथमतः ज्या जन माहिती अधिकारी कडे माहिती मागविली आहे त्यांनीच अपिलार्थीस सदर माहिती उपसंचालक सामाजिक वनीकरण यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन त्यानंतर देणे योग्य होईल. अपिलार्थीने मुळात केलेला माहितीसाठीचा प्रथम अर्ज हा अधिनियमाव्दारे विहित केलेल्या प्रपत्रात भरला नाही किंवा या प्रपत्रामध्ये आवश्यक तपशील दिला नाही तसेच त्यांच्या मूळ अर्जावर त्यांनी दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प डकविले नाही त्यामुळे अपिलार्थीच्या या प्रथम अर्जाच्या वैधतेबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. अपिलार्थीने मुळात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली

नसल्याने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घेणे भाग राहील. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, अधिनियमाव्दारे विहित केलेले शुल्क आकारुन हे आदेश निर्गमीत होताच व अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यानंतर अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये त्यांना पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती संदर्भात आवश्यक शुल्क कळविताना माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रती पृष्ठ दर अधिक पोस्टेज खर्च हा तपशील त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत कळवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती संदर्भात माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रती पृष्ठ दर अधिक पोस्टेज खर्च इत्यादी तपशील कळवून तदनंतर अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्यानंतर, त्यांना अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे माहिती पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १७-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहन काळुराम यादव, यादव कॉम्प्लेक्स, नवा मोंढा, व्ही. आय. पी. रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, कंधार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०६९

निर्णय दिनांक १७-०४-२००८

श्री. एस. एस. जाधव, : अपिलार्थी
पटेलनगर, धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. एस. एस. जाधव हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. निसार अहेमद खान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. पोपटराव विठ्ठलराव बनसोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००६-२००७ या कालावधी मधील शाळेच्या वेळापत्रकासंदर्भात खालील प्रमाणे एकूण ३ मुद्दयावर माहिती मागितली होती.

"१. संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना शासनाचे एकच नियम लागू आहेत सर्व जिल्ह्यातील शाळा सकाळी १०-०० वाजता उघडतात. मग नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना सकाळी ०९-०० (नऊ वाजता) वाजता उघण्याची सक्ती का ? याबाबत शिक्षणाधिका-यांनी लेखी आदेश काढलेत का ? असल्यास आदेशाची प्रत देणे.

२. सकाळी ०९-०० वाजता शाळा उघडल्या जात असल्यामुळे एक तास जादा शिक्षकांना दररोज जादा काम करावे लागते. त्याची भरपाई म्हणून संबंधित शिक्षकांना जादा वेतन (दररोज १ तास महिन्याचे कामाचे दिवस प्रमाणे २५-२६ दिवस /तास) प्रासंगिक रजा, दिपावली सुट्टया/उन्हाळी सुट्टया यामध्ये दिली जाते का ? दिली जात नाही तर का नाही.

३. शालेय समितीने वरील वेळापत्रकाचा निर्णय घेतला असल्यास समिती शासनाच्या नियमाच्या अधीन राहून निर्णय घेत नाही का ? समितीपुढे पुर्नविचारासाठी हा प्रश्न शिक्षणाधिका-याने ठेवला होता का ? '

अपिलार्थीने सदर माहिती साध्या टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील तिनही मुद्दयावर अपिलार्थीस यथास्थिती माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली असल्याचे म्हटले असून आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २१-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले आहे. सदर आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे निर्णय दिला आहे.

' इतर जिल्ह्यामध्ये शाळेचा वेळ काय आहे, शासनाची सूचना काय आहे याबाबत माहिती प्राप्त करुन घेऊन जिल्हा परिषद शिक्षण समितीच्या मान्यतेने वेळ ठरविण्यात येईल व त्या वेळाप्रमाणे शाळा भरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले प्रकरण निकाली काढण्यात येते. '

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपिलामध्ये त्यांनी शिक्षणाधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी २० दिवसानंतरही त्यांना निर्णय दिला नसल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-१२-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्व्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सत्य माहिती कळविली आहे. अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २१-०४-२००७ रोजीच्या निर्णयानंतर शाळेच्या वेळेत आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करुन त्यांनी बदल केला असून शाळेच्या वेळा निश्चितीसंदर्भात शैक्षणिक वर्ष २००७-२००८ याकरिता त्यांनी दिनांक १७-०७-२००७ रोजी आपले आदेश पारीत केले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २१-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले आहेत. त्यांनी घेतलेल्या प्रथम सुनावणीमध्ये अपिलार्थीने शाळेच्या वेळासंदर्भात इतर जिल्ह्यात काय परिस्थिती आहे हा नवीन मुद्दा उपस्थित केला आहे. यावर इतर जिल्ह्याकडून माहिती घेऊन नांदेड जिल्हा परिषदेमार्फत अंतीमतः कारवाई करण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती बरोबर आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी प्रथमतः असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती मुळात प्रश्नार्थक स्वरुपात आहे. जी “माहिती” या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने मागितलेली

बहुतांश माहिती शाळेच्या वेळासंदर्भात असून याविषयावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे अपिलार्थीस माहिती देण्याचे वेळेपर्यत कोणतेही आदेश पारीत केले गेले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना त्यावेळच्या स्थितीनुसार माहिती दिल्याचे दिसून येते. मुळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ मध्ये ०९-०० वाजता शाळा सुरु करण्याबाबत आदेश काढलेले नाहीत असे स्पष्ट केलेले आहे व त्याचबरोबर यासंदर्भात शासनाचेही कोणतेच निर्देश नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस याच पत्रामध्ये कळविले आहे. अपिलार्थीने शाळेच्या वेळासंदर्भात इतर जिल्ह्यातील शाळेच्या वेळासंदर्भातील मुद्दा प्रथमतः अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००७ च्या सुनावणीमध्ये उपस्थित केला. अपिलार्थीने दिनांक २१-०४-२००७ रोजीच्या सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या या अतिरिक्त मुद्दयास अनुसरुन जिल्हा परिषद नांदेड यांनी नंतर आवश्यक ती कारवाई करुन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १७-०७-२००७ रोजी पारीत केले आहेत. अर्थात या आदेशाचा व अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा अर्थाअर्थी संबंध आता पोहोचत नाही कारण अपिलार्थीने २००६-२००७ या कालावधीतील माहिती मागविली होती. या कालावधीमध्ये जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातर्फे कोणतेही परिपत्रक वा सूचना जारी केलेल्या नव्हत्या व तसे अपिलार्थीस कळविण्यात देखील आले होते. अपिलार्थीने सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या त्यांच्या मुद्दयावर जिल्हा परिषद नांदेड यांनी यथायोग्य कारवाई करुन शाळेच्या वेळासंदर्भातील आपले नवीन आदेश दिनांक १७-०७-२००७ रोजी पारीत केले आहेत. सदर आदेश अपिलार्थीने ज्या कालावधीतील माहिती मागविली आहे त्या कालावधीमध्ये अस्तित्वात नव्हते म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकीची ठरत नाही. या संपूर्ण

घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी २० दिवसानंतरही निर्णय दिला नसल्याचे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात नमूद केले आहे. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जाची सुनावणी दिनांक २१-०४-२००७ रोजी घेतली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर प्रथम सुनावणी केंव्हा घ्यावी या संबंधी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये स्पष्ट विवेचन केले आहे हे पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या निःसंशयपणे भंग केला आहे असे स्पष्टपणे दिसून येते. सदर सुनावणीस उशीर का लागला असे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता सदर कालावधीमध्ये त्यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता त्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर वेळेत सुनावणी घेता आली नाही असे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले आहे. त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रत्येक अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले निर्णय तात्काळ द्यावेत / पारीत करावेत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूपूरःस्सर माहिती दडवून ठेवल्याचे अथवा त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे किंवा अपिलार्थीस असत्य माहिती पुरविल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून न आल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य व सुसंगत प्रतिसाद दिला गेला असल्याने अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १७-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. एस. एस. जाधव, पटेलनगर, धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७०

निर्णय दिनांक : १७.०४.२००८

१ श्री. विलास गोविंदराव कदम, : अपीलार्थी
शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा,
ता.पूर्णा, जि. परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा तलाठी सजा पूर्णा,
ता.पूर्णा, जि.परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा तहसीलदार, पूर्णा,
जि. परभणी.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. विलास गोविंदराव कदम (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा पूर्णा श्री. दुथडे श्रीरंग महादू, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा यांचे प्रतिनिधी कनिष्ठ लिपीक श्री. अनिल

नागोराव आंबेराव ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणीसाठी स्वतः उपस्थित न राहता, कनिष्ठ लिपीकास, सुनावणीसाठी पाठविले हया बाबीची आयोगाने गांभीर्याने नोंद घेतली असून, यापुढे सुनावणीसाठी त्यांनी स्वतः हजर राहण्याची खबरदारी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०६.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २५.५.२००६ ते ६.१.२००७ पर्यंतच्या कालावधीतील तलाठी सज्जा पूर्णा यांचेकडे स.नं. १९४ च्या दुरुस्तीसंदर्भात केलेल्या अर्जाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) दिनांक २५/०५/२००६ आदेश क्रमांक ७३७ संदर्भात आपण अद्याप काही कार्यवाही केली काय? असल्यास काय ?नसल्यास कार्यवाही न करण्याचे कारण काय?

२) माझा दिनांक २६/११/२००६ च्या अर्जावर काहि कार्यवाही केली का? असल्यास काय? नसल्यास न करण्याचे कारण काय?"

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या मुद्दा क्र. १ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे व सदर माहिती अपिलार्थीस दि. १७.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी दि.११.१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार पूर्णा यांचेकडून मार्गदर्शन मागितले.जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय

अधिकारी यांचेकडून दि. ११.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये मागितलेल्या मार्गदर्शनाच्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. २८.२.२००७ रोजी दाखविली. जन माहिती अधिकारी यांच्या या दि. ११.१.२००७ रोजीच्या पत्रावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केली नसल्याचे, त्यांचे कार्यालयीन प्रतिनिधीने आज आयोगासमोर स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३.३.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस या अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस दि. ३.३.२००७ रोजीच्या अपिलासंदर्भात, त्यांचेकडील दि. ३.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. सदर पत्रामध्ये तलाठी सजा पूर्णा यांना क्षेत्रफळ दुरुस्ती करण्याकरता आदेशित करण्यात आले आहे. त्यांचेकडून कार्यवाही होताच आपणास माहिती देण्यात येईल, असे कळवून अपिलार्थीचा अर्ज तूर्त निकाली काढण्यात आल्याचे अपिलार्थीस कळविण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलाथीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.५.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील दाखल केलेले लेखी निवेदन हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, त्यांचेकडील स.नं.१९४ मौजे पूर्णा च्या ७/१२ च्या उताऱ्यामधील क्षेत्रफळ

दुरुस्ती करुन मागितली होती. या प्रकरणी तहसीलदार पूर्णा यांनी त्यांचेकडील दि. २५.४.२००६ रोजीच्या आदेशान्वये क्षेत्रफळ दुरुस्तीचे आदेश दिले होते. तथापि सदर आदेश त्यांना पूर्वीचे तलाठी यांचेकडून हस्तांतरित न झाल्याने, त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कोणतीही कार्यवाही करता आली नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांचे अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती दि. १५.१.२००७ रोजी दिली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्र.२ चे संदर्भातील मूळ दि. २६.११.२००६ रोजीचा अर्ज त्यांचेकडे उपलब्ध नसल्याने याबाबत त्यांनी तहसीलदार,पूर्णा यांचेकडून आवश्यक ते मार्गदर्शन त्यांच्या दि. ११.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये मागितले होते. तथापि तहसीलदार पूर्णा यांचेकडून त्यांनी कोणतेही मार्गदर्शन प्राप्त झाले नसल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या दि. २५.५.२००६ व २६.११.२००६ च्या अर्जातील विषय एकच असून आता त्यावर अंतिम कार्यवाही दि. १९.३.२००८ रोजी झाली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांचेकडे प्रथम अपिल दि. ३.३.२००७ रोजी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून सुनावणी घेतली, सदर सुनावणीमध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांचे विनंतीप्रमाणे क्षेत्रफळ दुरुस्तीचे काम संबंधित तलाठी यांनी करावे, असे तोंडी अवगत केले होते. सदर अपिलाची सुनावणी व आदेश त्यांनी तोंडी स्वरुपात दिले असल्यामुळे त्यांचेकडे त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जावर केलेल्या कार्यवाहीसंदर्भात कोणतेही कागदपत्रे लिखित स्वरुपात उपलब्ध नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचेतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,मूळात अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २५.५.२००६ व २६.११.२००६ रोजी केलेल्या अर्जावर त्यांचेमार्फत झालेली कार्यवाहीबाबतची माहिती जाणून घेण्याचा त्यांना हक्क आहे.तथापि

सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाने मागितलेल्या दोन मुद्यावरील माहितीपैकी फक्त एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीस दिली व दुसऱ्या मुद्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दि. २६.११.२००६ रोजीचा अर्ज त्यांचेकडे उपलब्ध नसल्याने तहसीलदार पूर्णा यांचेकडून मार्गदर्शन मागितले. तहसीलदार पूर्णा यांनी या संदर्भात तलाठी यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यावरुन अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३.३.२००७ रोजी प्रथम अपिल केले.या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी तोंडी सुनावणी घेऊन तोंडी आदेश दिले. असेही त्यांच्या प्रतिनिधीने आज आयोगासमोर स्पष्ट केले. सदर तोंडी सुनावणीची तारीख त्यांच्या प्रतिनिधीच्या लक्षात नाही, असे त्यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर स्पष्ट केले. जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाद्वारे प्राप्त होणाऱ्या अपिलावर कशा प्रकारे निर्णय घेऊ नये याचे उत्तम उदाहरण आयोगासमोर ठेवले आहे. त्यांनी आज सुनावणीस त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री. अनिल आंबेराव या प्रतिनिधीस सुनावणीसाठी आयोगासमोर पाठविले. त्यांच्या या सर्व कृतीमधून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव, माहितीचा अधिकार अधिनियम या विषयाचा अनादर व बेपवाई निश्चितपणे स्पष्ट होत आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर अधिनियमातील तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी यथायोग्य नोंद घ्यावी . अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासंदर्भात असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत फक्त एकाच मुद्यावर माहिती प्राप्त झाली असून दुसऱ्या मुद्यावरील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अद्यापही अप्राप्त आहे. जन माहिती अधिकारी यांच्या वैचारिक क्षमतेच्या मर्यादा पाहता त्यांनी योग्य वेळी तहसीलदार पूर्णा यांचेकडून मार्गदर्शन मागितले होते. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. ६.१.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ ची माहिती

त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. या कामी तहसीलदार पूर्णा यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना संपूर्ण मार्गदर्शन करावे, असे त्यांना आता आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् अपिलार्थीस सुधारित क्षेत्रफळाचा ७/१२ चा उतारा दि. १९.२.२००६ रोजी पुरविल्याचे दिसून येते. तथापि सदर उताऱ्यामध्ये देखिल क्षेत्रफळामध्ये केलेली सुधारणा विसंगतीपूर्ण आहे, असे आयोगाचे निदर्शनास आले आहे.याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येते.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून अशा प्रकारच्या प्रसंगाची त्यांनी इतःपर पुनरावृत्ती करु नये, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ बाबतची माहिती, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.
३. महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी, तहसीलदार पूर्णा यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची व बेपवाईची यथायोग्य नोंद घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रतः

१ श्री. विलास गोविंदराव कदम,शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा,ता.पूर्णा, जि. परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा जि. परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९५

निर्णय दिनांक : १७.०४.२००८

१ श्री. मनोज मारुतीराव कर्डिले, : अपीलार्थी
५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा,
अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा तहसीलदार,पारनेर,
जिल्हा अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपविभागीय अधिकारी,अहमदनगर
जि. अहमदनगर

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, पारनेर, जि.अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार,पारनेर, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मनोज मारुतीराव कर्डिले (त्यांना यापुढे अपिलार्थी

म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर,जि.अहमदनगर श्री. शेटे सतीश भिमाशंकर, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पारनेर,जि.अहमदनगर, श्री.पोपट भिवाजी करारे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०३.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०१.१.२००२ ते ३.१०.२००६ या कालावधीतील तहसीलदार, पारनेर यांनी भालवणी येथे शेतजमिनीसंदर्भात घेतलेले निर्णय व उताऱ्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) दि. २१/११/२००५ इ. खातेदार मा. तहसीलदार पारनेर यांच्याकडील आदेश क्र. २/२००५, पारनेर दि. ११/२००५ वरुन मौजे- भालवणी ता. पारनेर येथील ग.नं.५५८ पैकी ०-०४-७७ आर क्षेत्रात श्री. जगन्नाथ आनंदा रोहकले यांचा कब्जेदार सदरी कोणत्या न्यायालयाच्या निर्णयास आधिन राहुन दिला याची नोंद केली याची माहिती.

२) आपल्याकडे मागील १/१/२००४ ते २८/९/२००६ पर्यंत लोकशाही दिनातुन आपल्याकडे वर्ग झालेले जमिनीबाबतचे अर्ज (निकाली) संबंधी पैकी पारनेर तालुक्यातील भालवणी गावातील अर्ज किती व त्यावर तहसीलदारानी कोणते निर्णय घेतला असेल तर त्याची माहिती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांचेकडील दि. ३०.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, "उपरोक्त विषयाबाबत मागणी केलेली माहिती कुळकायदा शाखेतुन आपण पत्र मिळाल्यापासून ८ दिवसात नकलेची फी भरुन घेऊन जावे- त्यानंतर आपली कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही." सदर पत्र जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे तर जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांचेकडील जावक नोंदवहीची सत्यप्रत आयोगास दाखवू शकले नाहीत. यावरुन अपिलार्थीस त्यांनी हे पत्र खरोखरीच पाठविले किंवा कसे याबाबत संदेह निर्माण होत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १५.११.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचेकडून विहित मुदत संपून गेल्या नंतरही माहिती प्राप्त होऊ शकली नाही, असे त्यांनी नमुद केले आहे. अपिलार्थीने सदर अपिल उपविभागीय अधिकारी, नगर भाग यांचेकडे केली होती, जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी नाहीत. अपिलार्थीच्या दि. १५.११.२००६ रोजीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, "संबंधित तहसीलदार हे अपिलीय अधिकारी असल्याने त्यांना माहिती न मिळाल्यास तहसीलदार यांचेकडे अपील करणे अभिप्रेत आहे व त्यांनी मागणी केलेली माहिती त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत तहसीलदार यांना कळविले आहे. सबब त्यांनी तहसीलदार यांचे कार्यालयाशी या संदर्भात संपर्क साधावा. " या पत्राची प्रत त्यांनी तहसीलदार पारनेर यांना दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे दिसून येते. तहसीलदार पारनेर यांनी उपविभागीय अधिकारी, पारनेर यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रावर कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. थोडक्यात, अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापासून प्रदीर्घ कालावधीकरिता जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून वंचित ठेवले गेल्याचे दिसून येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या पूर्णतः नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) मधील तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.१.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची व त्याचबरोबर त्यांना आता विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे,

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या मूळ अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. या प्रकरणी त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही व्हावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास आज रोजी तयार आहेत. अपिलार्थीस इतके दिवस माहिती न देण्याचे कारण ते आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अपिल करतेवेळी ते जन अपिलीय अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. त्यामुळे या प्रकरणाची त्यांना काहीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत जरी कार्यवाही केलेली असली तरी सदर कार्यवाही चुकीची आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जर त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६(३)(i) अन्वये संबंधित योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठवून देणे व त्याची प्रत अपिलार्थीस देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही व अपिलार्थीस

कूळ कायदा शाखेकडे जाण्याचे सूचित केले. यावरुन त्यांनी आपली जबाबदारी योग्य त्या प्रकारे पार न पाडल्याचे सिध्द होत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांना उपविभागीय अधिकारी, पारनेर यांचेकडून याबाबत पत्र प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ त्यांनी कोणत्याही प्रकारे सकारात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. या बाबींचा एकत्र परिणाम म्हणजे दि. ३.१०.२००६ रोजी अर्ज केलेल्या अपिलार्थीस द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दि. १७.४.२००८ पर्यंत कोणतीही माहिती संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त होऊ शकली नाही.माहिती अधिकार अधिनियम २००५ ची एका सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे वरील कृतीद्वारे एकंदरीत थट्टा केल्याचे या ठिकाणी आयोगास प्रतीत होत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज विहित कालावधीत जबाबदार व योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविला नसल्याचे, या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी निःसंशयपणे जबाबदार असल्याचे आयोगाचे मत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा खुलासा केला की, ते जन माहिती अधिकारी या पदावर अपिलार्थीने अर्ज करतेवेळी कार्यरत नव्हते. जरी या पदावर कोणतीही व्यक्ती कार्यरत असली तरी अपिलार्थी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्त्वात येऊनही, ती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित राहिले हे मात्र नक्की. अपिलार्थीस माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ चा भंग करुन त्याद्वारे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस स्वतःस पात्र ठरविल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे कार्यालयातील इतर अधिकारी/कर्मचारी यांनाही माहिती अधिकारी समजण्यात यावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ५(५) मध्ये तरतुद आहे. हे पाहता, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना या कामी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सदर

माहिती मिळण्यास लागलेल्या विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्याचे आदेशित करण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात माहे मे,२००८ पासून जास्तीत जास्त ५ हप्त्यात करावा.

लेखाशीर्ष :

"००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा- ८०० इतर जमा रक्कम- १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

उपरोक्त शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसांचे आत करावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी हे शासकीय कोषागारात नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील, असे पहावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास जून, २००८ पासून नियमितपणे शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास दरमहा सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना या कामी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी अधिनियमातील तरतुदीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवल्याबद्दल, त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी एकत्रित शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रकमेचा त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत भरणा करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १७.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मनोज मारुतीराव कर्डिले,५६२८, शेरकर गल्ली, सर्जेपुरा,अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, पारनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,पारनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ उपकोषागार अधिकारी,पारनेर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीस्तव.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७५

निर्णय दिनांक २१-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. मदन सागरमल मलारा,<br>९, श्रीराम कॉलनी, साई हॉस्पिटलच्या<br>बाजुला, जुने हेडगेवार दवाखाना रोड,<br>समर्थनगर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सिडको, नवीन औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य प्रशासक (नवीन शहरे),<br>सिडको, नवीन औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | सहाय्यक नियोजनकार सिडको, नवीन औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | मुख्य प्रशासक (नवीन शहरे), सिडको, नवीन औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मदन सागरमल मलारा (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियोजनकार सिडको श्री. निर्मलकुमार वसंतराव गोलखंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासक (नवीन शहरे), सिडको श्री. मनोहर भगत (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नवीन औरंगाबाद येथील सिडको या प्राधिकरणाकडे एन-१, २, ३, ४ या क्षेत्राचे लेआऊट प्लॅन संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " One Xerox copy of each of the layout plan of N-1, N-2, N-4 of Cidco, New Aurangabad. "

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी लेआऊट नकाशापोटी रुपये ३७५, अधिक पोस्टेज खर्च रुपये १० असे एकूण रुपये ३८५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-११-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या मागणीमध्ये किंचित बदल खालील प्रमाणे केल्याचे दिसून येते.

" Please take suitable action & provide the xerox copy of set of layout plan of N-1, N-2, N-4 (the chagres are Rs. 2 /- per Xerox copy <u>in part</u> of layout plan of N-1, N-2, N-4) "

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे उत्तर दिले आहे.

" उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपण दिनांक १३-११-२००६ अन्वये एन-१, एन-२, एन-४ येथील नकाशाची झेरॉक्स कॉपीची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने आपणांस झेरॉक्स कॉपी देण्यात येत आहे. मात्र त्यासाठी रुपये १६ /- बॅकेत चलनाव्दारे भरणा करुन सदरील झेरॉक्स कॉपी घेऊन जावे. "

सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवही आयोगास दाखविली. यावरुन त्यांनी अपिलार्थीस सदर पत्र साध्या पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीचे यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अशा प्रकारचे कोणतेही पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाले नाही. ते सिडको कार्यालयात दिनांक १२-१२-२००६ राजी दुस-या कामानिमित्त गेले असता त्यांनी हे पत्र सिडको कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतले. सदर पत्र प्राप्त होताच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये पावती क्रमांक १८५५५ दिनांक १२-१२-२००६ रोजी अन्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुपये १६ इतके शुल्क भरले व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेतली.

तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक १२-१२-२००६ रोजी प्राप्त झालेली माहिती वाचता येत नसल्याचे व अपूर्ण असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर सुनावणी साठी बोलाविले नसल्याचे नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी शेवटी असेही नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती उशीरा दिल्याबद्दल कोणताही खुलासा अथवा समाधानकारक उत्तर दिलेले नाही.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दिनांक ०८-११-२००६ पर्यत जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक १३-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना प्रथम अपिलासाठी सुनावणीसाठी न बोलाविल्यामुळे त्यांना त्यांचा मुद्दा जन अपिलीय अधिकारी यांना समजावून सांगता आला नाही व परिणामी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ते शुल्क भरुनही न वाचता येणारी माहिती मिळाली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी ३ नकाशाच्या प्रती १६ रुपये इतके शुल्क भरुन प्राप्त करुन घेतल्या. सदर प्रती वाचता येत नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-१०-२००६ रोजी अर्जाच्या उद्देशून त्यांच्याकडील दिनांक ०८-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या पत्रापोटी शुल्क रुपये ३८५ त्यांच्या कार्यालयात भरण्याची विनंती केली होती. तदनंतर अपिलार्थी

दिनांक १३-११-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले होते त्यावेळी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी (ब्ल्यू प्रिंट नकाशे) रुपये ३८५ भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले असता अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा करण्याचे नाकारुन ब्ल्यू प्रिंट नकाशा ऐवजी लहान नकाशे पुरविण्याची मागणी केली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे दिनांक १३-११-२००६ रोजी तयार होती. त्याच दिवशी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यानंतर अपिलार्थीने मागितलेल्या प्रिंटसचा आकार कमी करुन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क रुपये १६ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व तदनंतर दिनांक १२-१२-२००६ रोजी अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरुन सदर माहिती प्राप्त करुन घेतली. त्यांनी दिलेल्या माहितीवर अपिलार्थीने दिनांक ०५-०१-२००७ रोजी परत अपील करुन त्यांना पुरविण्यात आलेली माहिती वाचनीय नाही असे जन माहिती अधिकारी यांना सांगितले. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास अशी वस्तुस्थिती आणून दिली की, अपिलार्थीस सर्व प्रथम त्यांनी वाचनीय असलेल्या ब्ल्यू प्रिंटच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या होत्या. तथापि त्याचे शुल्क ते भरु शकत नसल्यामुळे त्यांना लहान आकाराच्या प्रती कराव्या लागल्या. साहजिकच त्या आकाराने छोट्या प्रती असल्यामुळे वाचनीय नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०८-११-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटी रुपये ३८५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्क भरण्यास अपिलार्थीने नकार दिला व त्यांच्याकडे दिनांक १३-११-२००६

रोजी प्रथम अपील केले. त्या अपिलावर तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेल्या स्वरुपात माहिती देण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ब्ल्यू प्रिंटचा आकार कमी करुन अपिलार्थीचे रुपये १६ इतके शुल्क भरुन घेऊन अपिलार्थीस दिनांक १२-१२-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. सदर ब्ल्यू प्रिंटचा आकार लहान असल्याने त्या अपिलार्थीस वाचता येत नाहीत अशी अपिलार्थीची तक्रार आहे. तथापि अपिलार्थीस वाचनीय ब्ल्यू प्रिंट हव्या असतील तर त्यांना रुपये ३८५ चा भरणा करावा लागेल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. त्यांना औरंगाबाद येथील सिडकोच्या एन-१, २, ३, ४ या क्षेत्राच्या लेआऊट प्लॅअची झेरॉक्स प्रत हवी होती. सदर माहितीची मागणी करतांना अपिलार्थीने नकाशाच्या आकारमानाचा उल्लेख त्यांच्या अर्जात केला नव्हता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद देऊन रुपये ३८५ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस सदर शुल्क मान्य नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अपील अर्जामध्ये ए-४ आकारमानाच्या प्रतीची मागणी केली. यामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मोठ्या आकाराच्या नकाशाचे ए-४ आकारमानाचे आवश्यक तितके तुकडे पाडून त्या प्रत्येक तुकड्यासाठी २ रुपये इतके शुल्क आकारुन माहिती हवी होती. तथापि अपिलार्थीने त्यांचे हे म्हणणे त्यांच्या मूळ अर्जामध्ये अप्रत्यक्ष व प्रत्यक्षपणे नमूद केलेले नाही. अपिलार्थीने त्यांचे सदरचे

म्हणणे प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १३-११-२००६ रोजीच्या अपिल अर्जामध्ये मांडले. सदर म्हणणे त्यांनी पुढील प्रमाणे मांडले – The charges are Rs. 2 /- per Xerox copy in part of of layout plan of N-1, N-2, N-3, & N-4 जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी जर सुनावणी घेतली असती तर कदाचित अपिलार्थीचा हा मुद्दा त्यांच्या त्याचवेळी लक्षात येऊन अपिलार्थीस त्यांच्या पातळीवर आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली असती. तथापि त्यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेल्या आकारमानामध्ये माहिती पुरविण्याचे सूचित केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण लेआऊटच्या ए-४ आकारमानातील प्रत अपिलार्थीस पुरविली. मूळ नकाशा १ : ४००० या परिमाणामध्ये आहे. त्याचे ए-४ साईझमध्ये रुपांतर केल्यास सदर नकाशा वाचनीय होणार नाही हे उघड आहे. सबब आता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नकाशाच्या मूळ प्रती त्यांच्या कार्यालयातील जबाबदार कर्मचा-यामार्फत अपिलार्थीस, त्यांना फक्त झेरॉक्स प्रती काढून देण्यासाठी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्याव्यात. सदर नकाशाच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थी यांनी स्वखर्चाने तदनंतर काढून घ्याव्यात व मूळ प्रती जन माहिती अधिकारी यांना परत कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांच्याकडील नकाशाच्या मूळ प्रती, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जबाबदार कर्मचा-याबरोबर अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्यात. तदनंतर अपिलार्थीने त्या नकाशाच्या झेरॉक्स प्रती स्वखर्चाने तात्काळ काढून घ्याव्यात व मूळ प्रती जन माहिती अधिकारी यांना परत कराव्यात. सदर कारवाई जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी मिळून हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत पूर्ण करावी.

औरंगाबाद
दिनांक २१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मदन सागरमल मलारा, ९, श्रीराम कॉलनी, साई हॉस्पिटलच्या बाजुला, जुने हेडगेवार दवाखाना रोड, समर्थनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियोजनकार सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासक (नवीन शहरे), सिडको, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७९

निर्णय दिनांक २१-०४-२००८

श्री. नारायण रामभाऊ अहिरे, : अपिलार्थी
उंडणगाव तालुका सिल्लोड, जिल्हा
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापिका, सावित्रीबाई फुले
कन्या प्रशाला उंडणगाव तालुका
सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा
परिषद, औरंगाबाद

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा चिटणीस सावित्रीबाई फुले संस्था
उंडणगाव तालुका सिल्लोड जिल्हा
औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण रामभाऊ अहिरे (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सावित्रीबाई फुले कन्या प्रशाला उंडणगाव सौ. अरुणा अरुणराव जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. महंमद अब्दुल खालिक व चिटणीस सावित्रीबाई फुले संस्था उंडणगाव श्री. ओंकार भाऊराव पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सावित्रीबाई फुले कन्या प्रशाला उंडणगाव श्रीमती मिरा र. नाईक हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेशी संबंधीत २०००-२००१ ते २००५-२००६ या कालावधीशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. अनुदानीत ८ वी ते १० वी वर्ग व आपल्यासह सेवा जेष्ठता यादी.

२. अनुदानीत ५ वी ते ७ वी वर्ग व सेवा जेष्ठता यादी.

३. विना अनुदानीत तुकड्या व शिक्षकच रिक्त पदे.

४. टी. सी. फीस पावती पुस्तक यांचा खर्च हिशोब देणे, वरील प्रमाणे देणे. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस चारही मुद्दयावर माहिती पुरविल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २६-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर पोचसही

दिली आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना उद्देशून केले. तथापि त्यावेळी शिक्षण विभागाच्या प्रचलीत परिपत्रकानुसार संबंधीत संस्थेचे सचिव हे जन अपिलीय अधिकारी असल्याने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत शिक्षण संस्थेच्या सचिवाकडे प्रथम अपील करण्यास सूचना दिली. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांच्या दिनांक ०७-०७-२००६ च्या पत्राच्या स्थळप्रतीवर पोच सही दिली आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी सूचित केल्याप्रमाणे तदनंतर अपिलार्थीने सदर शिक्षण संस्थेच्या सचिवाकडे -- जे या प्रकरणी प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी -- म्हणून नेमले गेले होते त्यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये या अपिलासंदर्भात असे कळविले आहे की, " आपण माहिती

अधिकाराच्या अपील पत्रात उल्लेखीत केलेली माहिती ही दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या संदर्भीय पत्राव्दारे देण्यात आलेली आहे व ती माहिती सत्य व योग्यच आहे."

जन अपिलीय अधिकारी यांच्या या संदर्भात दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०५-२००६ रोजी दिलेल्या माहितीची पुनरावृत्ती त्यांनी या पत्रामध्ये केलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ३०-०९-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. तसेच या अपिलासोबत जोडलेल्या पत्रामध्ये त्यांनी या शाळेतील सेवाजेष्ठता यादी संबंधी बरेच आक्षेप नोंदविले असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ करणारे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार शिक्षा किंवा दंड करण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी अशा मुख्याध्यापकासह शिक्षकाच्या वेगवेगळ्या सेवाजेष्ठता याद्या, शाळा विद्यार्थ्यांकडून ट्रान्सफर सर्टिफिकेट देण्यासाठी जी फी आकारली जाते त्याबाबतचा हिशोब हवा आहे. विना अनुदानीत तुकड्या व त्यावर नेमण्यात आलेले शिक्षक यांची माहिती देखील त्यांना त्याचबरोबर आवश्यक आहे.

संबंधीत जन माहिती अधिकारी तत्कालीन मुख्याध्यापिका श्रीमती मीरा नाईक यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे त्यावेळी उपलब्ध असलेल्या शाळेच्या अभिलेख्यातून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थीस दिलेली सदर माहिती ही सत्य आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर शिक्षण संस्थेस यांच्या कार्यालयाने प्रथमतः इयत्ता ८ वी ते १० वी करिता मान्यता दिली होती व तदनंतर ५ वी ते ७ वी या तुकड्या देखील माध्यमिक विद्यालयाशी सलग्न करण्यात आल्या. शाळेतील शिक्षकांना मान्यता देतांना इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी अशा सर्व तुकड्यांना शिकवणा-या / व शिक्षकेतर इतर कर्मचा-यांना मान्यता देण्यात आली नाही. ५ वी ते १० वी या इयत्तेशी संबंधीत संच मान्यता अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व अपिलार्थीने केलेल्या आरोपामध्ये तथ्य नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा संस्थेचे सचिव यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेले आरोप सर्व असत्य असून संस्थेच्या मुख्याध्यापिका विद्यार्थ्यांना ट्रान्सफर सर्टिफिकेट देतांना कोणतेही शुल्क आकारत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुळात मागितलेली माहिती ही चुकीच्या गृहीतकावर आधारीत आहे. अपिलार्थीस या प्रकरणी इयत्ता ५ वी ते ७ वी व इयता ८ वी ते १० वी या अशा दोन इयत्ताच्या संदर्भात शिक्षकांची जेष्ठता यादी हवी होती. येथे असे

दिसून येते की, शाळेची प्रथम मान्यता प्राप्त होतांना इयत्ता ८ वी ते १० वी अशी मान्यता प्राप्त झाली व तदनंतर या शाळेच्या इयत्ता ५ वी ७ वी च्या तुकड्या सलग्न करण्यात आल्या व अशा त-हेने ही ५ वी ते १० वी चे वर्ग असणारी एक शाळा झाली व या शाळेस एकच मुख्याध्यापक आहे. त्यामुळे दोन वेगळ्या सेवाजेष्ठता याद्या असू शकणार नाहीत हे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे म्हणणे आयोग ग्राह्य धरत आहे. अपिलार्थी हे या शाळेतील शिक्षक या पदावर कार्यरत असून त्यांना आपली सेवाजेष्ठता सिध्द करण्याकरिता मुख्याध्यापक या पदावर हक्क सिध्द करण्याकरिता या माहितीची आवश्यकता आहे असे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने यांनी उच्च न्यायालयात दावा देखील दाखल केला असून या दाव्याच्या निकाल अद्याप प्रलंबीत आहे. महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवाशर्ती नियमावली १९८१ व अपिल अधिनियम १९७७ मधील कलम ३ (४) पाहता कोणत्याही कन्या शाळेची मुख्याध्यापक ही स्त्री असणे अनिवार्य आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती पाहता अपिलार्थीच्या सर्व माहितीचा परामर्श त्यांनी या माहितीमध्ये घेतलेला दिसून येतो.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्या विद्यार्थ्यांना ट्रान्सफर सर्टिफिकेट देत असतांना आकारत असलेल्या प्रति विद्यार्थी ५० रुपये इतक्या शुल्काचा हिशोब मागितला आहे. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारचे कोणतेही शुल्क ते विद्यार्थ्यांकडून आकारत नाहीत असे आयोगास शपथपत्रावर लिहून दिले आहे तर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे अशा प्रकारचे शुल्क विद्यार्थ्यांकडून स्विकार करत असतात यासंदर्भात अपिलार्थी यांच्याकडे पुराव्याची मागणी आयोगाने केली असता अपिलार्थी आयोगा-समोर कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. तद्वतच जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००६ रोजी दिलेली माहिती अपिलार्थीने त्याच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे मत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनीही आज आयोगासमोर मांडले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येतो व या प्रकरणामध्ये त्यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांच्या मागणीशी सुसंगत असल्याने अपिलाथीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण रामभाऊ अहिरे, उंडणगाव तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, सावित्रीबाई फुले कन्या प्रशाला उंडणगाव तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा चिटणीस सावित्रीबाई फुले संस्था उंडणगाव तालुका सिल्लोड जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८०

निर्णय दिनांक २१-०४-२००८

श्री. गोरोबा भिमराव गाडे, : अपिलार्थी
मौजे चिंचोली (सं), तालुका निलंगा,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, निलंगा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, निलंगा, जिल्हा लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, निलंगा, जिल्हा लातूर
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, निलंगा, जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोरोबा भिमराव गाडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, निलंगा श्री. आनंदराव केरबा जाजनूरकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,

निलंगा, जिल्हा लातूर श्री. अनिल गोविंदराव माचेवाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे चिंचोली (सं) येथील वस्तीवाडीसाठी संपादीत केलेल्या सर्वे नंतर २७ च्या जमिनीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " दिनांक २२-०५-२००२ ची फाईल क्रमांक ०२/LNQ/१३८/१८८ मौ. चिंचोली (सं) येथील वस्तीवाडीसाठी सन स. नं. २७ ची जमीन संपादन केली आहे. त्याचे बद्दल विनंती अर्ज. ग्रामपंचायत ठराव, नाहरकत ठराव कबाले ज्या लोकांना वाटप झाले त्यांची नांवे इत्यादी साहित्याचा. साक्षांकीत नमुना मिळावा. "

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असून नियमाप्रमाणे फीस त्यांच्या कार्यालयात जमा करुन सदर महिती घेऊन जाण्याचे त्यांना सूचित केले. तदनंतर परत अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात त्यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून त्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांना दिनांक ०२-०१-२००७ रोजी दिली असल्याचे नमूद करुन अपिलार्थीने मागितलेल्या ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याबाबत अपिलार्थीस कळवून त्यांचा मूळ अर्ज निकाली काढला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांचा दिनांक २७-११-२००० च्या अर्ज का नाकारण्यात आला त्याची माहिती विचारली आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी यासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आपला निर्णय खालील प्रमाणे कळविला आहे.

' आपण अर्जामध्ये मागणी केल्याप्रमाणे आपणास माहिती देवून सुध्दा माहिती अर्धवट मिळाल्याबाबत प्रश्नार्थक व तक्रारी स्वरुपाचा अपील अर्ज दि. ०१-०२-२००७ रोजी या कार्यालयामध्ये दाखल केलेला आहे तो नियमास अनुसरुन नसल्यामुळे तो अपील अर्ज फेटाळण्यात येऊन निकाली काढण्यात आला आहे याची नोंद घ्यावी. '

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलातील माहितीची पुनरावृत्ती करुन " आमचा अर्ज का नाकारण्यात आला. माझे मते त्याच्यामागे भ्रष्टाचाराचे स्वरुप आहे " असा त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा विषय असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासाठी त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस नियमानुसार होणारी फी जमा करण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन देखील ते सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील काही माहिती ग्रामपंचायत स्तरावरील होती. सदर माहिती ग्रामपंचायत कार्यालयातील ग्रामसेवकाकडे उपलब्ध असते. या माहितीचा त्यांच्या दैनंदिन व्यवहाराशी कोणताही संबंध येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जामध्ये कोणतीही विशिष्ट अशा प्रकारची मागणी केलेली नव्हती. या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्राय प्राप्त करुन घेवून त्यावर आपला निर्णय दिनांक २०-०२-२००७ रोजी पारीत केला. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ माहितीसाठी केलेल्या अर्जात व राज्य माहिती आयोगाकडे मागणी केलेल्या माहितीच्या व्याप्ती बदलली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांचे विनंती अर्ज, ग्रामपंचायत ठराव, नाहरकत ठराव व ज्या लोकांना कबाले वाटप झाले आहे अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून

मागविली होती.  या ४ मुद्दयाबाबत ३ मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०१-२००७ रोजी पुरविली आहे.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत ग्रामपंचायतच्या ठरावाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याने साहजिकच ते ती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत.  ग्रामपंचायत च्या ठरावाकरिता अपिलार्थीने संबंधीत ग्रामपंचायतीतील माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्याकडे अर्ज करावयास हवा होता.  तथापि अपिलार्थीने सदर अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याचे दिसून येते.  या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २७-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधीत ग्रामपंचायतीच्या जन माहिती अधिका-याकडे पाठविणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) अन्वये अभिप्रेत आहे.  तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई या ठिकाणी केल्याचे दिसून येत नाही. ग्रामपंचायत ठरावाची प्रत न मिळाल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहिती अर्धवट वाटत असल्याचे दिसून येते.  सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, ग्रामपंचायतच्या ठरावची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात येथे असे दिसून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना, नियमा-प्रमाणे होणारी फीस त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले आहे. अधिनियमातील कलम ७ (१) व ३ (**a**) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर कळविणे भाग आहे.  तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कार्यवाही न करुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला

आहे. अधिनियमातील या तरतुदीची नोंद त्यांनी गांभीर्याने घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २१-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोरोबा भिमराव गाडे, मौजे चिंचोली (सं), तालुका निलंगा, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तहसीलदार, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८१

निर्णय दिनांक २२-०४-२००८

श्री. दासराव ज्ञानोबा खरसडे, : अपिलार्थी
मु. पो. तांदुळवाडी तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मंडळ कृषि अधिकारी, कृषि विभाग
अनाळा, तालुका परंडा, जिल्हा
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी परंडा
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दासराव ज्ञानोबा खरसडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कृषि विभाग अनाळा श्री. बाळासाहेब सदाशिव बुद्रुक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका

कृषि अधिकारी परांडा श्री. महादेव किसनराव आसलकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते २००५ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " मौजे मलकापूर ता. परंडा या शिवारात आपल्या खात्यामार्फत सन २००० ते २००५ पर्यत मातीनाला बल्डींगची कामे झालेली आहेत. गट नं. ६२/६२, ९०, १७७, १७७, १३७, १९१, १९२, १६४, २३२, २०५ मध्ये किती नाले झालेले आहेत त्याची संख्येचा तपशील त्यांच्या हाजेरीपटाच्या रजिस्टरची झेरॉक्स प्रती, कुपन झेरॉक्स प्रती व मस्टरची झेरॉक्स हि माहिती मिळण्या बाबत, तसेच तांदुळवाडी ता. परंडा, शेळगाव ता. परंडा येथील सन २००० ते २००५ पर्यत मा. ना. बल्डींग मस्टर नं. ८२९४ व कुपन नं. ९३५००९, ९३५०११, ९३५०१२, ९३५०१३ ९३५०१०, ९३५०१६, ९३५०२१, ९३५०१७, ९३५०२२, ९३५०२७, ९३५०२८, ९३५०१८, ९३५०२४, ९३५०१९, ९३५००६, ९३५००७, ९३५०२०, ९३५०२५, १९१६५६ आणि मस्टर नं. ९४०१ व कुपन नं. ६६०७३२, ६६०७४८, ६६०७४१, ६६०७३८,६६०७३६, ६६०७३०, ६६०७३३, ६६०७४४, ६६०७४२ व मस्टर नं. ६७८८ व कुपन नं. ०९५०३५, ०९५०३२, ०९५०२६, मस्टर क्र. ८१४३ व कुपन नं. १८२०१०, १८२०२२, १८२०२०, १८२०२१, १८२०१४, १८२००९, १८२००८, १८२००५ येथील मातीनाला बांध-कामाचे वर दर्शविलेल्याप्रमाणे कूपन्स झेरॉक्स प्रती व मस्टर झेरॉक्स प्रती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती पुरविण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना सूचना देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना समक्ष भेटीमध्ये माहिती देण्याबाबत टाळाटाळ केली असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आजही त्यांना आवश्यक आहे. त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ब-याच वेळा उपस्थित राहिले. तथापि प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली व त्यांना नाहक खर्चास भाग पाडले. त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमामधील तरतुदी नुसार प्रशासकीय कारवाई व्हावी असे त्यांनी युक्तिवादामध्ये शेवटी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फ असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १७-०३-२००८ पासून कार्यरत आहेत. आयोगाच्या सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती हवी असल्याचे प्रथम कळले. अपिलार्थीने मागितलेली माहिती आता अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्यास ते तयार आहेत. अपिलार्थीने मागितलेल्या कुपन्सच्या झेरॉक्स प्रतीसंदर्भात त्यांनी असे स्पष्ट केले की सदर कुपन्स अंतीमतः तहसील परंडा यांच्या कार्यालयात जमा केले असल्याने अपिलाथीस सदर माहिती तहसीलदार परंडा यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्राप्त झाला. यावर त्यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी प्रथमतः सुनावणी ठेवली होती. तथापि त्या दिवशी संबंधीत जन माहिती अधिकारी गैरहजर असल्याने त्यांनी आपल्या सुनावणीची तारीख २९-०३-२००७ रोजी ठेऊन त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याची त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये (जे जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०-०३-२००७ रोजी पाठविले गेले) सूचना दिली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप फार मोठ्या प्रमाणात होती, माहितीची व्याप्ती जरी मोठ्या प्रमाणात असली तरी सदर माहिती अपिलार्थीस देणे भाग आहे. हे काम जन माहिती अधिकारी याना फारसे अवघड अथवा क्लीष्ट होते असे आयोगास वाटत नाही कारण त्यांना हव्या असलेल्या माहितीमध्ये प्रामुख्याने मस्टर्सच्या झेरॉक्स प्रतीची मागणी जास्त प्रमाणात आहे. अपिलार्थीचा माहितीसाठी

अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करुन अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहितीपोटीचे शुल्क इत्यादी तपशील कळवावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. थोडक्यात अन्य प्रकारे देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सुरुवातीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये आदेश प्राप्त होऊनही संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी आयोगा-समोर केलेल्या युक्तिवादामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, अपिलार्थी त्यांना ज्या ज्या वेळी भेटले त्या त्या वेळी, त्यांना टाळले असल्याचे म्हटले आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयास दिलेला थंड प्रतिसाद पाहता अपिलाथीस माहिती प्राप्त होण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कडून टाळाटाळ केली. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जावर एकदा निर्णय दिल्यावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे याबाबत वरिष्ठ अधिकारी या नात्याने कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा केल्याचे आयोगास आढळून येत नाही. परिणामी कृषि विभागाच्या अधिका-यांच्या अशा प्रकारच्या वर्तनामुळे अपिलार्थी त्यांच्या न्याय्य हक्कापासून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित राहिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अशा प्रकारे अधिनियमातील विहित मुदतीपेक्षा जास्त कालावधीकरिता वंचित ठेवण्यास संबंधीत जन माहिती अधिकारी हे जबाबदार

आहेत अशी आयोगाची खात्री झाली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी हे त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरलेले आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुनही प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवले असल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी उस्मानाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी हे शासकीय कोषागारात शास्तीचा भरणा नियमीतपणे करतील याची खात्री करुन घ्यावी व जून २००८ पासून शास्तीच्या रक्कमेचा भरणा कोषागारात पूर्ण होईपर्यंत आपला अनुपालन अहवाल दरमहा नियमतपणे आयोगास पाठवावा. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील कुपन्सच्या झेरॉक्स प्रती संदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, संबधीत माहिती त्यांनी तहसीलदार परांडा यांच्या कडून उपरोक्त कालावधीमध्ये प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. तहसीलदार

परांडा यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या कामी मंडळ कृषि अधिकारी यांना संपूर्ण सहकार्य करावे. जर या प्रकरणी त्यांनी मंडळ कृषि अधिका-यास आवश्यक ते सहकार्य केले नाही तर त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करणे आयोगास भाग पडेल याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

४. अपिलार्थीस कुपन्सच्या झेरॉक्स देण्यासंदर्भात तहसील परंडा यांनी जन माहिती अधिकारी यांना पूर्ण सहकार्य करावे.

५. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी उस्मानाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी हे शासकीय कोषागारात शास्तीचा भरणा नियमीतपणे करतील

याची खात्री करुन घ्यावी व जून २००८ पासून शास्तीच्या रक्कमेचा भरणा पूर्ण होईपर्यंत आपला अनुपालन अहवाल दरमहा नियमतपणे आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दासराव ज्ञानोबा खरसडे, मु. पो. तांदुळवाडी तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कृषि विभाग अनाळा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी परंडा जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कृषि अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८२

निर्णय दिनांक २२-०४-२००८

श्री. गोडबोले मुरलीधर रामराव, : अपिलार्थी
नवजीवन कोचिंग क्लासेस, मोंढा रोड,
शिवाजीनगर, मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी
अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोडबोले मुरलीधर रामराव, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व त्रयस्थ पक्ष श्री. विरकुमार शिवलींगअप्पा सरसंबे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद श्री. अनिल मोतीराम

शेदारकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९१ ते २००६ या कालावधी-तील निवासी मुकबधीर विद्यालय देगलूरच्या सचिवाच्या कथित भ्रष्टाचाराविषयी त्यांनी केलेल्या दिनांक १०-०७-२००६, २०-०९-२००६ व ०९-१०-२००६ च्या अर्जासंबंधात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कारवाईसंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" माझे आपणास पत्र दि. १०-०७-२००६ माझे आपणास पत्र दि. २०-०९-२००६ माझे आपणास पत्र दि. ०९-१०-२००६ वरील तिन्ही पत्रात मी मुकबधीर विद्यालय देगलूर आणि मतिमंद विद्यालय देगलूरचे सचिव विरकुमार शिवलींगअप्पा सरसंबे यांनी दोन्ही विद्यालयात केलेल्या भ्रष्टाचाराच्या मी सादर केलेल्या पुराव्याची तपास आणि उचित कार्यवाही काय केली ? ही माहिती पुरवण्यासंबंधी. "

अपिलार्थीचे सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीच्या या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दखल न घेतल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०४-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १६-०४-२००७ रोजी पारीत कले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधीत संस्थेकडून माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने मान्य केले आहे व जन माहिती अधिकारी यांना दंड करण्याचे अधिकार त्यांना नसल्याने ती विनंती मान्य केली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी त्यांच्या प्रथम अर्जाची व अपिलाची दखल संबंधितांनी घेतली नसल्याचे नमूद करुन संबंधीतावर नियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या पत्रानुसार मुक बधीर विद्यालय देगलूर व मतिमंद विद्यालय देगलूरचे सचिव विरकुमार शिवलींगअप्पा सरसंबे यांच्या विरुध्द केलेल्या तक्रारीच्या कारवाईच्या अहवालाच्या प्रतीची मागणी केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक १७-११-२००६ रोजीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे संबंधीत कर्मचा-याने सादर न केल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जावर त्यांना कोणतीही कारवाई करता आली नाही. अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००६ रोजी केलेल्या अर्जातील संदर्भीय पत्रे दिनांक १०-०७-२००६, २०-०९-२००६ व ०९-१०-२००६ ही एकाच प्रकारची व

एकाच विषयाशी संबंधीत असून या पत्रामध्ये त्यांनी मुक बधीर विद्यालय देगलूर आणि मतिमंद विद्यालय देगलूरचे सचिव श्री. विरकुमार शिवलींगअप्पा सरसंबे यांनी दोन्ही विद्यालयात केलेल्या भ्रष्टाचारासंबंधीच्या तक्रारी आहेत. अपिलार्थीने केलेल्या या तिनही अर्जावर त्यांनी कारवाई पूर्ण केली असून त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०३-२००७ च्या पत्राने सदर प्रकरणाची परिस्थिती अवगत केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेले दिनांक २६ मार्च २००७ चे पत्र हे अपिलार्थीच्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भातील असल्याचे दिसून येते. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी माहितीच्या अर्जामध्ये संदर्भित केलेल्या पत्राशी संबंधीत असलेल्या सर्व प्रकरणाच्या मार्च २००८ च्या अखेरची सद्यस्थिती देखील कळविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १७-११-२००६ रोजीच्या अर्जाची दखल जन माहिती अधिकारी यांनी मुळात घेतली नव्हती. सदर अर्जाची दखल न घेण्याचे कारण, त्यांच्या कार्यालयातील संबंधीत कर्मचा-याने अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे सादर केला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचा हा युक्तिवाद आयोग फेटाळून लावत असून माहिती अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्या कार्यालयात प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर कारवाई करण्यास ते जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या कार्यालयातील प्रशासन कशा प्रकारे चालवावयाचे हे संबधीत जन माहिती अधिकारी यांनी ठरवावयाचे आहे. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अंतर्गत एखाद्या अर्जदाराने माहिती विचारल्यास संबंधीत कर्मचा-याने संबंधीत अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर न केल्याने या अर्जादारास माहिती देता आली नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे कोणत्याही परिस्थितीमध्ये समर्थनीय ठरु शकत

नाही. अपिलार्थीच्या अर्जाची दखल न घेऊन तो अर्ज प्रदीर्घ कालावधीत विनाउत्तरीत ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००७ रोजी नाहक प्रथम अपील करावे लागले. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील निर्णयामध्ये सदर प्रकरण हे संबंधीत कर्मचा-याची चौकशी करुन कारवाई करण्यासंबधीचे आहे त्यामुळे हे प्रकरण माहितीचा अधिकार कक्षेत मोडत नाही असे आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत हे आयोगास मान्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये माहिती मधून वगळल्या गेलेल्या बाबीसंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८, ११ व २४ मध्ये विवेचन केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही पूर्णपणे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांनी केलेल्या दिनांक १०-०७-२००६, २०-०९-२००६ व ०९-१०-२००६ रोजीच्या अर्जावर काय कारवाई झाली याची माहिती मागविली आहे. या कारवाईची सद्यस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत दिली असती तर पुढे अपिलार्थीवर जन अपिलीय अधिकारी व आयोगाकडे अनुक्रमे प्रथम व व्दितीय अपील करण्यास कोणतेही कारण उरले नसते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन असे दिसून येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २६-०३-२००७ व ३१-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये यथास्थिती अवगत केले आहे. अपिलार्थीने केलेल्या तक्रारीत तथ्य आढळून आल्याने संबंधीत दोषी व्यक्तीवर काही प्रकरणात कारवाई केली आहे तर काही प्रकरणी यासंबंधितावर कारवाई करण्याचे प्रगतीपथावर आहे असे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कारवाई केलेली नाही परंतु अपिलार्थीस त्यांच्या

इतर अर्जासंदर्भाने त्यांनी मागितलेली माहिती पूर्णतः दिली आहे. अपिलार्थीस आता त्यांच्या इतर अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जरी प्राप्त झाली असली तरी त्यांच्या दिनांक १७-११-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेगळ्याने माहिती देणे जरुरीचे होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी अशा प्रकारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर संचालक समाजकल्याण, पुणे यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैली-तील कर्तव्य परायणतेच्या अभावाब्दल त्यांच्यावर संचालक समाजकल्याण, पुणे यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोडबोले मुरलीधर रामराव, नवजीवन कोचिंग क्लासेस, मोंढा रोड, शिवाजीनगर, मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक समाजकल्याण, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८३

निर्णय दिनांक २२-०४-२००८

श्री. उरुज अहमद सिददीकी, : अपिलार्थी
घर नं. ३-९-१-८ वजीर मंजिल,
किराणा चावडी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप आयुक्त (म,), औरंगाबाद
महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, महानगरपालिका,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | प्रभाग अधिकारी (ड) महानगरपालिका, औंरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. उरुज अहमद सिददीकी (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी (ड) महानगरपालिका श्री. रविंद्र प्रभाकरराव निकम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका श्री. खालिद बशीर अहमद अरब (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०३-२००७ ते १२-०३-२००७ या कालावधीतील वजीर मंजिल घर नं. ३-९-१८- संदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" वजीर मंजिल घर क्रमांक ३-९-१८, किराणा चावडी औरंगाबाद दिनांक १२-०३-२००७ सोमवार रोजी वॉर्ड अधिकारी (ड) यांनी आपल्या अधिकारात जप्तीची कारवाई केली होती किंवा विशिष्ट अधिका-याचे आदेश होते याची माहिती लेखी स्वरुपात द्यावी. "

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही.

संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०५-२००७ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १८-०५-२००७ रोजी

पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या आदेशासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०६-२००७ रोजी माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना अर्धवट माहिती मिळाल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवरुन वॉर्ड अधिकारी यांना जप्तीची कारवाई करण्याचे अधिकार आहेत किंवा कसे याबाबत कोणताच अर्थबोध होत नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १८-०५-२००७ रोजी दिलेल्या आदेशामध्ये जप्तीचे आदेश ज्यांच्या आदेशाने काढले गेले आहेत त्याची प्रत अपिलार्थीस पुरविण्यात यावी असे नमूद केले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी जप्तीचा निर्णय ज्या आदेशाव्दारे काढण्यात आला त्या आदेशाची प्रत त्यांना पुरविली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना अर्धवट असल्याचे वाटते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक १५-०३-२००७ रोजीचा मूळ त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या निर्णयाबरोबर प्राप्त झाला. सदर निर्णय प्राप्त होताच त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या

पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचे अपिल त्यांच्याकडे दिनाक ०४-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले. अपिलार्थीच्या या अपील अर्जाची सुनावणी त्यांनी दिनांक १७-०५-२००७ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक १८-०५-२००७ रोजी पारीत केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुलतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहेत. अपिलार्थीने त्यांचा दिनांक १५-०३-२००७ रोजीचा माहितीसाठीच्या अर्ज उप आयुक्त (म.) जे त्यावेळी माहिती अधिकारी म्हणून नेमले होते त्यांच्याकडे केला होता. तथापि त्यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जावर प्रदीर्घ कालावधीत कोणत्याही प्रकारची कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. सध्याचे जन माहिती अधिकारी प्रभाग अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा दिनांक १५-०३-२००७ रोजीचा अर्ज दिनांक १८-०५-२००७ रोजी प्राप्त झाला. एखाद्या अर्जदाराने एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जासंदर्भात माहिती देण्यासाठी कशी टाळाटाळ व उडवाउडव केली जाते त्याचे हे प्रकरण म्हणजे एक उत्तम नमुना ठरेल यात शंका नाही. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांना अद्यापही माहिती अधिकार अधिनियमाचे महत्व पटल्याचे या उदाहरणावरुन दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये माहिती देण्यासंदर्भात दिलेल्या कालमर्यादेत आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी त्यातील तरतुदीनुसार

त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर सत्वर कारवाई करण्याच्या दृष्टीने आपल्या प्रशासकीय संरचनेत काही बदल घडवून आणावेत व कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना त्यांना आवश्यक असलेली माहिती ३० दिवसाच्या आत कशी देता येईल अशा पध्दतीने त्यांनी आपल्या प्रशासनाची संरचना करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न होण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०३-२००७ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत केलेल्या अर्जावर अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कोणतीही कारवाई न करुन आपल्य कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई दर्शविल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आपल्या या कृतीव्दारे त्यांनी आपल्या स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, आयुक्त महानगरपालिका यांनी जन माहिती अधिकारी यांनी या अपील प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्याच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपान अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. सदर माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असूनही जन माहिती अधिकारी यांनी समपर्क उत्तर दिले आहे. अपिलार्थीस जर संबंधीत सक्षम अधिका-याच्या आदेशाची प्रत हवी होती तर त्यांनी त्याप्रमाणे मूळ माहितीसाठी अर्ज करतांना मागणी करावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची मागणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये केल्याचे आयोगास

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.  सदर आदेशाची प्रत देण्यास      जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक १८-०५-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये आदेशीत केले होते.  त्याप्रमाणे सदर आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आता आदेशीत करण्यात येत आहे.  अपिलार्थीस त्यांना निश्चित काय माहिती हवी होती हे स्पष्टपणे मांडता न आल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट माहिती मिळण्यास ते प्रामुख्याने जबाबदार ठरतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या आदेशाची प्रत त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणते च्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक    २२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उरुज अहमद सिददीकी, घर नं. ३-९-१-८ वजीर मंजिल, किराणा चावडी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी (ड) महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८४

निर्णय दिनांक २२-०४-२००८

श्री. कदम आप्पाराव सदाशिव, : अपिलार्थी
मु. बोरखेडा, पो. पाडोळी (आ)
तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय
बोरखेडा पो. पाडोळी (आ),
तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत
समिती, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कदम आप्पाराव सदाशिव हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय बोरखेडा श्री. चव्हाण शहाजी जगन्नाथ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत

समिती श्री. नागरगोजे अर्जून निवृत्ती (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामसभेत ठरलेल्या प्रमाणे झालेल्या कार्यवाहीबाबत, दिनांक २६-०१-२००६ ते १४-०९-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“ १. दिनांक २६-१२-२००६ चे ग्रामसभेमध्ये ठरल्याप्रमाणे (ठराव क्र. ४) गाव १०० टक्के हागणदारीमुक्त करणेसाठी एकूण किती घरात स्वच्छतागृहे बांधली, पैकी किती वापरात आहेत, वापरात नसलेबद्दलची कारणे.

२. गावाचे सभोवती लोक शौचास बसतात मग १०० टक्के गाव हागणदारी मुक्त कसे म्हणता येईल ? नुसते कागदरावरच गाव हागणदारी मुक्त १०० टक्के झाले आहे काय ? ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या सदर अर्जास अधिनियमा-व्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २०-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २२-०२-२००७ रोजी पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून आदेश प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती न पुरविल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही ग्रामसेवकाने त्यांना माहिती दिली नसल्यामुळे त्यांना आयोगाकडे अपील करावे लागले. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधीत ग्रामसेवकास शास्ती लावण्याचे आयोगाने आदेशीत करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही. कारण अपिलार्थी हे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर राहत नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस देऊ केल्याप्रीत्यर्थ काही पुरावा उपलब्ध आहे किंवा कसे असे विचारले असता त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कारवाई केल्याप्रीत्यर्थ त्यांचेकडे कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याचे आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २२-०२-२००७ अंतीम आदेश पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाव्दारे माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण त्यांना विचारले असता त्यांनी पुनश्चः अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती मागविली आहे परंतु ते गावात राहत नसल्याने त्यांना माहिती पाठविता आलेली नाही असे विधान केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या अर्जाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्दयावर माहिती मागविली होती. मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ हा प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचा खुलासा अपेक्षित करणारा असा आहे. जो माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ मध्ये गाव १०० टक्के हागणदारीमुक्त करण्याकरिता एकूण किती घरात स्वच्छतागृहे बांधली आहेत, पैकी किती वापरात आहेत व वापरात नसल्याबाबतची कारणे अशी माहिती विचारलेली आहे. या माहितीमध्ये स्वच्छतागृहे वापरत नसल्याबाबतची कारणे हा मुद्दा देखील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी वर नमूद केल्याप्रमाणे सुसंगत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या गावातील एकूण किती घरात स्वच्छतागृहे बांधली आहे व त्याबाबत किती वापरत आहेत एवढीच माहिती

द्यावयाचे बाकी राहिले होते. तथापि एवढी साधी माहिती देखील अपिलार्थीस पाठविण्याचे सौजन्य संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात दाखविले नसल्याचे दिसून येते. केवळ वादाप्रीत्यर्थ, जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थी सदर पत्त्यावर राहत नाहीत हे म्हणणे जरी ग्राह्य धरले तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एखादे पत्र पाठविले आहे व ते त्यांना विनातामिली परत प्राप्त झाले आहे अशा प्रकारचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केलेला नाही. केवळ अपिलार्थी दिलेल्या पत्त्यावर राहत नाहीत, म्हणून त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळले. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे त्यांचे दिनांक ०५-०७-२००७ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिले पत्र सादर केलेले आहे. सदर पत्राबरोबर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती असून यावरुन असे दिसून येते की, बोधरा या गावामध्ये एकूण ४० घरात स्वच्छतागृहे बांधली असून ती सर्व वापरात आहेत. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा त-हेने दिनांक ०५-०७-२००७ रोजी प्राप्त झाले आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने या पत्राच्या स्थळप्रतीवर सही केल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली एवढी साधी माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून ७ महिने १८ दिवसांचा विलंब लावला गेल्याचे दिसून येते. सदर विलंबाचे कोणत्याही परिस्थितीत समर्थन करता येईल असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थी हे गावात राहत नसल्याप्रीत्यर्थ जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस त्यांना दिलेल्या पत्त्यावर केलेला पत्रव्यवहार पाहता सदर पत्रे जन अपिलीय अधिकारी यांना विनातामीली परत आली असून या पाकिटावर "परत" असा संबंधीत पोस्टमनचा अभिप्राय लिहिलेला दिसून येतो. वर उल्लेखीलेल्याप्रमाणे जरी अपिलार्थी त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर राहत नसले तरीही अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने या

प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही प्रकारे सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास आढळून आले नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००७ रोजी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी दिनांक ०५-०७-२००७ या दिवसाची वाट पहावी लागली. यावरुन जन माहिती अधिकारी हे निष्क्रीय आहेत हे स्पष्ट होते. अपिलार्थीस माहिती देतांना त्यांनी अधिनियमातील कलम ७ प्रमाणे कारवाई करणारे पत्र जर सुरुवातीसच लिहिले असते व ते पत्र त्यांना विनातामीली परत आले असते तर जन माहिती अधिकारी यांचा मुद्दा आयोगास ग्राह्य धरता आला असता. तथापि या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात एखादे साधे पत्र देखील पाठविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशा प्रकारच्या निष्क्रीय प्रतिसादाव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस कोणत्याही टप्प्यावर कोणतीही माहिती न देण्याच्या कृतीमुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरले आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी प्रचलीत सेवानियमापमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०७-२००७ रोजी माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व निष्क्रीयतेबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कदम आप्पाराव सदाशिव, मु. बोरखेडा, पो. पाडोळी (आ) तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय बोरखेडा पो. पाडोळी (आ), तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिशद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७३

निर्णय दिनांक : २२.०४.२००८

१ श्री. सैय्यद मीर सैय्यद फतरु, : अपीलार्थी
रा. कारवाडी ता. जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय
कारवाडी ता.जि.हिंगोली.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिंगोली.
ता.जि.हिंगोली.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सैय्यद मीर सैय्यद फतरु (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कारवाडी ता.जि.हिंगोली श्री. मधुकर माणिकराव देशमुख, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,

पंचायत समिती, हिंगोली जि. हिंगोली श्री. वासुदेव पांडुरंग सोळंके ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचेकडील दि. १४.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे कारवाडी येथील चावडीची जागा व ध्वजारोहणाबाबत खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "१)मौजे कारवाडी ता. जि.हिंगोली येथे चावडीची जागाचे क्षेत्रफळ कीती आहे. त्यावर कोणी अतिक्रमण केले आहे काय ? केले असल्यास कीती क्षेत्रफळ अतिक्रमीत झाले आहे व ते अतिक्रमण कोणी केले. अतिक्रमण केलेल्या व्यक्तीवर कोणती कार्यवाही केली ? कार्यवाही केली नसल्यास का केली नाही या सविस्तर माहिती देण्यात यावी (२) चावडीच्या जागेची नमुना नं. (४) ची नक्कल देण्यात (३) ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोह होते काय ? त्या कार्यक्रमास गावकरी व प्रतिष्ठित नागरीकांना आमंत्रित केल्या जाते काय ? त्याची नोटीस काढल्या जाते काय ? त्या कार्यक्रमाच्या नोटीशीच्या सन १९९५-२००६ पर्यंतच्या सर्व नक्कला देण्यात याव्यात (४) ध्वजारोहणाच्या दिवशी घेण्यात आलेल्या ग्रामसभेच्या विविध ठराव पारित केलेल्या सन १९९५-२००६ पर्यंतच्या सर्व नकला देण्यात याव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २०.०१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

> " वरील विषयी कळविण्यात येते की, ग्राम पंचायत कारवाडी येथील चावडीचा जागा आहे परंतु ग्रा.पं.ला रेकार्ड ला त्याची नोंद नाही त्याच प्रमाणे संबंधित

व्यक्तीस नोटीस देण्यात येत आहे व त्याच प्रमाणे ग्रा. प. कार्यालयात झेंडा वंदन होते करिता माहितीस्तव सादर."

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.०१.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.२.२००७ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना कामाच्या घाईमध्ये अपिलार्थीस माहिती द्यावयाचे राहून गेले वअपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी सोबत आणली असल्याचे नमुद केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सोबत आणलेली माहिती अपिलार्थीस हस्तांतरित करण्याचे आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २.२.२००७ रोजी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळाल्याबद्दल अपिलार्थीने त्यांना पोच दिली असून या संदर्भात काहीही तक्रार नसल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये म्हटले आहे.

अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांचेकडून सुनावणीचे वेळी प्राप्त करुन घेतलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०४.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती लेखी स्वरुपात प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे त्यांच्या प्रथम अपिलावर कोणतीही सुनावणी झाली

नाही. परंतु त्यांचेवर दबाव टाकून त्यांचेकडून सुनावणीपत्रावर सहया घेतल्या आहेत. त्यांना मागितलेल्या माहितीची आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपिल अर्जावर दि. २.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, त्यावेळी अपिलार्थी हे सुनावणी उपस्थित होते, त्यांचे समक्ष जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिलेली आहे. सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी त्यांना पूर्ण माहिती प्राप्त झाली असून आता त्यांची याबाबत काहीही तक्रार नसल्याचे कबूल केले होते. त्यामुळे अपिलार्थी यांचे अपिल त्यांनी निकाली काढले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा दि. १४.१२.२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी एकूण सात दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अत्यंत त्रोटक स्वरुपात व अपिलार्थी यांनी विचारलेल्या मुद्यांशी कोणत्याही प्रकारे सुसंगत नसल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मूळ माहितीशी संबंधित माहिती, मूळाशी उदाहरणार्थ चावडीच्या जागेवरील झालेले अतिक्रमण, ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या नोटीसच्या प्रती, कार्यक्रमासंबंधी केलेल्या ठराव्याच्या प्रतींच्या नकला इत्यादी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे झालेल्या सुनावणीचे वेळी कामाच्या घाईगर्दीत त्यांनी अपिलार्थीस विहिती मुदतीत माहिती देणे शक्य झाले नसल्याचे नमुद केले आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तीवाद आयोग मान्य करीत नाही. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे झालेल्या सुनावणीचे वेळी संपूर्ण

माहिती प्राप्त झाल्याचे व समाधान झाले असल्याचे कबुली देऊनही त्यांनी तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तोंडी माहिती दिली व लिखित स्वरुपात माहिती दिली नाही, अशी भूमिका घेणे या सर्व बाबी परस्पर विसंगत असल्याचे आयोगास दिसून आले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या व्याप्तीचे आकारमान मोठया स्वरुपात आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ७ दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अंशतः अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांना, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सैय्यद मीर सैय्यद फतरु,रा. कारवाडी ता. जि.हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कारवाडी ता.जि.हिंगोली. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली. ता.जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८५

निर्णय दिनांक : २२.०४.२००८

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपीलार्थी
नवीन पाण्याच्या टाकीजवळ, हिंगोली,
जिल्हा हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हदगाव,
जि. नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा तहसीलदार, हदगाव,
जि. नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शेख नईम शेख लाल (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगाव जि. नांदेड श्री. राजाराम किसन गवई, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव जि. नांदेड, श्री.

रंगनाथ किसन मेंडके ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. प्रकाश मोतीराम पिरतवाड हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०४.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. प्रकाश मोतीराम पिरतवाड यांच्या जातीच्या प्रमाणपत्राविषयी खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" श्री. पिरतवाड प्रकाश मोतीराम रा. तामसा ता.हदगाव जि. नांदेड यांच्या जातीच्या प्रमाणपत्रासंबंधी माहिती व कागदपत्रे मिळणेबाबत.

१) श्री. पिरतवाड प्रकाश मोतीराम यांच्या जातीच्या प्रमाणपत्र जा.क्र. ६२३, दि. ३१ मे, १९७४ यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत मिळणेबाबत

२) श्री. पिरतवाड प्रकाश मोतीराम यांनी जातीच्या प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जाची सत्यप्रत मिळणेबाबत.

३) श्री. पिरतवाड प्रकाश मोतीराम यांनी जातीच्या प्रमाणपत्रासोबत सादर केलेल्या शपथपत्रांची व इतर सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळणेबाबत"

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ०५.०३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन सदर माहिती ज्या संचिकेत आहे, त्या संचिकेचा शोध घेण्याचे काम चालू असल्याचे व संचिका प्राप्त होताच माहिती देण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०५.०३.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दि. २३.४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांनी

मागितलेल्या माहितीची संचिका जन माहिती अधिकारी यांच्याकडील अभिलेख शाखेत उपलब्ध होत नसल्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती देणे शक्य होत नसल्याबाबत कळवून अपिलार्थीचा अपिल अर्ज निकाली काढला.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलाथीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०४.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना, त्यांनी श्री. प्रकाश मोतीराम पिरतवाड यांची माहिती मागितल्यामुळे, धमक्या दिल्या व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे नाकारले. त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अप्राप्त आहे. सदर माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.तसेच त्यांनी मूळ अर्जामध्ये उल्लेख केलेल्या पत्राचा जावक क्रमांक व दिनांक श्री. पिरतवाड यांच्या जातीच्या प्रमाणपत्राच्या नकलेवरुन घेतला आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये नमुद केलेले जावक क्रमांकाचे व दिनांकाचे पत्र त्यांचे कार्यालयातील अभिलेख्यांमध्ये आढळून येत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही अभिलेखाच्या "अ" वर्गातील असून ती कागदपत्रे जतन करण्याचा कालावधी कायमस्वरुपी असा आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची संचिका त्यांचे अभिलेख कक्षामध्ये शोधण्याचे काम चालू आहे. त्यांनी पुढे असाही युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांचेकडून श्री. पिरतवाड यांच्या संदर्भिय पत्राची प्रत प्राप्त करुन घेऊन सदर सचिका त्यांचेकडील अभिलेख कक्षामध्ये शोधण्याचे काम ते पुन्हा सुरु करतील व सदर संचिका प्राप्त होताच त्यांचेकडून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती ३३ वर्षांपूर्वीची आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शासकीय अभिलेखातील 'अ' या प्रवर्गातील आहे, त्यामुळे ती कायमस्वरुपी जतन करणे हे संबंधित शासकीय प्राधिकरणाची कर्तव्य आहे. अपिलार्थीने मागितलेली सदर माहिती आढळून येत नाही, हे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याप्रित्यर्थ दिलेले कारण आयोग मान्य करीत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी संचिकेचा पुनःश्च् शोध घेण्याचे आयोगास आश्वासित केले आहे. सबब त्यांना असे आदेशित करण्यात येते की, या संचिकेचा शोध त्यांनी त्यांचे अभिलेख कक्षामध्ये पुन्हा घ्यावा व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जास्तीत जास्त ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. जर ही माहिती उपलब्ध होत नसेल तर सदर अभिलेख गहाळ झाल्याप्रित्यर्थ संबंधितांवर आवश्यक वाटल्यास प्रचलित नियमानुसार यथायोग्य कारवाई करण्याचा त्यांनी विचार करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच जास्तीत जास्त ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख नईम शेख लाल, नवीन पाण्याच्या टाकीजवळ (नई पाणी के टाकी के पास) हिंगोली, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हदगाव जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हदगाव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८७

निर्णय दिनांक २३-०४-२००८

श्री. शिवदास दामोधर शहाणे, : अपिलार्थी
मु. पो. नूतन वसाहत, अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा गृहपाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर
शासकीय मुलांचे वसतीगृह अंबड,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण
अधिकारी, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शिवदास दामोधर शहाणे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा गृहपाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृह श्री. प्रल्हाद रंगनाथ पंडित (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा

समाजकल्याण अधिकारी श्री. प्रकाश भागीनाथ बच्छाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या खात्यातर्फे चालविल्या जाणा-या वसतीगृहासंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> “ पंडित प्रभारी यांनी मुलांच्या वसतीगृहाचा चार्ज घेतल्यापासून गॅस पाणी मुलाच्या वसतीगृहामध्ये संपूर्ण खर्चाच्या पावत्याची झेरॉक्स देण्यात यावी. दर महिन्याला गॅस पावत्याची व पाणी झेरॉक्स देण्यात यावी. शासनाचा पैसा वर्षाचा किती येतो व कोठे कोठे खर्च केला त्याच्या पावती झेरॉक्स देण्यात याव्यात. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षित केली होती. माहितीच्या या अर्जामध्ये ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहे असे नमूद केले असून यासंदर्भातील पुरावा त्यांनी मूळ अर्जासोबत जोडल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या सदर अर्जावर त्यांनी, ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडल्याचे म्हटले आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारचे कोणतेही प्रमाणपत्र न जोडल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार अपिलार्थीने दिनांक २७-०२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले.

तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०२-०७-२००७ रोजी अंतीम सुनावणी घेतली. जन अपिलीय अधिकारी यांच्या मते त्यांनी या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०९-०७-२००७ पूर्वी देण्याचे तोंडी आदेशीत केले. सदर आदेश त्यांनी अपिलार्थीच्या उपस्थित मध्ये दिले असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. त्यांच्या या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांच्या कार्यालयातील टिपणीची प्रत आयोगास सादर केली आहे. या प्रतीवर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी व संबंधीत लिपीक यांच्या सह्या आहेत. या टिपणीवर अपिलार्थी यांची सही नाही. मात्र या टिपणीमध्ये अपिलार्थी हे हजर असल्याचा उल्लेख केलेला आहे. थोडक्यात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ पूर्वी माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना याच सुनावणीमध्ये तोंडी आदेशीत केले असे त्यांचे म्हणणे आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या तोंडी निर्देशानुसार जन माहिती अधिकारी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी पूर्ण माहिती दिली असे त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती मिळाल्याची एका साध्या कागदावर पोच पावतीची झेरॉक्स प्रत दाखविली. सदर प्रत मूळ प्रतीची सत्यप्रत असल्याचे कोणीही साक्षांकीत केलेले नाही. त्याचबरोबर अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी,

अपिलीय अधिकारी व आयोगाकडे केलेल्या अपील अर्जावरील त्यांच्या सह्या व जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलार्थीच्या वर निर्देशीत केलेल्या पत्रावरील पोच सही यामध्ये कमालीचा फरक आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०९-०७-२००७ माहिती दिली हे म्हणणे आयोग फेटाळून लावत आहे.

मध्यंतरीच्या काळात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय दिला गेला नसल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचा उल्लेख केलेला आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे पत्रकार असून ते त्यांच्याकडे वारंवार भेटीसाठी येत असतात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी एक महिन्याच्या आत तयार करुन ठेवली होती व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी ते स्वतः गेले होते. या भेटीमध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती दाखविली असता अपिलार्थीने त्यांना न्यायालयामध्ये सुनावणीच्या वेळी माहिती देण्याचे सूचित केले. प्रत्येक वेळी अपिलार्थी अशाच प्रकारची विचारणा करीत राहिले त्यामुळे त्यांना अपिलार्थीस सदर माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविता आली नाही. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या किती भेटी झाल्या हे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांना आयोगा-

समोर निश्चित तारीख सांगता आली नाही. मात्र अपिलार्थीने त्यांचे दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच्या १५ दिवसाच्या आत या घडामोडी झाल्या. अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी, त्यांना माहिती प्राप्त झाल्यापुष्ट्यर्थ आयोगास सादर केलेल्या कागदातील मजकूर सत्य असून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यासमक्ष त्यांनी ही माहिती पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ०४-०४-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणातील प्रथम सुनावणी दिनांक ०३-०५-२००७ रोजी ठेवली होती तथापि त्यावेळी व तदनंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांपैकी एक जण गैरहजर असल्याने त्यांना अंतीमतः सुनावणी घेण्यासाठी दिनांक ०२-०७-२००७ पर्यंत सुनावणीसाठी मुदतवाढ द्यावी लागली. त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक ०२-०७-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या उपस्थितीत त्यांचा निर्णय जाहिर केला होता. या प्रकरणी त्यांचे असे निरिक्षण आहे की, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती कधीही स्विकृत करत नाहीत त्याचबरोबर अपिलार्थीने स्वतः कळविलेल्या तारखेस सुनावणी ठेवली असता अपिलार्थी सुनावणी-च्या दिवशी हजर रहात नाहीत व येनकेन प्रकारे प्रकरण लांबवीत असतात त्यामुळे अपिलार्थीच्या अपील अर्जावर अंतीम निर्णय घेण्यासाठी त्यांना ३ महिने इतका कालावधी लागला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना देणे फारसे क्लीष्ट अथवा अवघड काम होते असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००७ रोजी दारिद्र्य

रेषेखालील प्रमाणपत्राची सत्य झेरॉक्स प्रत सादर केली त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०२-२००७ रोजी प्राप्त झाला असे गृहीत धरण्यात येत आहे. अपिलार्थीच्या अर्जाची २७-०२-२००७ तारीख वैध धरली तर अपिलार्थीस सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २६-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे गरजेचे आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती टपालाव्दारे अपेक्षित केल्याचे दिसून येते. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः देणे मूळात अभिप्रेत नाही. माहिती व्यक्तिशः देण्याचे मुळात अभिप्रेत नसतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वतः माहिती देण्यासाठी जाण्याचे व त्यांना आपल्या कडील माहिती दाखविण्याचे कोणतेही प्रयोजन होते असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, ते समाजकल्याण विभाग जालना या खात्यातील कनिष्ठ लिपीक या दर्जाचे कर्मचारी असून त्यांच्याकडे या वसतीगृहाचा वार्डन या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे त्यांना फारसे ज्ञान नसल्याचेही त्यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे व अपिलार्थीची त्याकरिता पोच घेण्यात आली होती. अपिलार्थीच्या मूळ कागदावरील सही आणि आयोगाकडे, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडील सही यामध्ये मोठ्या प्रमाणावर फरक असल्यामुळे तसेच या पत्रावर कोणत्याही साक्षीदाराचे नांव अथवा सही नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००७ रोजी माहिती दिली हे त्यांचे म्हणणे आयोग ग्राह्य धरत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यासाठी उशीर लावल्याची कारणे त्यांच्या युक्तिवादात सांगितली आहेत. तथापि

ह्या कारणांना कोणताही आधार नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडील केलेला युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आता अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठवावी व त्याची पोच आपल्या दप्तरी ठेवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य प्रकारे दखल न घेऊन व अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी जालना यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. विशेष समाज कल्याण अधिकारी जालना यांनी, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २३-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिवदास दामोधर शहाणे, मु. पो. नूतन वसाहत, अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा गृहपाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतीगृह अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८८

निर्णय दिनांक २३-०४-२००८

श्रीमती स्वाती शामराव साठे, : अपिलार्थी
रामनगर, काकडे प्लॉट,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा धर्मादाय आयुक्त, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती स्वाती शामराव साठे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय श्री. शेख मुस्तफा गुलाम दस्तगीर (यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय श्री. गोडे भुमेश लक्ष्मीनारायण (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ, उस्मानाबाद या संस्थेसंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ उस्मानाबाद तालुका जिल्हा उस्मानाबाद नोंदणी रजि. नं. महा. २३४/९८/एफ/३७१३-उस्मानाबाद, दिनांक १४-०९-९८ या संस्थेच्या परिशिष्ट "अ" सह या संस्थेच्या घटनेची सत्यप्रत मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या पत्राव्दारे खालील प्रमाणे कळविले आहे.

" उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, परिशिष्ट-१ रजिस्टर वर सदर संस्थेची नोंद नसल्याने सदर नक्कल देता येत नाही. "

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील त्यांनी धर्मादाय आयुक्त लातूर यांना उद्देशून केल्याचे दिसून

येते.  वस्तुतः या प्रकरणी सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद हे अपिलीय अधिकारी असल्याने अपिलार्थीने अपील त्यांच्याकडे करावयास हवे होते, तथापि त्यांनी हे अपील धर्मादाय आयुक्त लातूर यांच्याकडे केले.  लातूर येथे धर्मादाय आयुक्तांचे कार्यालय नसून धर्मादाय सह आयुक्ताचे कार्यालय असून त्या कार्यालयाने अपिलार्थीचे अपील सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद यांच्याकडे पाठविण्याची कोणत्याही प्रकारे तसदी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.  अपिलार्थीच्या या अपील अर्जाचे अवलोकन करता त्यांना श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या परिशिष्ट १ ची सत्यप्रत त्यांच्याकडून अपेक्षित असल्याचे दिसून येते तर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये त्यांनी संस्थेच्या घटनेची प्रत व परिशिष्ट-अ ची प्रत मागितली आहे.  यावरुन अपिलार्थीने आपल्या माहितीची व्याप्ती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना बदलल्याचे दिसून येते.

सदर अपील योग्य त्या प्राधिकरणाकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपील अर्जामध्ये त्यांनी श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ उस्मानाबाद या संस्थेच्या परिशिष्ट-१ च्या सत्यप्रतीची मागणी केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, परिशिष्ट-अ व परिशिष्ट-१ हे एकच असल्याने त्यांनी जन

माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना परिशिष्ट-अ ची मागणी केली तर जन अपिलीय माहिती अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना परिशिष्ट-१ च्या सत्यप्रतीची मागणी केली. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी सदर संस्थेच्या घटनेची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १९-०४-२००७ रोजी व्यक्तिशः प्राप्त झाली आहे. त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदर संस्थेची परिशिष्ट १ वर नोंद नसल्याने परिशिष्ट-१ ची सत्यप्रत त्यांना देत येत नसल्याचे कळविले होते. सदर संस्थेस दिनांक २३-०७-९८ रोजी धर्मादाय आयुक्तांकडून मान्यता प्राप्त होऊनही त्याची नोंद जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी माहितीसाठीचा अर्ज केला तोपर्यत झाली नव्हती.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्य अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस संबंधीत संस्थेच्या घटनेची प्रत उपलब्ध करुन दिलेली व परिशिष्ट-१ वर त्यावेळी सदर संस्थेची नोंद नसल्याने सदर रजिस्टरची प्रत अपिलार्थीस त्यांना देता आली नाही. आता सदर संस्थेची नोंद त्यांनी परिशिष्ट-१ वर घेतली असून परिशिष्ट-१ व "अ" ची सत्यप्रत ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यंच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २५-०४-२००७ रोजीचा कथित अपील अर्ज त्यांना त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या या अपील अर्जावर ते सुनावणी घेऊ शकले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती चुकीच्या गृहीतकावर आधारीत होती. अपिलार्थी यांच्या मते परिशिष्ट-अ, १ ही दोन्ही परिशिष्टे एकाच आहेत. वास्तवात सदर दोन्ही परिपत्रके भिन्न असून परिशिष्ट-अ म्हणजे कोणत्याही संस्थेने धर्मादाय आयुक्त यांना अथवा संस्था निबंधकाकडे अथवा सहाय्यक निबंधकाकडे केलेल्या प्रस्तावाचे पृष्ठांकित पत्र (कव्हरींग लेटर) हे होय. तर परिशिष्ट-१ म्हणजे संस्थेचा नोंदणी क्रमांक, विश्वस्त व्यवस्थेचे नांव व पत्ता, विश्वस्त आणि व्यवस्थापक यांची नांवे व पत्ते, विश्वस्त आणि व्यवस्थापक यांच्या जागी दुसरे विश्वस्त व व्यवस्थापक येण्याची रीत, विश्वस्त व्यवस्थेचे उद्देश, विश्वस्तव्यवस्था निर्माण करण्याच्या दस्तऐवजाचा तपशील, विश्वस्तव्यवस्थेचा उगम किंवा निर्मिती यांच्या दस्तऐवजा व्यतिरिक्त इतर तपशील, स्थावर मालमत्ता, सरासरी वार्षिक उत्पन, सरासरी वार्षिक खर्च इत्यादी तपशील दर्शविणारे परिशिष्ट होय.

या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने ज्या संस्थेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे परिशिष्ट-१ ची मागणी केली होती त्या संस्थेची नोंद धर्मादाय सहाय्यक आयुक्त यांच्याकडे मान्यता परिशिष्ट-१ वर दिनांक ०९-०४-२००८ पर्यत घेण्यात आली नव्हती. **थोडक्यात संबंधीत संस्थेला २३-०७-९८ रोजी मान्यता मिळूनही संस्थेच्या मान्यतेची नोंद सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात दिनांक ०९-०४-२००८ पर्यत म्हणजेच सुमारे दहा वर्षे इतका कालावधी व्यपगत झाल्यानंतरही घेण्यात आली नव्हती. संस्थेची नोंदणी परिशिष्ट-१ मध्ये घेण्यासाठी संबंधीत प्राधिकरणाने लावलेला विलंब समर्थनीय नाही असे आयोगाचे मत आहे.** संस्था ज्या दिवशी नोंदणीकृत होतात त्याच दिवशी अथवा काही वाजवी कालावधी मध्ये त्यांची नावे सदर परिशिष्टामध्ये नोंदवून घेण्यासाठी धर्मादाय आयुक्त यांनी आपल्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये योग्य ते बदल करावेत अथवा यासंदर्भात त्यांनी काही परिपत्रक जारी केल्यास जनसामान्यांना आवश्यक असणारी माहिती अचूकपणे

मिळेल असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी परिशिष्ट-अ हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. तथपि त्यांनी परिशिष्ट-अ ची प्रत अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीस संबंधीत संस्थेच्या घटनेची प्रत जरी अधिनियमा-व्दारे दिली असली तरी सदर माहिती परिशिष्ट-अ च्या अभावी अर्धवट ठरते. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अर्धवट माहिती दिली हे या प्रकरणी सिध्द होत आहे. आता जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस अद्यावत परिशिष्ट-१ व परिशिष्ट अ ची झेरॉक्स सत्यप्रत अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना आता हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्या-बद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून यापुढे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी सतर्कतेने कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगवशात् धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाच्या संबंधाने या व इतर प्रकरणी असे आढळून आले आहे की, अद्यापही जनसामान्यांमध्ये धर्मादाय आयुक्त कार्यालयात जन माहिती अधिकारी कोण व जन अपिलीय अधिकारी कोण याची माहिती नाही त्यामुळे सामान्य अर्जदार हे नेहमी चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज किंवा अपिल करत असतात. चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज किंवा अपिले प्राप्त झाल्यानंतर काय कारवाई करावयाची याचे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये पुरेशा प्रमाणत विवेचन करण्यात आलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा प्रथम अपील अर्ज करताना सह धर्मादाय आयुक्तांकडे प्रथम अर्ज केला. वास्तविकतः

धर्मादाय सह आयुक्त कार्यालय लातूर यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्त उस्मानाबाद यांच्याकडे त्वरीत पाठवून द्यावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करता अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे विनाकारवाई तसाच ठेऊन दिला. अपिलार्थीने त्यांचा अपील अर्ज धर्मादाय सह आयुक्त लातूर यांच्या कार्यालयास रजिस्टर पोस्टाने पाठविला असून सदर अर्ज धर्मादाय आयुक्तांच्या लातूर येथील कार्यालयात दिनांक २७-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. धर्मादाय सह आयुक्त यांच्या कार्यालयाने सदर अर्ज त्यांच्या कडे प्राप्त झाला त्यावेळी थोडीशी जरी सतर्कता दाखविली असती तर अपिलार्थीस सदर माहिती याहीपेक्षा कदाचीत लवकर मिळू शकली असती व अपिलार्थीस व्दितीय अपील करण्याची आवश्यकता पडली नसती ही बाब या निर्णयाव्दारे त्यांच्या निदर्शनास, याची नोंद घेण्यासाठी, लक्षात आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना आता हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून यापुढे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी सतर्कतेने कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २३-०४-२००८ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती स्वाती शामराव साठे, रामनगर, काकडे प्लॉट, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०८९

निर्णय दिनांक २३-०४-२००८

श्री. मोहंमद अनवरउल्लाह खान पिता : अपिलार्थी
बरकतुल्हाखान,
९-५-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण
विभाग (उपेप्र), नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण
मंडळ, सिंचन भवन परिसर, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहंमद अनवरउल्लाह खान पिता बरकतुल्हाखान (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग (उपेप्र) श्री. जयप्रकाश उत्तमचंद राठोर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग

(उपेप्र) श्री. भानुदास अंबादास मोहनपूरकर हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००० ते २४-०४-२००२ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे वितरीत केलेल्या धनादेशाच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" Please furnish the details of the works undertaken by those agencies for :-

i) Self cheques issued as for what purpose.

ii) Cheques issued to the transporters.

iii) Cheques issued to the Xerox & typing center.

IV) Cheques issued to Auto Garages.

V) Cheques issued to tours & travel agencies. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तयार असल्याचे कळविले व सदर माहिती त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर होऊन उपलब्ध करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २०-११-२००६ रोजी व्यक्तिशः विनामूल्य हस्तगत करुन घेतली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, "अपिलार्थीने मागणी केलेल्या दिनांक १९-१०-२००६ च्या अर्जानुसार त्यांना नियमा-प्रमाणे संपूर्ण माहिती देऊन व त्यासाठी आवश्यक ते आकारले जाणारे नियमाप्रमाणे शुल्क संबंधितास भरण्याचे सूचित करुन या कार्यालयास अहवाल सादर करावा."

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती त्यांच्या कार्यालयातील शिपायाव्दारे देण्याची तयारी दर्शविली होती तथापि अपिलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिल्याने त्यांनी ती माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या पत्राने पाठविली. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०१-२००७ रोजी पाठविल्याचे त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीवरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची

मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अर्जामध्ये त्यांना " आवश्यक असलेली माहिती " या मुद्दयापुढे त्यांनी ज्या कामासाठी धनादेश दिले गेले त्या कामांची तपशीलवार माहिती ” असा उल्लेख केला आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीमध्ये संबंधीत देयकाच्या व्हाउचरच्या प्रती त्यांना दिल्या नाहीत तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिलेली माहिती अपूर्ण होती. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी उर्वरीत १७ धनादेशासंबंधातील माहिती त्यांना विलंबाने दिली. माहिती घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उध्दटपणे उत्तरे देऊन यापेक्षा जादा माहिती तुम्हाला देऊ शकत नाही अशी उत्तरे दिली. जन माहिती अधिकारी यांचा त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणताच दृष्टीकोन कधीही सकारात्मक असा नव्हता. त्यामुळे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करावे लागले. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत १७ धनादेशांची माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते अपिलार्थी यांच्याशी माहिती देण्यासंदर्भात सौजन्याने वागले. अपिलार्थी हे त्यांना भेटल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्याकडे व्हाउचरची मागणी केली नव्हती. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना प्रथमतः दिनांक २०-११-२००६ रोजी व तदनंतर दिनांक ०५-०१-२००७ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली व सदर माहिती सत्य आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे आपल्याकडील केलेल्या धनादेशांच्यापोटी कोणती कामे झाली आहे याचा तपशील मागितला होता. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जामध्ये कोठेही या खर्चाच्या व्हाउचरच्या प्रती मागितल्या नाहीत. अपिलार्थीने मूळात मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप मोघम असे असल्याने व अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी दिली असल्याचे या प्रकरणी आढळून येते. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांना अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला होता. सदर माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर उर्वरीत १७ धनादेशांची माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०५-०१-२००७ ला पाठविली. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४५ दिवसाच्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अचूक माहिती मागविण्याच्या दृष्टीने जिल्हा कोषागार कार्यालयाकडे यांच्याकडे याच विषयावर वेगळ्या अर्जाव्दारे माहिती विचारली होती. जिल्हा कोषागार कार्यालयाकडून अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या विषयाधीन मूळ अर्जासंदर्भात मागितलेली माहिती यात फरक आढळून आल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावेळी मात्र या फरकावरुन अपिलार्थीस उर्वरीत १७ धनादेशाची माहिती लक्षात आली. जन माहिती अधिकारी यांच्या मते सदर धनादेशाच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्याचे त्यांच्या कार्यालयाकडून नजरचुकीने राहून गेले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना ती आवश्यक त्या

गांर्भीयाने किंवा या माहितीतील पूर्णतेचा किंवा अपूर्णतेचा कोठलाही विचार न करता दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या मते ज्या १७ धनादेशांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना नंतर प्राप्त झाली ते धनादेश तत्कालीन अधिकारी व या प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये केलेल्या गैरकारभाराच्या संबंधात आहेत. या सर्व प्रकारावरुन अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अर्धवट महिती पुरविली व त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन स्पष्ट केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेमुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब सचिव, (जलसंपदा विभाग) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात व्हाउचरच्या प्रतीची मागणी केली नव्हती त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सदर व्हाउचरच्या प्रती पुरविल्या नाहीत. सदर व्हाउचरच्या प्रती जर अपिलार्थीस हव्या असतील तर त्यांना त्यांचा वेगळा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावा लागेल.

प्रसंगवशात् या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक १२-१२-२००६ रोजी प्राप्त झाला असल्याने त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांचे

म्हणणे ऐकून ते नोंदवून त्यावर आपला निर्णय देणे हे “ अपील ठरविणे ” या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कृतीची नोंद सचिव (जलसंपदा विभाग) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव, (जलसंपदा विभाग) यांनी त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक २३-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अनवरउल्लाह खान पिता बरकतुल्हाखान, ९-५-४५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग (उपेप्र), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, गुणनियंत्रण मंडळ, सिंचन भवन परिसर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा विभाग) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९७

निर्णय दिनांक : २३.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुभाष नथ्थु थोरात (पाटील),<br>६, क्षितीज, एन-१३, वानखेडे नगर,<br>सिडको, औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा ग्रामसेवक, सातारा,<br>ता.औरंगाबाद जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,औरंगाबाद | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुभाष नथ्थु थोरात (पाटील) (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, सातारा, ता.जि.औरंगाबाद श्री. रामदास नारायण पाथ्रे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी विस्तार अधिकारी (पंचायत) श्री. घुगे भारत निवृत्तीराव ( त्यांना

यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत. त्रयथ पक्ष- श्रीमती चव्हाणबाई (सरपंच), श्री. पटेल बहादूर (उपसरपंच) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडील ग्राम पंचायत सातारा जिल्हा औरंगाबाद यांचेकडून नोव्हेंबर २००२ ते नोव्हेंबर २००६ या कालावधीतील तलाठी कार्यालयातील खालील माहिती मागितली होती.

"१) आपल्या ग्राम पंचायत कार्यालयातील सर्व खात्यांच्या पासबुकाच्या सत्यप्रती.

३) सरपंच व उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या झालेल्या चौकशीची प्रतची सत्यप्रती

४) सरपंच व उपसरपंच यांनी शासनास उमेदवारी अर्ज भरतांना दिलेल्या मत्ता व दाईत्वच्या विवरणपत्रकाची सत्यप्रती"

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

(या ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र.२ अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये खोडला आहे.)

अपिलार्थी यांच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २९.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन त्यांनी दि. १.१२.२००६ पर्यंत आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून हस्तगत करुन घेण्याचे या पत्राद्वारे सूचित करण्यात आले. (अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात यापूर्वीच भरले होते. ) तथापि अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही उपस्थित राहिलेले नाहीत,

असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १.१२.२००६ रोजी खाजगी कुरिअर मार्फत अपिलार्थीस पत्र पाठविले तथापि सदर पत्र अपिलार्थी यांनी न स्वीकारल्याने हे पत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १५.१२.२००६ रोजी विनातामिली परत आले. जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. ८.१२.२००६ रोजी प्रथम अपिल केले.अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे, अथवा या संदर्भात पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.५.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलावर त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याचे नमुद करुन जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर आपली मूळ माहितीची मागणी या अपिल अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती समक्ष दिलेली नाही अथवा पत्राद्वारे कळविली नाही. तसेच त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी कळविले नाही. त्यांना मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची आजही आवश्यकता आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जावर कार्यवाही करण्यास टाळाटाळ केल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.तसेच जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती खाजगी कुरिअरमार्फत पाठवली असून, सदर पत्र अपिलार्थी यांनी स्वीकृत न केल्याने, त्यांचेकडे परत प्राप्त झाले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांचेकडे तयार असून ते सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत, अपिलार्थी यांना माहिती पाठवूनही अपिलार्थी यांनी ती माहिती स्वीकृत न केल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यामध्ये ते दोषी नसल्याने त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे त्यांचे प्रतिनिधी आज सुनावणीसाठी उपस्थित आहेत. सुनावणीचे वेळी त्यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिल अर्जावर सुनावणी का घेतली नाही, यासंबंधी विचारले असता, सदर उपस्थित प्रतिनिधीस आयोगास कोणतीही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहे नोव्हेंबर २००२ ते नोव्हेंबर २००६ या ४ वर्षांच्या कालावधीतील एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली आहे. या ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र.२ अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये खोडला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेले त्यांचेकडील दि. ३०.११.२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस एकूण ३ मुद्यांवर कथित माहिती दिली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही बरोबर आहे, तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती. ती माहिती पंचायत समिती, औरंगाबाद व तहसील कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे उपलब्ध होती. जी माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही, त्यासंबंधी कशा प्रकारे कार्यवाही करावयाची असते, याचे विवरण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील

कलम ६(३)(i) मध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट केले आहे. मुद्दा क्र. ३ व ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या मूळ माहितीच्या अर्जाची प्रत तहसीलदार व गट विकास अधिकारी यांचेकडे पाठवून त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस देणे, अधिनियमातील तरतुदीनुसार भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ ची माहिती ही जन माहिती अधिकारी हे ज्या सार्वजनिक प्राधिकरणाचा एक भाग आहेत, त्याच सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस पुरविणे आता भाग ठरते.त्याचबरोबर अपिलार्थी यांनी माहितीसाठी केलेल्या मूळ अर्जाची तारीख पाहता, आता अपिलार्थीस माहिती देण्यास बराच कालापव्यय झाल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे पुढील कालापव्यय टाळण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती देखिल तहसील कार्यालय औरंगाबाद यांचेकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थी यांना पुरवावी लागेल.

वरील घटना पाहिल्या असता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.११.२००६ रोजी जी माहिती अपिलार्थीस देण्याची तयारी दर्शविली होती, ती माहिती वर विवेचन केल्याप्रमाणे अर्धवट आहे. अपिलार्थी यांचा मूळ माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) अनुसार कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ स्पष्ट केली आहे व परिणामी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे, असे आयोगास येथे दिसून आले आहे. आता अपिलार्थीस माहिती देण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

तहसीलदार, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या दि. १.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेला मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्र. ४ च्या संदर्भातील माहिती, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सातारा ता.जि.औरंगाबाद यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी. सार्वजनिक निवडणूकीस उमेदवारी अर्ज भरतांना, प्रत्येक उमेदवाराने मत्ता व दायित्त्वाचे विवरणपत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दाखल करावयाचे असते, सदर दाखल केलेले विववरणपत्रे वेळोवेळी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येत असल्याने, सदर माहिती सार्वजनिक माहिती ठरते. या पार्श्वभूमीवर तहसीलदार, औरंगाबाद यांना अशा प्रकारच्या सूचना देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात त्यांनी विशेष सतर्क राहावे, अशा त्यांना सूचना करण्यात येत आहेत.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. ८.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर कोणतीही कार्यवाही न करुन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाचे दर्शन घडविले आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यशैलीची या निकालपत्रात निर्देशित केल्याप्रमाणे यथायोग्य नोंद घ्यावी.

५. जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष नथ्थु थोरात (पाटील) ६, क्षितीज, एन-१३, वानखेडे नगर,सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, सातारा, ता.जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०२

निर्णय दिनांक २४-०४-२००८

श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी, : अपिलार्थी
कुच्चरवटा इतवारा गल्ली, पंचमुखी
महादेव मंदिराजवळ, जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख
कार्यालय जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख,
जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, जालना
जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक भूमी अभिलेख, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख श्री. राघो गणपतराव लाखाडे (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख श्री. दौलत येसूजी सपकाळ (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते राहत असलेल्या त्यांच्या निवासस्थानासमोरील जागेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " मी इतवारा गल्ली पंचमुखी महादेव मंदिराजवळील सी. टी. सर्वे नंबर ७७०३/ग(१) या निवासस्थानात राहत असून माझ्या निवासस्थनासमोर सहान जागा असून त्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. तरी मला सदरील जागेच्या संदर्भातील माहितीच्या अधिकाराखालील कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत.
>
> १. सदर जागेचा सी. टी. सर्वे नंबर
>
> २. सदर जागेचा नकाशा
>
> ३. सन १९७० मध्ये सदरील जागेवर कोणाचा मालकी हक्क होता व सध्या सन २००७ मध्ये कोणाचा मालकी हक्क आहे.
>
> वरील माहिती कृपया लवकरात लवकर देण्यात यावी ही विनंती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये सदर माहिती त्यांना अशा प्रकारे हवी आहे, ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत कोणतेही अभिप्राय दिले नसून अपिलार्थीने एका साध्या अर्जाव्दारे दहा रुपये

किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिकटवून जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती मागविली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात सुनावणी घेतली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही

आवश्यक आहे. त्यांनी माहिती अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या भुखंडावर अनाधिकृत रित्या बांधकाम झाले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक ११-०४-२००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने माहितीची मागणी ज्यावेळेस केली त्यावेळेस श्री. प्रताप देवा चव्हाण नावाचे जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस माहिती का दिली नाही याची कारणे त्यांना आज सांगता येणार नाही. अपिलार्थीने अपील अर्ज करतेवेळेस श्री. दौलत येसूबा सपकाळ हे अधीक्षक भूमी अभिलेख जालना या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर काय कारवाई केली हे त्यांना अवगत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ते आता अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सरळ व सोपे होते. ही माहिती नवीन रुजू झालेले जन माहिती अधिकारी आता अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देऊ शकतात त्यावरुन ही माहिती पूर्वीच्या जन माहिती अधिका-यास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविण्यास कोणतीच अडचण नव्हती, तथापि केवळ इच्छाशक्तीच्या अभावामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कोणताही निर्णय कधीही कळविला नाही असे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीचा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयीन आवक जावक लिपिकाने अपिलार्थीस दिलेल्या त्यांच्या अर्जाच्या स्थळप्रतीवरील दिलेल्या पोच सहीवरुन सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीचा अर्ज

जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०४-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे आवश्यक होते. तथापि ही माहिती अपिलार्थीस काही वर्षाचा कालावधी लोटून गेल्यानंतरही प्राप्त होऊ शकली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एवढ्या प्रचंड कालावधीकरिता त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेऊन त्यांनी या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या इतर सहाय्यकाची मदत घ्यावयास लागणार होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे कर्मचारी / अधिकारी यांनाही जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे हे पाहता अपिलार्थीस या प्रकरणी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस माहितीपासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेऊन जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक स्वःत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत.

सबब आयुक्त जमाबंदी, पुणे यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास

सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच विनामूल्य पुरवावी.

प्रसंगवशात् या व इतर दुस-या प्रकरणामध्ये आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, भूमी अभिलेख कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमामधील तरतुदीव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर / अपिलावर अधिनियमामधील तरतुदीनुसार कारवाई केली जात नाही. किंबहुना अपिलार्थीच्या अर्जाकडे दुर्लक्ष करुन ब-याच प्रकरणी त्याचा अनादर केल्याचे दिसून येते. “माहिती अधिकार” यासारख्या ज्वलंत व महत्वाच्या विषयावर भूमी अभिलेख कार्यालयाकडून दर्शविल्या जाणा-या अनास्थेची आयुक्त जमाबंदी भूमी अभिलेख यांनी गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी व त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचा-यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीचे कसोशीने पालन करण्याच्या सूचना देऊन त्यांचे ते अनुपालन करतील याकडे त्यांनी विशेष लक्ष देणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त, जमाबंदी पुणे यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व

बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुराव गोविंदराव सुर्यवंशी, कुच्चरवटा इतवारा गल्ली, पंचमुखी महादेव मंदिराजवळ, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ अधीक्षक भूमी अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त, प्रशासकीय इमारत, जुन्या कौन्सिल हॉलसमोर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०३

निर्णय दिनांक २४-०४-२००८

श्री. हिरालाल शेनफडू शिमरे, : अपिलार्थी
एन-७ एफ-३६/६, आयोध्यानगर,
सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अधिकारी (सेतू),
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हिरालाल शेनफडू शिमरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (सेतू) श्री. आण्णासाहेब शिंदे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संगीता हिरालाल शिमरे यांच्या जात प्रमाणपत्रासंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " त्याअर्थी संगीता हिरालाल सिंग्रे यांनी जातीच्या अर्जासोबत दिलेले पुरावे व न्यायालयाचे निवाडे आपणास अनुपालन बाबत बंधनकारक आहे किंवा नाही ?
>
> त्याअर्थी वरील निवाड्याचे अनुपालन करणे आपणावर बंधन-कारक आहे की नाही ? असल्यास संगिता हिरालाल सिम्रे यांचे नाते-वाईकांचे जातीचे पुरावे ग्राह्य धरुन जात प्रमाणपत्र का मिळू नये ?
>
> त्याअर्थी जात प्रमाणपत्र व दाखला या दोन्हीमध्ये तफावत असल्यास कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र ग्राह्य धरुन संगीता यांना जात प्रमाणपत्र का मिळू नये ?
>
> त्याअर्थी वरील न्यायनिवाड्याच्या अधीन राहून शाळा दाखला हा एकमेव पुरावा ग्राह्य न धरता इतर पुराव्यांच्या आधारे जात प्रमाणपत्र का मिळू नये ?
>
> त्याअर्थी संगीता हिरालाल सिम्रे यांच्या वडीलांच्या दाखल्यात भामटा हा शब्दप्रयोग करण्यात आलेला नाही असे असतांना वरील न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करतांना पुन्हा आपण शालेय दाखल्यात भामटा ह्या शब्दप्रयोगाची आग्रह का करावा ? "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या वरील अर्जामध्ये प्रत्येक मुद्यासंदर्भात न्यायालयीन निवाड्याचा हवाला त्यांच्या वरील अर्जात दिला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद खालील प्रमाणे दिला आहे.

" उपरोक्त विषयी आपले अर्जाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण या कार्यालयास माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देवून माहिती मिळण्याची विनंती केली आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता, आपण प्रश्नार्थक स्वरुपात विचारणा केली आहे. आपणास कोणते कागदपत्रे व माहिती पाहिजे हे नमूद केलेले नाही. त्यामुळे आपणास माहितीच्या अधिकारांतर्गत कोणती माहिती पाहिजे हे स्पष्ट होत नाही. तसेच आपण नमूद केलेली जात प्रमाणपत्र संचिका आपणास तपासणीस उपलब्ध आहे. तेव्हा आपण दिनांक ९-५-२००७ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०-०० ते ५-०० दरम्यान या कार्यालयात समक्ष उपस्थित राहून आपणास कोणती माहिती पाहिजे, याबाबत या कार्यालयास अवगत करावे म्हणजे पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. अन्यथा आपला अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. "

जन माहिती अधिकारी यांचे सदर पत्र अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००७ रोजी प्राप्त झाले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये परत जन माहिती अधिकारी यांच्याकडे "जात प्रमाणपत्राबाबत कोणती त्रुटी राहते याबाबत अभिप्राय मिळावा" अशी विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या दिनांक १५-०२-२००७ रोजीच्या पत्रास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन जात प्रमाणपत्राच्या त्रुटी बाबत त्यांना दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या वेगळ्या पत्राने कळविल्याचे अपिलार्थीस अवगत केले आहे व दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन त्रयस्त पक्षाच्या जातीचा दाखला त्यांना नाकारण्यात आल्याची कारणे त्यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येत नाही. तथापि आजच्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताच निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुलीचा जातीचा अर्ज नामंजूर करण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपेक्षिली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, आजच्या सुनावणीतील त्रयस्त पक्ष कुमारी संगीता हिरालाल ही त्यांची मुलगी असून तिने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जातीचा दाखल प्राप्त होण्याकरिता दिनांक १४-०९-२००६ रोजी प्रथम अर्ज दाखल केला होता. सदर जातीच्या दाखल्याची त्यांना आज आवश्यकता आहे. तथापि सदर दाखला जन

माहिती अधिकारी यांच्याकडून नाकारला गेला आहे. सदर दाखला नाकारण्याची कारणे, यासंबंधातील अभिप्राय व अहवालासह त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, हवी आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०१-०२-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००७ रोजी प्राप्त झाले असून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे हे स्पष्ट करण्याकरिता त्यांना आपल्या कार्यालयात दिनांक ०९-०२-२००७ रोजी समक्ष उपस्थित राहण्यसंबंधी सूचित केले होते. अपिलार्थीच्या मुलीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक १४-०९-२००६ रोजीच्या जातीच्या दाखल्यासंदर्भात त्यांच्या मुलीला म्हणजेच त्रयस्त पक्षाला, त्यांच्याकडील दिनांक १९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी याबाबतचा निर्णय कारणासहीत कळविला होता. अपिलार्थीस अपेक्षित जातीचा दाखला नाकारण्यासंबंधीची कारणे अशा प्रकारे कळविली होती. सन २००५ पासून जात प्रमाणपत्र देण्याकरिता कायदा करण्यात आला असून त्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वेगळे अपील करु शकतात व त्याव्दारे आपल्या गा-हाण्याची तड लावू शकतात. तथापि तसे न करता अपिलार्थी माहितीचा अधिकार अधिनियम कायद्याचा उपयोग करुन आपल्या गा-हाण्याची तड लावण्याचा प्रयत्न करित आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागितली आहे ती प्रश्नार्थक

स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी अशी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

**कलम २ (च)**

‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.’’

अपिलार्थीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती वरील व्याख्येशी सुसंगत असल्याचे दिसून येत नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्राय व अहवाल मागण्याचा हक्क आहे अशा अर्थाचे विधान अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये केलेले आहे व तसा त्यांनी जन माहिती अधिकारी यांना या विषयासंबंधात दिनांक १५-०२-२००७ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये उल्लेख देखिल केला आहे. **तथापि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येमध्ये अभिप्राय या शब्दाचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणाच्या संबंधीत विषयाच्या नस्तीवर संबंधितांनी नोंदविलेले त्यांचे लेखी म्हणणे - अभिप्राय - असा आहे. अपिलार्थीने विचारलेल्या प्रश्नांवर / शंकावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्वतःच्या लेखी म्हणण्याव्दारे वेगळे अभिप्राय देणे हे या व्याख्येमधील ‘‘अभिप्राय’’ या शब्दामध्ये अभिप्रेत नाही. तसेच ‘‘अहवाल’’ या शब्दासंदर्भात स्पष्ट करता येईल. माहितीचा अधिकार अधिनियमा-**

**मध्ये नमूद केलेल्या ‘‘अहवाल’’ या शब्दाचा अर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रश्नावर वेगळा अहवाल मागण्याचे अभिप्रेत नाही. परंतु एखाद्या प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत मात्र जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागणी केल्यास ती द्यावी लागेल. थोडक्यात अपिलार्थीने मागितलेली ‘‘माहिती’’ ही माहितीचा अधिकार अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही.** एवढे असूनही अपिलार्थीच्या मनातील शंका दूर करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयीन सबंधीत नस्त्या पाहण्याची सवलत देऊ केली हे या प्रकरणी विशेष करुन लक्षात घेतले पाहिजे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्रयस्त पक्षाचे जात पडताळणी प्रमाणपत्र नाकारण्याची कारणे त्यांच्या दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे स्पष्ट केली आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रत्येक मुद्दयावर वेगवेगळ्या न्यायालयीन प्रकरणातील निवाड्याचा संदर्भ देऊन, त्यातील निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी का कार्यवाही करित नाहीत याची माहिती त्यांना येथे विचारली आहे. यासंदर्भात प्रत्येक प्रकरणनिहाय वेगवेगळी परिस्थिती त्या त्या वेळी अस्तित्वात असू शकते त्यावेळची परिस्थिती, सक्षम प्राधिकरणाने दिलेले आदेश, पुरावे हे सर्व लक्षात घेऊन न्यायालये आपले आदेश जारी करत असतात. सदर निर्णय अपिलार्थीस उपस्थित केलेल्या प्रश्नाकरिता लागू होतील किंवा कसे याचा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घ्यावयाचा आहे. अर्थात या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आपल्या निर्णयाची कारणे त्यांच्याकडील दिनांक १९-१०-२००७ च्या पत्रामध्ये स्पष्ट केली आहेत. अपिलार्थीचा मूळ प्रश्न सोडविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दुसरी समांतर सक्षम शासकीय यंत्रणा, जात पडताळणी समितीच्या

स्वरुपामध्ये अस्तित्वात आहे. हे पाहता व जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय पूर्णतः प्रशासकीय असल्याने या निर्णयामध्ये बदल करण्याचे आदेश आयोगाने जन माहिती अधिकारी यांना देणे उचित ठरणार नाही किंबहुना असे केल्याने आयोगाकडून त्यांच्या मर्यादा भंग केल्यासारखे होईल असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांचा निर्णय मान्य नसेल तर जात पडताळणी समितीकडे अपील करावे असा मार्ग जन माहिती अधिकारी यांनी सुचविला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुचविलेला हा मार्ग कायदेशीर असून अपिलार्थीने या मार्गाचा अवलंब करावा असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी वेळोवेळी केलेला खुलासा हा अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सुसंगत वाटत असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थी यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न करुन त्याव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग करुन आपल्या कार्यशैली-तील बेपर्वाई व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीची यथायोग्य नोंद महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी घ्यावी असे त्यांना या प्रकरणी सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले

व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हिरालाल शेनफडू शिमरे, एन-७ एफ-३६/६, आयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (सेतू), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०४

निर्णय दिनांक २४-०४-२००८

श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपिलार्थी
मंगळवारा, बाजार,
हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग,
हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संतोष यल्हाजी बांगर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग श्री. रमेश जलराम कोयलवार

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग श्री. रमेश धनराज वाळणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नळजोडणी संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना लागू झाल्यापासून ते दिनांक २३-०३-२००७ पर्यतच्या कालावधीच्या खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " सिध्देश्वर ते एम. जे. पी. कार्यालयातील पानी टाकीपर्यत व एम. जे. पी. पानी टाकीपासून आदर्श महाविद्यालय हिंगोली येथिल पाण्याच्या टाकी पर्यत मुख्य जल वाहिनीवरुन शासकीय कार्यालय, संस्था, शा. निवासस्थाने व ज्या ज्या नागरिकांना देण्यात आलेली अवैध नळ खाजगी संस्था जोडणी केलेल्याची यादी देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबद्दल कळवून सदर माहिती नगर परिषदेकडून घेण्याचे त्यांना सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २३-०४-२००७ रोजी हजर झाले असता त्यांना व्यक्तिशः देण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी प्रथम

अपील केले आहे. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०४-२००७ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००७ रोजी माहिती दिल्याचे नमूद करुन अपिलार्थीस पुनश्चः त्यांना आवश्यक असलेली माहिती नगरपरिषद हिंगोली यांच्या कडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कोणाला नळ कनेक्शन देण्यात आले नसल्याचे परत स्पष्ट केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तद्वतच जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अप्राप्त असल्याने त्यांना आयोगाकडे अपील करावे लागले असे त्यांनी या अर्जामध्ये म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, दुस-या अर्जदाराने अशा प्रकारच्या बेकायदेशीर नळ जोडणीची यादी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मागितली असता त्यांनी संबंधीत अर्जदारास अवैध नळ जोडणीची यादी त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००५ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन अपिलीय अधिकारी यांना अवैध नळ जोडणीची माहिती असूनही त्यांनी संबंधीत नळ जोडणीवर कोणत्याही प्रकारे अद्यापपर्यंत कारवाई केलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या कार्यालयामार्फत अवैध नळ जोडणी कनेक्शन कोणासही मंजूर करण्यात आलेले नाही. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या अवैध नळ जोडणीची यादी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत दिली गेल्याचे त्यांना माहिती नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते कार्यकारी अभियंता या पदावर दिनांक ३१-०१-२००८ पासून कार्यरत असून त्यांना या प्रकरणाची काहीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ते नगरपरिषद हिंगोली व ग्रामपंचायत डिग्रस यांना ठोक स्वरुपात पाण्याचे वितरण करतात. पाण्याचे वितरण करण्यासाठी त्यांनी टाकलेली मुख्य गुरुत्ववाहिनी नगरपरिषद हिंगोली शहराच्या हद्दीतून जाते. या वाहिनीवरुन किरकोळ व स्वतंत्र नळ जोडणी देण्याचे काम नगरपरिषद हिंगोली यांचे आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अपिलार्थीने त्यांच्या अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे कोणतीही स्वतंत्र नळ जोडणी देण्यात येत नाही व त्यासाठी पाणीपट्टीही आकारली जात नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती नगरपरिषद हिंगोली यांच्या कक्षेतील आहे असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, बिहारीलाल रामनाथ चौधरी या नागरिकाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या तरतुदीनुसार अशा प्रकारची माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक २०-०७-२००५ रोजी मागविली असता संबंधीत अर्जदारास जन अपिलीय अधिकारी त्यांच्या कार्यालयातर्फे दिनांक ०२-०८-२००५ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये ही

माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीने त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ श्री. बिलारीलाल रामनाथ चौधरी यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून निर्गमीत केलेल्या दिनांक ०२-०८-२००४ च्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. त्याचे अवलोकन करता जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत श्री. बिहारीलाल रामनाथ चौधरी यांना बेकायदेशीर नळ जोडणीची यादी ज्या पत्राने पुरविली आहे ते पत्र सोबत दिलेले आहे. या यादीवरुन एकूण १७ अवैध नळ जोडणी दिली गेल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे ही माहिती उपलब्ध असतांना व तसेच अपिलार्थीने हे आता सिध्द केले असल्याने आता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली अवैध नळ जोडणीची यादी अपिलार्थीस देणे भाग आहे असे आयोगाचे मत आहे. सदर यादी अपिलार्थीस देण्यासाठी एकूण किती दिवसांचा कालावधी लागेल असे जन माहिती अधिकारी यंना विचारले असता त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती हेतूपूरःस्सर दडविल्याचे आयोगास उपलब्ध देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. एखाद्या अर्जदारास एखाद्या विषयावरील माहिती संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त होते मात्र दुस-या अर्जदारास तीच माहिती संबंधीत प्राधिकरणाकडून नाकारली जाते ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या वर्तनातील विसंगती माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीशी व नैसर्गिक न्यायाच्या तत्वाशी पूर्णतः विसंगत असल्याने जन माहिती

अधिकारी यांचा सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही हा दावा आयोग मान्य करत नाही. सार्वजनिक प्राधिकरणाकडून अर्जदारास माहिती देण्यासंदर्भातील अशा प्रकारचा भेदभाव आयोगास अपेक्षित नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक २४-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा, बाजार, हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७४

निर्णय दिनांक : २४.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अब्दुल रेहमान ईस्माईल मलंग<br>रा. दबीरपुरा, उदगीर, ता.उदगीर,<br>जि.लातूर | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,<br>जि. लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपआयुक्त (सा.प्र.)<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. अब्दुल रेहमान ईस्माईल मलंग (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा

मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि. लातूर.श्री. भारत प्र.राठोड, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद. श्री. सोमनाथ गुंजाळ, ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २५.०९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "जा.क्र. mCvwsए प्र./३/AR बांधकाम/३नप/२००६ दि. १७.१.२००६ रोजी मला घर क्र.१-३-५८/१चा बांधकाम संबंधी कळविण्यास आलेल्या पत्राचा परिच्छेद क्र. ५(ब) मध्ये उल्लेख आहे कि सदर घरची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून सदर घरची लांबीरुंदी ६५X५२ नसुन ४२X६२ आहे. सदर घरची जागा मोजणी केल्याबद्दल मोजणी अहवाल व साक्षीदारांचे नाव पत्ता सहीत माहिती मिळणेबाबत"

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. १६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. तथापि सदर माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांचेकडील दि. २९.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये दुरुस्त माहिती कळविली. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. १३.११.२००६ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दि. २३.१.२००७ रोजी घेऊन या अपिलासंदर्भात आपले आदेश दि. २५.१.२००७ रोजी पारित केले होते. या

आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती विनामूल्य व ७ दिवसांत देण्याचे आदेशित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे २०.३.२००७ रोजी दि. ११.४.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ७ दिवसांचे आत माहिती दिली नाही व दि. ८.२.२००७ रोजी त्यांना दिलेली माहिती चुकीची व खोटी आहे, असे म्हटले आहे. त्यांनी मागणी केलेल्या माहितीपेक्षा जन माहिती अधिकारी यांनी वेगळी माहिती पुरवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा संबंधितांनी भंग केला असल्याचे त्यांनी या अपिलामध्ये नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, तथापि त्यांनी आपल्या अपिल अर्जासंबंधी लिखित स्वरुपातील आपला युक्तीवाद दि. ७.४.२००८ आयोगास सादर केला असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचा जन माहिती अधिकारी यांनी भंग केला असून,त्यांनी मोजणी अहवाल, पंच साक्षीदार यांची नावे व पत्ते दिले नाहीत. सदर घराचे मालक श्री. नुरोद्यीन मलंग यांचेशी संगनमत करुन नगर परिषद यांचे कार्यालयातील कर्मचारी यांनी कार्यालयात बसून सदर अहवाल तयार केला आहे. तसेच अपिलीय अधिकारी यांनी ७ दिवसांचे आत त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही त्यांनी एक महिना उशिराने संबंधितास माहिती दिली आहे व दिलेली माहितीही चुकीची आहे. त्यांनी उदगीर नगर परिषदेकडे आजपर्यंत १०० च्या वर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्ज करुनही त्यांना आजपर्यंत खरी माहिती कधीही प्राप्त झाली नाही. अशी पाळी पुन्हा दुसऱ्या कोणावरही येऊ नये म्हणून नगर परिषद, उदगीरच्या मुख्याधिकारी यांना दंड देण्याचे आदेशित करण्याची त्यांनी या अर्जामध्ये विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. १२.२.२००७ रोजी पुरविली असून सदर माहिती बरोबर आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे दि. २५.१.२००७ रोजीचे आदेश त्यांना दि. ३.२.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, अपिलार्थीस दि. १२.२.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. परंतु अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर अहवाल/माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात जायमोक्यावर (Spot) न जाता कार्यालयात बसून तयार केला आहे, हे खोटे आहे. सदर माहिती अपिलार्थीस पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबत त्यांना विचारले असता त्यांनी यावर कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही व त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत त्यांनी आयोगाची क्षमा मागितली.

जन अपिली अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १३.११.२००६ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर त्यांनी दि. २३.१.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २५.१.२००७ रोजी प्राप्त केले या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना ७ दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.९.२००६ रोजीच्या अर्जास दि. १६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि तद्नंतर सदर माहिती चुकीची असल्याचे आढळून आल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत दुरुस्त माहिती त्यांचेकडील दि. २९.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविली. जन माहिती अधिकारी यांचे दि. २९.११.२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, ही माहिती अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीशी  विसंगत असून ती अपूर्णही आहे. या माहितीमध्ये त्यांनी मोजणी अहवाल

व साक्षीदारांची नावे व पत्ते अपिलार्थीस कळविली नाहीत. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.१.२००७ रोजी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांचेकडील दि. १२.२.२००७ रोजी पत्रान्वये दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली ही माहिती अपिलार्थीच्या मूळ मागणीशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी अथवा अधिकारी यांनी सदर जागेची प्रत्यक्षतः पहाणी व मोजणी केलेली नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या म्हणण्यापृष्ठयर्थ कोणताही लेखी पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे योग्य त्या पुराव्या अभावी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती खोटी आहे, हा अपिलार्थी यांचा दावा, आयोग मान्य करीत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांना जी माहिती दि. २४.१०.२००६ रोजी अथवा तत्पूर्वी अधिनियमातील तरतुदीनुसार मिळणे अभिप्रेत होते, ती माहिती अपिलार्थीस दि. १२.२.२००७ रोजी म्हणजेच १११ दिवसांच्या विलंबाने दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांना सदर विलंबाचे कारण सांगता आले नाही किंबहुना या विलंबाचे समर्थन ते आज रोजी त्यांना पुरेशी संधी देऊनही कोणत्याही प्रकारे करु शकत नाहीत, असे आजच्या सुनावणीमध्ये स्पष्ट झाले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना बांधकाम परवाना विभागाकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस विलंबाने देण्यास प्रामुख्याने बांधकाम परवाना विभाग जबाबदार आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे कर्मचारी/अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यास जन माहिती अधिकारी व त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे संबंधित सर्व कर्मचारी हेही

जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या कामी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी या सर्वांना मिळून, त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून १११ दिवस इतक्या असमर्थनीय कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल, त्यांचेवर, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- एवढी शास्ती लावण्यात येत आहे सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात माहे मे,२००८ पासून जास्तीत जास्त ५ हप्त्यात करावा. "००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा- ८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

उपरोक्त शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी प्रादेशिक संचालक तथा विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसांचे आत करावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी हे शासकीय कोषागारात नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील, असे पहावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल त्यांनी आयोगास जून, २००८ पासून नियमितपणे शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास दरमहा सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी, अपिलार्थी यांना, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांनी १११ दिवस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल लावलेल्या विलंबासाठी, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत भरावी.

४. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर अधिकारी/कर्मचारी यांना लावण्यात आलेल्या शास्तीची विभागणी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २४.०४.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग, रा. दबीरपुरा, उदगीर ता. उदगीर जि.लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, उदगीर,जि. लातूर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. उपकोषागार अधिकारी, उदगीर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०५

निर्णय दिनांक : २४.०४.२००८

१ श्री. भाऊराव हरिभाऊ वाकळे, : अपीलार्थी
पंचशीलनगर, परभणी ता.जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
परभणी.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा पोलीस अधीक्षक,
परभणी, जि.परभणी

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. भाऊराव हरिभाऊ वाकळे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,परभणी.श्री. किसन फकिरा खंडारे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,

परभणी, जि.परभणी ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत. तर त्रयस्थ पक्ष पोलीस शिपाई ब.नं.११२२ परभणी, श्री. काशीनाथ धोंडीबा कांबळे, हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २०.०४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "काशिनाथ धोंडीबा कांबळे पोलीस हवालदार ब.नं. ११२२ यांचा मुलगा राहुल काशीनाथ कांबळे यांचा ऑक्टो. २००१ मध्ये पोलीस बॉय म्हणून सत्कार होण्यासंदर्भात काशीनाथ धोंडीबा कांबळे यांनी दिलेल्या अर्जाची सत्यप्रत आणि काशीनाथ धोंडीबा कांबळे यांनी १९९० ते मार्च एप्रिल, २००७ पर्यंत महाराष्ट्र दर्शनचा फायदा घेण्यासाठी कुटुंबातील दिलेल्या व्यक्तींची यादीच्या सत्यप्रती, वर्षनिहाय वेगवेगळया देण्यात याव्यात, ही विनंती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांचेकडील दि. २२.०५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी यांनी माहिती देण्यास परवानगी न दिल्याने, माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांनी संदर्भित केलेल्या दि. १४.५.२००७ रोजीच्या पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या पत्राचे अवलोकन करता त्रयस्थ पक्षाने त्यांना माहिती देण्यासाठी प्रतिबंध केल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास नकार दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.०५.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते, अपिलार्थी यांच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.

२७.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २७.६.२००७ रोजी खालीलप्रमाणे पारित केले.

> " आपण मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असून सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाचे हित संबंधास बाधा येईल, असे असल्याचे आमची खात्री झालेली आहे. तसेच संबंधित व्यक्तींनी लेखी निवेदन देऊन त्यांची माहिती देण्यात येऊ नये, असे कळविले आहे.
>
> करिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११(१) नुसार आपण मागणी केलेली माहिती नाकारण्यात येत आहे."

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या वरील निर्णयाने होऊन अपिलाथीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.६.२००७ रोजी द्वितीय अपिल सादर केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना त्यांच्या दि. २०.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने व सदर माहिती अपिलार्थीस दिल्याने त्रयस्थ पक्षाच्या हितसंबंधास बाधा येणार असल्याने, अपिलार्थी यांना ही माहिती दिली नाही.अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या दि. २७.६.२००७ रोजी दिलेल्या सुनावणी आदेशामध्ये दर्शविले आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या बहिणीचा मुलगा राहुल विठ्ठल म्हस्के यांच्या नावात बदल करुन राहुल काशिनाथ कांबळे अशी अस्तित्त्वात नसलेली व्यक्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलार्थीच्या या कृतीबद्दल त्यांनी

अपिलार्थीविरुध्द आरोपपत्र दाखल केले आहे. सदर आरोपपत्र त्यांनी परभणी येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात दि. २२.३.२००७ रोजी नोंदविले आहे. सदर प्रकरण मुख्य न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात चालू आहे. या प्रकरणी अद्यापि अंतिम निकाल त्यांना प्राप्त व्हावयाचा आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिल्याने त्यांचेवर अन्याय होणार आहे व त्यामुळे त्यांची माहिती अपिलार्थीस देऊ नये, अशी आयोगास त्यांनी विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्ष श्री. काशिनाथ कांबळे यांचा मुलगा राहुल कांबळे यांचे ऑक्टोबर, २००७ मध्ये पोलीस बॉय म्हणून केलेल्या सत्कारासंबंधी त्यांनी दिलेल्या अर्जाची सत्यप्रत, सत्कारमूर्तींची यादी व त्रयस्थ पक्षाने १९९० ते मार्च, २००७ पर्यंत महाराष्ट्र दर्शन या शासनाच्या योजनेचा फायदा घेण्यासाठी दिलेल्या कुटुंबातील व्यक्तींच्या यादीची सत्यप्रत मागितली होती. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ती माहिती सार्वजनिक स्वरुपाची ठरते. या माहितीमध्ये त्रयस्थ पक्षाच्या हितास कोणतीही बाधा पोहोचेल असे आयोगास वाटत नाही. त्रयस्थ पक्षाने महाराष्ट्र दर्शन योजनेचा फायदा घेऊन शासनाकडून त्यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती करुन घेतलेली आहे. त्रयस्थ पक्षास प्राप्त झालेल्या बीलाची रक्कम ही शासनाच्या कोषागारातून व सार्वजनिक निधीतून दिली गेली असल्यामुळे यात कोणतीही गोपनीयता उरत नाही. तत्कालीन पोलीस अधीक्षक यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून ऑक्टोबर २००१ मध्ये पोलीस बॉय म्हणून पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मुलांचा सत्कार केला होता. हा सत्कार एका सार्वजनिक प्राधिकरणातर्फे केला गेला असल्यामुळे, त्यातील सत्कारमूर्तींची यादी अपिलार्थीस देणे गैर आहे, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती सार्वजनिक माहितीचे स्वरुपातील माहिती असल्याने जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस पुरवावी लागेल. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य .

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २४.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भाऊराव हरिभाऊ वाकळे,पंचशीलनगर, परभणी ता.जि.परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, परभणी जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ त्रयस्थ पक्ष : श्री. काशीनाथ धोंडीबा कांबळे, पोलीस शिपाई (ब.नं.११२२) परभणी यांना माहितीस्तव, मार्फत, उपविभागीय पोलीस अधिकारी,परभणी.

५ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९९

निर्णय दिनांक २५-०४-२००८

श्री. गायकवाड संजय शिवराम, : अपिलार्थी
मु. उदतपूर, तालुका लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा
आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत,
महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी
मार्ग, मुंबई - ४०० ००१

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गायकवाड संजय शिवराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग सौ. दीपा प्र. मिरजकर (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पी. एस. आय. मुख्य परिक्षा २००३ निवड प्रक्रियेसंदर्भात एकूण ५ मुद्यावर खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

“ १. क्र. १४४२ (२)/२००३/१३ परिक्षा क्र. पीएन ००४२३४ या परिक्षा क्रमांकाच्या उत्तरपत्रिकेतील बरोबर असलेली व चूक असलेली उत्तरे कोणती ? उत्तरपत्रीका दाखविली जावी.

२. पी. एस. आय. मुख्य परिक्षेतील रद्द करण्यात आलेल्या प्रश्नांचे गुण दिले गेले आहेत किंवा नाही ?

३. पी. एस. आय. मुख्य परिक्षेतील पात्र विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणानुक्रमानेच शारिरीक क्षमता चाचणी घेतली गेली आहे का ? असे असल्यास दि. १५-०४-२००५ या दिवशी शारिरिक चाचणी घेतलेल्या शेवटच्या उमेदवाराचे मुख्य परिक्षेतील गुण किती आहेत ?

४. गुणपत्रिका व गुण पडताळणी पत्रावर सक्षम अधिका-याची सही असतांना निर्णय प्रक्रियेत आपणास असे कळविण्याचा आदेश आहे की, अशी वाक्यरचना का ? (संदर्भ- दि. २३ फेब्रुवारी २००६ चे म. लो. आ. चे पत्र)

५. गुण पडताळणी पत्रातील तात्काळ कालमर्यादा या संज्ञेचा अर्थ काय होतो ? ”

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक २९-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीवर त्यांचे अभिप्राय त्यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे कळविले आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपिलामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, उप पोलीस निरिक्षक २००३ या भरतीची निवड प्रक्रिया पडली असून अंतीम यादी देखील आयोगाने जाहीर केली आहे. सदर यादी जाहीर केल्यानंतर उत्तरपत्रिकेची प्रत त्यांना दिल्याने निवड प्रक्रियेवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होत नाही. त्याचबरोबर महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही शासकीय आस्थापना असल्याने ती जनतेची मालमत्ता आहे व ती गोपनीय राहू शकत नाही. तसेच त्यांनी संदर्भिय केलेल्या पोलीस उप निरिक्षकाच्या भरतीचे मुल्यांकन हे संगणकाकरवी झाले असल्याने परिक्षा घेणारी संस्था व परिक्षक यांच्या विश्वासर्हतेवर कुठलाही प्रकारच्या परिणाम होत नाही.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस या संदर्भातील आपला निर्णय त्यांच्याकडील दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या पत्राने कळवून त्यामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविता येत नसल्याबाबत कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील

अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन परिक्षा क्रमांक पीएन ००४२३४ या क्रमांकाच्या दोन्ही उत्तरपत्रिका पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची किंवा त्यांच्या सत्यप्रती देण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या उत्तरपत्रिकाची झेरॉक्स प्रत त्यांना देण्यात यावी अथवा त्यांच्या मूळ उत्तरपत्रिका त्यांना दाखविल्या जाव्यात, त्याच्या याच प्रकारच्या माहितीच्या वेगळ्या अर्जासंदर्भात त्यांनी अशा प्रकारच्या माहितीसाठी अर्ज केला असता त्यांना २ वेगवेगळी उत्तरे प्राप्त झाली. या दोन्ही उत्तरामध्ये विरोधाभास असल्यामुळे त्यांची मागणी न्याय्य आहे अशी त्यांची भावना दृढ होत आहे.

त्यांनी वेगळ्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस उप निरिक्षक परिक्षा २००३ च्या संदर्भात माहिती मागविली असता पात्र ठरलेल्या उमेदवारांना एकूण ६७५ गुणापैकी गुण देण्यात आले होते असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक १९ जून २००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि विचाराधीन असलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जास असे उत्तर दिले आहे की, पोलीस उप निरिक्षक परिक्षा २००३ मधील रद्‌द केलेले प्रश्नाचे गुण कोठल्याही उमेदवारांना दिले गेलेले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेल्या परस्पर विरोधी माहितीमुळे त्यांना त्यांच्या उत्तरपत्रिका पाहण्याची निकड अधिक तीव्रतेने भासत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०३-२००६ रोजीच्या पत्राने उत्तर दिले असून या पत्रातील मुद्दा क्रमांक २ मध्ये अपिलार्थीस त्यांनी पोलीस उप निरिक्षक परिक्षा २००३ मध्ये रद्द केलेल्या प्रश्नाचे गुण

कुठल्याही उमेदवारांना दिले गेले नाहीत असे कळविले आहे. अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीने केलेल्या अर्जासंदर्भात सदर परिक्षेच्या ६७५ गुणांची माहिती कळविली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उमेदवारांच्या निवडीसाठी मूलतः एकूण ६७५ गुणांची परिक्षा निश्चित केली होती. उत्तरपत्रिका मागणे हा अपिलार्थीचा मूलभूत हक्क नाही. तसेच सर्वोच्च न्यायालयाने अशाच प्रकरणी दिलेल्या निवाड्यामध्ये परिक्षार्थीस उत्तरपत्रिका देण्याचे नाकारले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील मूळ अर्जाव्दारे एकूण ५ मुद्दयासंदर्भात माहिती विचारली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित मुदतीमध्ये अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीची मुख्य मागणी त्यांनी पोलीस उप निरिक्षक (मुख्य परिक्षा २००३) साठी दिलेल्या उत्तरपत्रिकाची प्रत त्यांना पाहण्यासाठी मिळावी अथवा त्याची झेरॉक्स प्रत मिळावी अशी आहे. अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादात असे म्हटले आहे की, सदर परिक्षा संगणकाव्दारे घेतली गेली असल्याने त्या उत्तरपत्रिकावर कोठल्याही परिक्षकाची सही अथवा हस्ताक्षर नाही त्यामुळे सदर उत्तरपत्रिकाची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिल्यास गोपनीयतेचा भंग होत नाही. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे अथवा इतर प्रकरणाचे जे दाखले दिले आहेत त्यांच्या परिक्षामध्ये उत्तरपत्रिकाचा तपासणी परिक्षकामार्फत केली गेली होती त्या परिक्षामधील उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाची पध्दत व विचाराधीन अपिलामध्ये संदर्भित केलेल्या उत्तरपत्रिकामधील मुल्यांकनाची पध्दत या दोन्हीमध्ये भिन्नता आहे त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय या प्रकरणात लागू होत नाही. यावर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, परिक्षा ही परिक्षा असते. अपिलार्थीस

उत्तरपत्रिका देण्याची मागणी मान्य केल्यास अन्य इतर उमेदवाराकडून अशाच प्रकारची मागणी पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर मागणीची व्याप्ती कोणत्याही मर्यादेपर्यत वाढू शकते व तदनंतर लोकसेवा आयोगाकडे प्रमाणाबाहेर काम वाढून सदर कामाचे नियंत्रण आयोगाला करता येणार नाही. परिक्षेच्या उत्तरपत्रिकासंदर्भात केंद्रीय माहिती आयोग तसेच राज्य माहिती आयोगाकडे यापुर्वी बरेच अपील अर्ज दाखल झाले असून त्या संबंधीच्या सर्व निर्णयामध्ये उत्तरपत्रिकाच्या प्रती मिळणे हा घटने अंतर्गत मूलभूत अधिकार नाही असा निर्णय झाला आहे. त्याचबरोबर राज्य माहिती आयोगाकडे अशा इतर प्रकरणी उत्तरपत्रिकाच्या प्रती मिळणे हा माहितीचा अधिकार असू शकत नाही त्यामुळे त्यांना उत्तपत्रिका मिळणे हा माहितीचा अधिकार अधिनियमाखाली येत नाही असे प्रकारचा ब-याच प्रकरणी निर्णय दिला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी वर उपस्थित केलेला मुद्दा की,एकदा अपिलार्थीस उत्तरपत्रिका देण्याची मागणी मान्य केल्यास अन्य इतर उमेदवाराकडून अशाच प्रकारची मागणी पुढे येण्याची शक्यता नाकारता येत नाही, सदर मागणीची व्याप्ती कोणत्याही मर्यादेपर्यत वाढू शकते व तदनंतर लोकसेवा आयोगाकडे प्रमाणाबाहेर काम वाढून सदर कामाचे नियंत्रण आयोगाला करता येणार नाही. या युक्तिवादाशी राज्य माहिती आयोग सहमत आहे. अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भातील मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरित सर्व मुद्यावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात विचारुनही व जी ‘‘माहिती’’ या शब्दाच्या अधिनियमातील व्याख्येशी सुसंगत नाही तो अधिनियमातील विहित मुदतीमध्ये दिली आहे. अशाच प्रकारच्या इतर अनेक प्रकरणामध्ये केंद्रिय माहिती आयोग, राज्य माहिती आयोग, उच्च न्यायालये यांनी उत्तरपत्रिका माहिती अधिकारातील तरतुदीअन्वये अपिलार्थीस देता येणार नाहीत, तो त्यांचा हक्कही नाही अशा प्रकारचे

निर्णय दिले आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती नाकारण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०३-२००६ रोजीच्या व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक २०-०५-२००६ या पत्राने अपिलार्थीस कळविले जे योग्य आहे व त्यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याचे आयोगास कोणतेही कारण दिसून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २५-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गायकवाड संजय शिवराम, मु. उदतपूर, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११२१

निर्णय दिनांक २५-०४-२००८

श्री. कावळे विश्वनाथ नरहरी, : अपिलार्थी
सुनिल निवास, नारळीबाग, भारती
प्रोव्हीजन्सच्या मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा
आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत,
महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी
मार्ग, मुंबई - ४०० ००१

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कावळे विश्वनाथ नरहरी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग सौ. दीपा प्र. मिरजकर (यापुढे त्यांना जन माहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व त्रयस्त पक्ष कु. सुचिता नागनाथ भरणे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कुमारी सुचिता नागनाथ भरणे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> “ प्री परिक्षा व मेन्स परिक्षा (डिसेंबर २००६) साठी भरलेला अर्ज व त्यासोबत जोडलेले इतर सर्व कागदपत्रे कुमारी सुचिता नागनाथ भरणे या परिक्षार्थीसंबंधी सर्व कागदपत्रे व अर्जाची प्रत मिळणेबाबत. ”

अपिलार्थीचे सदर माहिती टपालाव्दारे / व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. सदर माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती ही आयोगाच्या परिक्षा / निवड प्रक्रियेतील गोपनीय माहिती आहे. त्याचप्रमाणे उमेदवार व आयोग यांचे विश्वासार्ह नाते असते. तसेच ही माहिती दिल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या सदर उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपिलावर सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात आपले आदेश त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रसिध्द केल्याने त्रयस्त पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचू शकते व ही माहिती प्रसिध्द केल्याने व्यापक जनहित साध्य होत नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तरामध्ये त्यांना, ''मला असे कळविण्याचे आदेश आहेत की'' असा उल्लेख केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वतः माहिती देणे अपेक्षित आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या अर्जासंदर्भात त्यांना माहिती प्राप्त करुन देण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही मदत केली नाही उलट जन माहिती अधिकारी ह्या त्रयस्त पक्षाची बाजू घेत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १७ मार्च २००७ रोजी दिलेल्या पत्रामध्ये उमेदवार व आयोग यांचे विश्वासार्ह नाते असते असे म्हटले आहे. सदर नातेसंबंध जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या पत्राव्दारे उलगडून दाखविलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती पुरविल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नसल्याचे म्हटले आहे. ''जनहित''

यांची व्याख्या त्यांनी कोठेही स्पष्ट केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास केवळ टाळाटाळ करण्याच्या दृष्टीने वरील शब्दांचा प्रयोग त्यांच्या उत्तरामध्ये केलेला आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या आदेशावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दयांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही विचार न करता आदेश पारीत केले आहेत. ह्या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याची कारणे त्यांना मान्य नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्रयस्त पक्षाशी संबंधीत आहे. सदर माहिती अपिलार्थीस देण्यासंबंधी निर्णय घेण्यापुर्वी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्त पक्षाकडून अभिप्राय प्राप्त करुन घेणे त्यांना भाग आहे त्यामुळे सदर तरतुदीनुसार त्रयस्त पक्षाचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी त्रयस्त पक्षाशी त्यांच्या कडील दिनांक १७ एप्रिल २००८ रोजीच्या पत्रान्व्ये विचारणा केली असून अद्याप त्यावर त्रयस्त पक्षाचे म्हणणे त्यांना अद्याप अप्राप्त आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही त्रयस्त पक्षाशी संबंधीत आहे. तथापि अशी माहिती देण्यापुर्वी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ च्या तरतुदीनुसार त्रयस्त पक्षाचे अभिप्राय घेणे जन माहिती अधिकारी यांना आवश्यक आहे. सदर अभिप्राय त्यांना अद्याप त्रयस्त पक्षाकडून अप्राप्त आहेत

हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाशी परत संपर्क साधून त्रयस्थ पक्षास त्यांच्या उत्तरासाठी १० दिवसांची कालमर्यादा निश्चित करुन द्यावी. जर सदर कालमर्यादेत त्रयस्थ पक्षाकडून कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही तर अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांचे पातळीवर निर्णय घ्यावा. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयावर अपिलार्थीस तदनंतर त्यांना, आवश्यक वाटल्यास, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ अन्वये कार्यवाही करता येईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २५-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कावळे विश्वनाथ नरहरी, सुनिल निवास, नारळीबाग, भारती प्रोव्हीजन्सच्या मागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११००

निर्णय दिनांक : २५.०४.२००८

१ श्री. सुधाकर चंद्रभान बडगे, : अपीलार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत,
अंबड रोड, जालना
जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जालना.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुधाकर चंद्रभान बडगे, (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना, श्री. प्रशांत चिंधा चव्हाण, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना, श्री. हेमंत श.वसेकर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि.०९.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपंग निवासी विद्यालय, जालना यांचेशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) आपण दिलेल्या यादीमधील ५९ विद्यार्थ्यांचे वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत देण्यात यावी.

२) ऑडिट रिपोर्ट २००४ ते २००५ ही सर्व माहिती प्रमाणित करुन मिळावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही न केल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २०.६.२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिल अर्जावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी या अपिल अर्जामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.७.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २५.७.२००६ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः माहिती अपेक्षिली होती तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी कधीही व्यक्तीशः संपर्क न साधल्यामुळे अपिलार्थीस माहिती उपलब्ध होऊ शकली नाही व यामुळे त्यांनी अपिलार्थीचे अपिल खारीज करण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांचे वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ५.१०.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती गोलमोल असून ती समाधानकारक नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांची वारंवार भेट घेऊनही त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहितीची त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना व्यक्तीशः हवी होती. अपिलार्थी यांनी त्यांचे युक्तीवादामध्ये म्हटल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांचेशी कधीही संपर्क साधला नव्हता. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील श्री. वैद्य या नावाच्या सहायक सल्लागार या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याशी त्यांनी माहितीसाठी संपर्क साधला होता. श्री. वैद्य हे कधीही माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले नव्हते. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ज्या शाखेशी संबंधित होती त्या शाखेचे प्रमुख श्री. वैद्य हे दि. १०.५.२००६ ते २४.५.२००६ या कालावधीमध्ये त्यांचे वडिलांचे निधनामुळे रजेवर होते. रजेवर जाण्यापूर्वी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सुपूर्द केली होती. तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क न साधता श्री. वैद्य यांचेशी संपर्क साधणे पसंत केले. श्री. वैद्य हे उपरोक्त कालावधीमध्ये रजेवर होते तर अपिलार्थीने या कालावधीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांचेकडे आजही तयार आहे व ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपिल अर्ज त्यांचेकडे दि. २०.६.२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत या अपिलावर दि. १३.७.२००६ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या अपिल अर्जासंदर्भात दि. २५.७.२००६ रोजी आपले आदेश पारित केले आहेत. त्यांनी दिलेला सदर निर्णय त्यांनी तत्कालीन वस्तुस्थितीवर आधारित दिला होता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते. तथापि अपिलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षित केली असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थी येण्याची वाट पाहत राहिले, तर अपिलार्थी यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी चुकीच्या कर्मचाऱ्याशी संपर्क साधला. अपिलार्थी यांनी प्रथम अपिल करते वेळी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती. तथापि अपिलार्थी यांनी चुकीच्या व्यक्तीशी संपर्क साधल्याने त्यांना ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही, असे येथे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीस देण्यासाठी कोणती माहिती तयार होती, हे विचारले असता त्यांनी आयोगास काही माहिती दाखविली, सदर माहिती अपिलार्थीच्या मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती गोलमोल असून ती समाधानकारक नाही, असे अभिप्राय दिले आहेत. आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस कोणती माहिती असमाधानकारक व गोलमाल आहे, असे विचारले असता अपिलार्थी यांनी आयोगास जी माहिती दाखविली, ती माहिती अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या दुसऱ्या अर्जासंदर्भातील होती, असे आढळून आले आहे. अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे आता माहिती उपलब्ध असल्याने त्यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी

यांनी त्यांच्या दि. ९.५.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः माहिती मागवूनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी कधीही संपर्क न साधल्यामुळे व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून सदर माहिती कोणत्याही टप्प्यावर असदहेतुपूर्वक दडविल्याचे अथवा त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे आढळून न आल्याने त्यांचेवर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य.
२. जन माहिती अधिकारी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधाकर चंद्रभान बडगे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत,अंबड रोड, जालना जि.जालना

२ जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जालना.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६१

निर्णय दिनांक : २५.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जी. एस. रायबोले,<br>सरस्वती कॉलनी,<br>किनवट, ता.किनवट<br>जि.नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा कृषी अधिकारी,उमरी,<br>ता. उमरी, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा तालुका कृषी अधिकारी, उमरी<br>ता.उमरी जि.नांदेड | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जी.एस.रायबोले (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन कृषी

अधिकारी, उमरी श्री. व्ही. एल.राठोड व सध्याचे कृषी अधिकारी,उमरी जि. नांदेड श्री. एम. झेड. हुसेन , ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, उमरी जि.नांदेड ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १९.०६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००६ या वर्षातील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " तालुका कृषी कार्यालय, ता. उमरी जि. नांदेड मध्ये तुम्ही केलेल्या व चालु असलेल्या कामाची माहिती देणे. १) कामाचे नाव,२)गावाचे नाव ३) शेत सर्व्हे नंबर, ४) कामाचा प्रकार, ५) कामाची अंदाजित किंमत,६) वरील कामावर पैशाचा व खर्च व धान्य कुपन्स खर्चाची माहिती देणे तसेच मातीबंधारे अर्दनस्ट्रक्चर कामे, शेततळी कामे, पु.भ.च कामे, सी.ना.बा.कामे, मा.ना.बा.कामे, डा.बा.कामे इत्यादी कामाची माहिती देणे.
>
> तालुका कृषी कार्यालय, ता. उमरी जि.नांदेड मार्फत वरील प्रकारच्या केलेल्या कामाचे मजुराचे हजेरी मस्टरची छायांकित प्रत, कामाचे मोजमाप (एम.बी.) पुस्तिकांची छायांकित प्रत व तसेच वरील कामाचे कॅशबुकाची छायांकित प्रत इत्यादी प्रकारच्या कामाची वरील माहिती व वरील कामावरील कागदपत्रांची माहिती देणे. "

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांचा मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाल्याप्रित्यर्थ त्यांनी अपिलार्थीस पृष्ठांकित केलेलाा पत्रांवर पोचसही केली असून त्यावरुन अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २०.०६.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३१.८.२००६ रोजी प्रथम अपिल केले होते. अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. सुनावणी पत्र त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. २५.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविले होते. तथापि अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही तसेच या संदर्भात कोणतेही आदेश पारित केले नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणताही निर्णय पारित न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१२.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात दि. १५.१.२००७ रोजी नोंद झाली आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य व तात्काळ देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती

मोठी होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ प्रमाणे कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी माहितीची मागणी केल्यानंतर अंदाजे दोन वर्षाचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती तयार करुन ठेवली आहे व ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. मूळात अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती जरी मोठी असली तरी, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस काही वाजवी कालावधीमध्ये देणे सहज शक्य होते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना अंदाजे दोन वर्ष इतका लागलेला प्रदीर्घ कालावधी हा त्यांच्यातील अकार्यक्षमतेचे द्योतक आहे, असे आयोग मानते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती न देऊन त्यांनी त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन त्यांनी स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांचे सहायकाकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. सर्व सहायकांकडून ही माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही माहिती एकत्रित करुन ती अपिलार्थीस द्यावयाची होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना देणे फारसे जिकीरीचे होते, असे आयोगास वाटत नाही, कारण अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मोठा भाग हा मस्टर्सच्या झेरॉक्स प्रतींचा आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे कर्मचारी/अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त होण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणी त्यांना सहाय्य करणारे सर्व संबंधित कर्मचारी हेही जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या कामी सहाय्य करणारे त्यांचे सर्व

अधिकारी/कर्मचारी या सर्वांना मिळून, त्यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल, त्यांचेवर, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात माहे जून,२००८ पासून जास्तीत जास्त ५ हप्त्यात करावा.

"००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा- ८०० इतर जमा रक्कम- १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

उपरोक्त शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय यथायोग्य विभागणी उपविभागीय कृषी अधिकारी, किनवट यांनी हे आदेश त्यांना प्राप्त होताच ७ दिवसांचे आत करावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी हे शासकीय कोषागारात नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील, असे पहावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास जूलै, २००८ पासून नियमितपणे शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास दरमहा सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल लावलेल्या विलंबासाठी, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम

त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत शासकीय कोषागारात भरावी.

३. उपविभागीय कृषी अधिकारी, किनवट जि.नांदेड यांनी वरील आदेश क्र.२ च्या अनुपालनासंदर्भात आपला अहवाल जुलै,२००८ पासून दरमहा नियमितपणे सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत, त्यांना विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५.०४.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोले, तालुका अध्यक्ष भारिप बहुजन महासंघ, किनवट सरस्वती कॉलनी,किनवट, ता.किनवट जि.नांदेड
२ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, उमरी, ता.उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, उमरी जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ उपविभागीय कृषी अधिकारी, किनवट यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ उप कोषागार अधिकारी, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०७१

निर्णय दिनांक २८-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र बापुराव कारके,<br>कोट-बसस्थापनक रोड, स. नं. ८,<br>बीएसएनएल टावर समोर, अंबड,<br>जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर,<br>जिल्हा जालना | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र बापुराव कारके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर श्री. प्रकाश बाबुराव अव्हाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी यांचे प्रतिनिधी तंत्र अधिकारी श्री. नंदकुमार अनंतराव टाक हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " सन २००३ ते २००६ पर्यत रो. ह. यो. / एस. जी. आर. वाय. अंतर्गत केलेल्या कामाची एकूण गावनिहाय यादी, मजुरांना वाटप केलेले धान्य कुपन्स रजिस्टर, अंदाजपत्रक व मोजमाप रजिस्टरच्या प्रत्येकी कामापैकी दोन आठवड्याची सविस्तर माहिती, मजूर हजेरीपत्रकाच्या सत्यप्रती याशिवाय सन २००६-२००७ मध्ये विकास कामांना मिळालेला एकूण फंड किती ? झालेले व अर्धवट कामे किती ? कोणकोणती व गावाची नावे ? यादीसह संपूर्ण सविस्तर माहिती मिळणेबाबत. "

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी रुपये ८९०० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्यासंबंधी सूचित केले होते व सदर शुल्क प्राप्त होताच त्यांना नेमकी कोणत्या वर्षातील कोणत्या कामाची माहिती पाहिजे याचा खुलासा देण्याचे त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये सूचित केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. मात्र सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्यापुष्ट्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास दाखवून अपिलार्थीस

सदर पत्र दिनांक २१-१२-२००६ रोजी १८८९ या क्रमांकाने पाठविल्याचे आयोगास दाखविले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागविली असता अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले व यासंदर्भात त्यांच्याकडे काही पुरावा आहे काय असे विचारल्यावरुन अपिलार्थीने ते जन माहिती अधिकारी यांच्या कडे २ वेळा गेल्याचे सांगितले. तथापि यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचेही त्यांनी आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील दिनांक २२-०३-२००७ रोजी दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे दिनांक २०-०३-२००७ रोजीचे प्रथम अपील उशीरा प्राप्त झाले असल्याने व कालबाह्य झाल्याने सदर अपील फेटाळून लावले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उडवा-उडवीची, टाळाटाळ करणारी व दिशाभूल करणारी उत्तरे दिल्याने त्यांना आयोगाकडे हे व्दितीय अपील करावे लागत असल्याचे कारण दर्शवून आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी जालना यांच्याकडे दिनांक ०३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केल होते. तथापि त्यांना या प्रकरणी निश्चितपणे जन अपिलीय अधिकारी कोण हे उशीरा कळल्याने त्यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक लावले नसल्याने त्यांना याविषयावर प्रथम अपील दाखल करण्यास विलंब लागला. सदर माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या अर्जास दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८९०० इतके त्यांच्या कार्यालयास जमा करण्याचे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारचे कोणतेही शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरल्यास ते अपिलार्थीस ती माहिती देण्यासाठी त्यांना किमान १५ दिवसांचा कालावधी लागेल.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात फलक नसल्याबाबतचे केलेले विधान चुकीचे असून त्यांच्या कार्यालयामध्ये माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक सहजपणे दृष्टीस पडतील अशा पध्दतीने लावले आहेत. अपिलार्थीने त्यांच्याकडील केलेले अपील उशीरा केले असल्यामुळे त्यांनी अपील फेटाळून लावले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे. तसेच अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले दिनांक २१-१२-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना देण्यात येणारी प्रस्तावित माहिती अंदाजे किती पृष्ठांची आहे व माहिती देण्यासाठी प्रती पृष्ठ दर काय आहे याचा उल्लेख या पत्रामध्ये केलेला नाही. तसेच या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस समक्ष भेटण्यासाठी बोलावले अहे. अपिलार्थीस समक्ष भेटण्याचे कारण या पत्रात दर्शविले आहे. या वरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस नेमक्या कोणकोणत्या विषयावर व कोण कोणत्या कामाची माहिती पाहिजे याचा जन माहिती अधिकारी यांना अर्थबोध झाला नाही व यासंदर्भात त्यांना अपिलार्थीस खुलासा हवा होता. जर अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती द्यावयाची आहे हे जन माहिती अधिकारी यांना माहिती नव्हते तर त्यांनी सदर माहिती देण्यासाठी आवश्यक ते शुल्क रुपये ८९०० हे कशाच्या आधारे काढले याचा अर्थबोध आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन तसेच जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन होत नाही. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार होती किंवा कसे याबद्दल आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. या अनुमानास जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी केलेल्या युक्तिवादा-वरुन पुष्टी मिळते कारण आजही जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर माहिती तयार नाही. सदर माहिती तयार करण्यास त्याना किमान १५ दिवसांचा कालावधी लागेल असे आयोगासमोर स्पष्ट केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहितीची व्याप्ती मोठी असून अपिलार्थीने एकूण ४ वर्षाची माहिती जन

माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा सदर अर्ज पाहता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागण्यात येणा-या माहितीच्या व्याप्तीवर काही बंधने निश्चितपणे ठेवावीत असे आयोगास वाटते. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत तयार करुन त्यांना देण्यासाठी तयारी दर्शविली आहे. मात्र त्यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २१-१२-२००६ रोजी पत्रान्वये अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहितीचा दर न कळविल्यामुळे तसेच अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे त्यावेळी तयार नसल्याचे आता सिध्द झाल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य पुरवावी लागेल हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच माहिती कोणत्याही प्रकारे अर्जदारास देण्यासाठी तयार नसताना अर्जदाराशी दिशाभूल करणारा पत्रव्यवहार करु नये अशी त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत

विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २८-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र बापुराव कारके, कोट-बसस्थापनक रोड, स. नं. ८, बीएसएनएल टावर समोर, अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९१

निर्णय दिनांक २८-०४-२००८

श्री. सुनिल हणमंत घाडगे, : अपिलार्थी
वेताळनगर, तुळजापूर,
तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा
परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुनिल हणमंत घाडगे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. भागवत कदम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद श्री. भारत सासणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्रासंदर्भात खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" १. वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केलेले आहे का ?

२. त्या वरिष्ठ कार्यालयाचा संपूर्ण टपालाचा पत्ता.

३. वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केलेला दिनांक व आवक जावक क्रमांक (माहिती अधिकारी यांनी पुढील नियमानुसार (The Right of the Information Act 2005 Chapter-I (Preliminary) Rule No. 2 (F) Opinion, Advices) नुसार सांगितलेल्या माहितीमधील अधिका-यांकडून माहिती मत / सल्ला स्वरुपात लेखी घेवून माहिती द्यावी) "

अपिलार्थीचे सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक ०६-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागतलेली माहिती ही व्यक्तीगत व गोपनीय स्वरुपाची असल्याने व ती माहिती जाहीर करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक नसल्याने अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मधील (ड.) व (त्र) च्या आधारे त्यांनी मागणी केलेली माहिती नाकारली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १४-०२-२००७ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. अपिलार्थीचे अपील फेटाळतांना त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ड.) व (त्र) च्या तरतुदीचा आधार घेऊन ते फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी झाली नाही व यासंदर्भात कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही व तसेच त्यांना व्दितीय अपील कोठे व केव्हा करावयाचे ते जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कळविले नाही.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी दिनांक २७-१२-२००६ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक ०६-०१-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले. त्या पत्राव्दारे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि सदर अपिलावरील निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याने ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २४-०४-२००७ रोज हजर झाले असता जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडून त्यांना निर्णयाची प्रत प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक १४-०२-२००७ रोजीचा निर्णय त्यांना पोस्टाने प्राप्त न झाल्याने ते दिनांक २४-०२-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले होते. ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले या त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास दाखविले. या पत्रावर, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाचा, सदर पत्र मिळाल्याबाबत संबंधीत लिपिकाची सही व शिक्का आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २७-१२-२००६ रोजीच्या अर्जास उद्देशून त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०६-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती नाकारतांना ती नाकारण्याची कारणे या पत्रामध्ये दिली आहेत. अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपिलावरील दिनांक १४-०२-२००७ रोजी घेतला गेलेला निर्णय त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने पाठविला होता त्याच्या या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली तसेच सदर अपील निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला नसला तरी तो अपिलार्थीस प्रत्यक्षतः देण्याची तयारी आयोगासमोर दर्शविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १४-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक १४-०२-२००७ रोजी निर्णय दिला असून तो अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिला आहे. अपिलार्थीस अपील फेटाळतांना त्यांनी योग्य ती कारणे या निर्णयामध्ये दिली आहेत. सदर निर्णयची प्रत त्यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविल्याचे सांगितले.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी हेच त्रयस्थ पक्ष म्हणून आयोगासमोर उपस्थित झाले. त्रयस्थ पक्षाच्या भूमिकेतून त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, ते भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असून भारतीय प्रशासन सेवेच्या सेवानियमानुसार त्यांना दरवर्षी अशा प्रकारची माहिती मार्च महिन्यामध्ये शासनाला सादर करावी लागते. त्याप्रमाणे त्यांनी ती माहिती शासनाच्या सामान्य प्रशासन विभागास सादर केली आहे. शासना-कडे सादर केलेल्या विवरणपत्रातील माहिती वैयक्तीक स्वरुपातील असून त्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होणार नाही अशी त्यांची खात्री झाल्याने त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांनी ही माहिती उघड करु नये असे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मत व्यक्त केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात एकूण ३ मुद्दयावर माहिती मागितली होती. अपिलार्थीने, त्रयस्थ पक्षाने त्यांचे मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केले आहे का, ज्या वरिष्ठ कार्यालयाकडे त्यांनी सादर केले आहे त्या कार्यालयाचा पत्ता व त्रयस्थ पक्षाने त्यांचे सदर विवरणपत्र ज्या पत्राव्दारे वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केले होते त्या पत्रांचे २००० ते २००५ या कालावधीतील क्रमांक व दिनांक हे मागितले होते. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी त्रयस्थ पक्षाने ते, त्यांचे मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र ज्या कार्यालयास सादर करतात त्या कार्यालयाचे नांव आजच्या युक्तिवादामध्ये वर म्हटल्याप्रमाणे स्पष्ट केले आहे. त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे यापुर्वी प्रत्येक वर्षी सादर केलेली आहे. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस देण्यास काही हरकत असण्याचे कारण नाही. मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली आहे जी माहिती अधिकार

अधिनियमामध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्यामूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संबंधाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अभिप्रेत नाही. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भातील आवश्यक ती माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत पुरवावी. सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाकडून जशी प्राप्त होईल तशी शासनाकडे पाठवावयाची असल्याने व या प्रक्रियेमध्ये कोणा अधिका-याचे मत वा सल्ला घेतला जात नसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ च्या शेवटी असलेला मुद्दा या प्रकरणी लागू होत नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या प्रथम अपिलाचा निर्णय त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला नाही असे म्हटले आहे. सदर निर्णय त्यांना प्राप्त न झाल्याने ते दिनांक २४-०४-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले होते या संदर्भातील पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज त्यांना त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाची प्रत दिली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ (अंशतः) ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २८-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल हणमंत घाडगे, वेताळनगर, तुळजापूर, तालुका तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९२

निर्णय दिनांक : २८-०४-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती प. गं. कोदरकर,<br>द्वारा श्री. अकोलकर,<br>३३ (अ), रेणूका, छत्रपतीनगर,<br>गारखेडा परिसर,औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा अप्पर कोषागार अधिकारी (संगणक)<br>कोषागार कार्यालय, लेखा कोष भवन,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी,<br>औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती प. गं. कोदरकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) या गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा अप्पर कोषागार अधिकारी संगणक) कोषागार कार्यालय, लेखा कोष भवन,औरंगाबाद श्री. काझी अजिमोद्दिन अब्दुल बारी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा

वरिष्ठ कोषागार अधिकारी,औरंगाबाद श्री. चव्हाण जिजा भिवा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १७.०४.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, स्वातंत्र्यसैनिक अवलंबिताच्या नियुक्तीबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" जिल्हाधिकारी, औरंगाबादने त्यांचे पत्र क्र.२००५/जीबी/डेक्स१/स्वासै/कावि/८१०७, दि. १३.१२.०५ द्वारे आपणास योग्य ते मार्गदर्शन केले आहे ते आपल्या कार्यालयास दिनांक १५.१२.०५ रोजी प्राप्त झाले आहे.

मा. जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी साप्रवि च्या परिपत्रक क्र. सीएनएस १०८७/४९९/के.नं.१२ दिनांक ४/३/९१ नुसार कार्यवाही करण्यात यावी असे आपणास मार्गदर्शन केलेले आहे आणि माझा पाल्य चि. ग.दे.अकोलकर यानीही याच शासन परिपत्रकाचे अनुशंगाने आपणाकडे नियुक्तीसाठी अर्ज सादर केला आहे. तथापि त्याचे नियुक्तीस आता कोणती अडचण उदभिंवत आहे/त्याच्या नियुक्तीस का विलंब लागला आहे, हे जाणून घेणे आहे."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या पाल्याच्या नियुक्तीसंदर्भातील अर्जावर त्यांनी घेतलेला निर्णय अपिलार्थीस खालीलप्रमाणे कळविला आहे.

'सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.सीएमएस-१०८७/४९९/क.नं.१२/१६-अ/मुंबई दि. ०४.०३.९१ नुसार स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांना या कार्यालयामार्फत नोकरीसाठी नामनिर्देशन पत्र देता येते. नियुक्ती अधिकाऱ्यांनी नामनिर्देशन स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्याचे अर्ज घेऊन त्यानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावयाची असते असे कळविले.

परंतू सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.अकंपा/प्र.क्र.५९/२००३/आठ दि. ३०.१.२००४ अन्वये खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत निर्देश देण्यात आले असून रिक्त पदे सर्वप्रथम हजेरी सहाय्यकामधून भरावीत. हजेरी सहाय्यकांचे समावेशन झाल्यानंतर अतिरिक्त संवर्ग कक्ष, अनुकंपा, जनगणना कर्मचारी, अंशकालीन कर्मचारी या प्राधान्य क्रमानूसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्त्या कराव्यात असे आदेशित केले आहे. तसेच हजेरी सहाय्यकांचे समावेशन पूर्ण झाल्याशिवाय इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्त्या करता येणार नाहीत असेही आदेशित केलेले आहे. या शासन निर्णयातील प्राधान्य क्रमानुसार खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरणे या कार्यालयास क्रमप्राप्त असल्याने त्यातील प्राधान्यक्रमानुसार या कार्यालयास स्वातंत्र्यसैनिकांनी नामनिर्देशन केलेल्या व्यक्तीस शासकीय सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही या कार्यालयास करता आली नाही.‘

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०६.०५.२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. परंतु त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २२.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक तो खुलासा केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.६.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १७.४.२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी त्यांच्याकडील दि. २८.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ०६.०५.२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी त्यांचेकडील दि. २२.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थीची विनंती मान्य न करण्याची कारणे त्यांनी अपिलार्थीस कळविली होती. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात स्वातंत्र्यसैनिकाचे अवलंबित या प्रवर्गातून नेमणूक मिळण्यासाठी अपिलार्थीच्या पाल्याने स्वातंत्र्यसैनिकाचे अवलंबित म्हणून अर्ज केला होता.तथापि प्रचलीत शासकीय आदेशानुसार अपिलार्थीच्या पाल्यास जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून नियुक्तीपत्र देता आले नाही. अपिलार्थीच्या पाल्यास नेमणूक देतांना काय अडचणी उदभिंवत आहेत, हे अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जाणून घ्यावयाचे आहे. खूल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने दि. ३०.१.२००४ रोजी स्पष्ट सूचना दिल्या असून या सूचनांमध्ये पदे भरण्यासाठी हजेरी सहायकांना प्रथम प्राधान्य आहे. त्यानंतर अतिरिक्त संवर्ग, अनुकंपाधारक, जनगणना कर्मचारी, अंशकालीन कर्मचारी, धरणग्रस्त असा प्राधान्यक्रम ठेवला गेला आहे. अपिलार्थीचा पाल्य यापैकी कोणत्याही प्राधान्यक्रमात मोडत नसल्यामुळे साहजिकच अपिलार्थीच्या पाल्यास त्यांना नेमणूक देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचे दि. १७.४.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये, प्रथम प्रतिसाद

दिला आहे. सदर माहिती त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या पाल्यास नियुक्ती आदेश देण्यामध्ये कोणती अडचण आहे/नियुक्तीस विलंब का लागला आहे, याबाबत माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशी स्पष्ट केली आहे. जी खालीलप्रमाणे आहे.

' 'माहिती' याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश रोजवहया,संविदा,अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल),कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, याचा समावेश होतो. '

अपिलार्थी यांनी विचाराधीन अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडून, त्यांचेतर्फे करण्यात येत असलेल्या प्रशासकीय स्वरुपाच्या कार्यवाहीच्या कारणांची अपेक्षा या माहितीच्या अर्जाद्वारे केली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, वर निर्देशित केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे अपेक्षित काम का होऊ शकत नाही, याचा सविस्तर खुलासा त्यांचेकडील अनुक्रमे दिनांक २८.४.२००६ व २२.५.२००६ या पत्रामध्ये केलेला आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत असल्याने तसेच अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केला असल्याने अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २८-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती प. गं. कोदरकर,द्वारा श्री. अकोलकर, ३३ (अ), रेणूका, छत्रपतीनगर,गारखेडा परिसर,औरंगाबाद
२. जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी (संगणक), वरिष्ठ कोषागार कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९३

निर्णय दिनांक २९-०४-२००८

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपिलार्थी
ए - ५१, नाथबाजार, सिंधी कॉलनीच्या
पाठीमागे, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे
(स्था. स्तर) विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे
(स्था. स्तर) मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :
१ उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, औरंगाबाद
२ उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, सिल्लोड
३ उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर) सर्वेक्षण, उपविभाग, खुलताबाद
४ उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, कन्नड
५ उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, सोयगाव
६ उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, वैजापूर

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) मंडळ, औरंगाबाद

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मनिष भगवानदास अग्रवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, औरंगाबाद श्री. एस. पी. आकोसकर, उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग सिल्लोड श्री. आर. जी. ताठे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) मंडळ यांचे प्रतिनिधी सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री. गुलाब नामदेव सोनवणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व कार्यकारी अभियंता श्री. स. दि. डोणगावकर हे हजर आहेत तर उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग खुलताबाद, कन्नड, सोयगाव व वैजापूर हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-१०-२००४ ते ३१-१०-२००६ या कालावधीतील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील माहितीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ आपल्या कार्यालयातंर्गत असलेल्या खालील उपविभागामार्फतची महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांचे हजेरी पुस्तक, मजुरांच्या जॉबकार्डवरील आवश्यक नोंदी केलेली जॉबकार्डचे, मजुरांचे काम मागणीपत्र, या उपविभागांची कामनिहाय साप्तहिक मजूर उपस्थिती, प्रशासनाकडे

पतमर्यादा मागणी पत्र व त्यानुसार प्रशासनाने मंजूर केलेल्या कामनिहाय पतमर्यादा पत्राची माहिती छायांकीत प्रतीत माहिती द्यावी.

१. लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग, औ,बाद :- उमरावती पा. त. ८, उमरावती पा. ६, वरझडी पा. त. १३.

२. ल. पा. (स्था.स्तर)उ. वि. सोयगाव :- पा. त. तिडका.

३. ल. पा. (स्था.स्तर)उ. वि. खुलताबाद :- निरगुडी क्र. पा.२

४. ल. पा. (स्था.स्तर)उ. वि. वैजापूर :- पात बिलोणी, पात बिरोळा

५. ल. पा. (स्था.स्तर)उ. वि. सिल्लोड :- हळदा पात १६, मुल्लोड पा. त. ३

६. ल. पा. (स्था.स्तर)उ. वि. कन्नड :- जवखेडा पा. त. ५

या उपविभागातील वरिलप्रमाणे कामांची माहिती मर्यादीत कालावधीत द्यावी. तसेच सदरील कामांचे हजेरी पुस्तक ग्रामपंचायतीला दिल्याचे कार्यालयीन पत्राची पोहच केलेली छायांकीत प्रत द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या मूळ माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी मागितलेली माहिती अनेक जन माहिती अधिकारी यांच्या विभागाशी संबंधीत असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीच्या अर्जाच्या प्रती त्यांच्या कार्यक्षेत्रातील जन माहिती अधिकारी यांना अग्रेषित करुन त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आवश्यक ते शुल्क आकारुन देण्याचे सूचित केले. सदर

पत्राची प्रत अपिलार्थीस देऊन त्यांना आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रातील सुचनेप्रमाणे उप अभियंता सिल्लोड यांनी अपिलार्थीस दिनांक २२-११-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये ३५०० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्या-विषयी अपिलार्थीस सूचित केले तर उप अभियंता कन्नड यांनी त्यांचेकडील दिनांक २१-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ३०० रुपये इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याच्या सूचना दिल्या. तथापि सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात न केल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास उप अभियंता (स्था.स्तर) खुलताबाद यांनी त्यांच्या कडील दिनांक ०७-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी रुपये १४८ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरल्याने त्यांना ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १४-०३-२००७ रोजी पारीत केले

आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी पत्राचा दिनांक मागच्या तारखेचा टाकून त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याचे म्हटले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाने माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क स्विकारले देखील नाही इत्यादी बाबींचा उल्लेख त्यांनी या अपील अर्जामध्ये केला आहे. त्यांनी मागणी केलेली माहिती वेगवेगळ्या उपविभागाशी संबंधीत असल्याने सदर शुल्क त्या त्या विभागात जाऊन भरणे शक्य नसल्यामुळे अपिलार्थीने सदर शुल्क कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात भरण्याविषयी कार्यकारी अभियंता यांना विनंती केली होती. तथापि त्यांनी माहितीपोटीचे शुल्क संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडेच भरावे असे आदेश दिले. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली व जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय चुकीचा असल्यामुळे व माहिती अधिकारी त्यांना पाठीशी घालत असल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी हे ज्यावेळी अपिलार्थी यांच्याकडे शुल्काची मागणी करतात त्यावेळी त्यांनी कोषागारात आवश्यक असणारे चलन या पत्रासोबत भरुन देणे आवश्यक आहे. असे असतांना कोणत्याही जन माहिती

अधिका-याने आवश्यक ते चलन भरुन दिलेले नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता औरंगाबाद यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००७ रोजी पुरविली. सदर माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १७-०४-२००७ रोजी ४३० रुपये इतके शुल्क भरल्यानंतर देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता सिल्लोड यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या संदर्भात त्यांना त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रुपये ३५० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्क अपिलार्थीने न भरल्याने अपिलार्थीस अद्याप त्यांनी माहिती पुरविली नाही.

उर्वरीत सर्व जन माहिती अधिकारी गैरहजर असल्याने त्यांची नोंद आयोगाने घेतली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०१-२००७ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक १४-०३-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी सर्व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की,

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून या माहितीमधील काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे शक्य नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मजुराचे जॉब कार्ड हे संबंधीत मजुराकडे उपलब्ध असते तर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये कामाची मागणी पत्रे संबंधीत मजुरांमार्फत तालुकाच्या तहसीलदारांस सादर करण्यात येते. सदर पत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे शक्य नाही. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज पुढे उपविभागाकडे पाठवून त्यांना अपिलार्थीस, त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क प्राप्त करुन घेऊन त्यांना त्यांच्याकडील माहिती देण्यासाठी दिनांक ०४-११-२००६ रोजीच्या पत्रामध्ये सूचित केले होते. एकूण ६ जन माहिती अधिका-यापैकी लघुपाटबंधारे उपविभाग औरंगाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०५-२००७ रोजी रुपये ४३० इतके शुल्क त्यांच्याकडून भरुन घेऊन अपिलार्थीस दिनांक ०२-०७-२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती दिल्याने सदर माहिती अपिलार्थीस निःशुल्क देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तील कलम ७ (६) च्या तरतुदी अन्वये जन माहिती अधिकारी यांना भाग होते. तथापि त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस देण्यापोटी रुपये ४३० इतके शुल्क आकारण्याची त्यांची कृती चूक ठरते. सबब उप अभियंता लघुपाटबंधारे औरंगाबाद यांनी अपिलार्थीकडून प्राप्त करुन घेतलेले शुल्क रुपये ४३० त्यांना परत करावे असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. या प्रकरणी कन्नड, खुलताबाद व सिल्लोड या उपविभागानी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात विहित मुदतीत भरण्याचे सूचित केले. त्यामुळे कन्नड,

खुलाताबाद व सिल्लोड या उपविभागाने केलेली कारवाई या प्रकरणी बरोबर ठरते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एक वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही उप अभियंता सोयगाव व वैजापूर यांनी अपिलार्थीस दिली नाही किंवा यासंदर्भात अपिलार्थीस कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही ही निश्चित खेदाची बाब आहे असे आयोग मानतो. कन्नड, खुलताबाद व सिल्लोड या उपविभागाच्या उप अभियंत्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सशुल्क पुरवावी तर सोयगाव वैजापूर येथील उप अभियंत्यानी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांच्या संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालया मध्ये पैसे भरण्याच्या सूचनेबाबत आक्षेप घेतला असून त्यांच्या मते कोणत्याही जन माहिती अधिका-याकडे मागितलेली माहिती त्याच प्राधिकरणाकडील इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे भरता येते. तथापि अपिलार्थीची सदर धारणा चुकीची असून अपिलार्थीस ज्या कार्यालयाकडून माहितीची अपेक्षा आहे त्या कार्यालयात त्यांनी आवश्यक ते शुल्क भरणे असे अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. अपिलार्थीस अद्यापही सोयगाव व वैजापूर येथील उप अभियंता यांनी त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्याशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी उप अभियंता सोयगाव व वैजापूर यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील अशा प्रकारच्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल

आयोगास सादर करावा. कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे स्था. स्तर यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील पत मर्यादेच्या मुद्दयावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून आले आहे की, मूळात अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती कार्यकारी अभियंत्याकडे मागितली होती. जलसंपदा विभागाच्या, आयोगाकडे यापूर्वी झालेल्या सुनावण्यामध्ये कार्यकारी अभियंता हे जन माहिती अधिकारी व अधीक्षक अभियंता हे अपिलीय अधिकारी म्हणून हजर राहिले आहेत हे पाहता या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनीच जन माहिती अधिकारी म्हणून आपले कर्तव्य पार पाडणे भाग होते तथापि या प्रकरणी त्यांनी आपली जबाबदारी टाळल्याचे, त्यांच्या अपिलार्थीचा अर्ज उप अभियंत्याकडे पाठविण्याच्या कृतीवरुन, सिध्द होत आहे. अपिलार्थीने अपेक्षित केलेल्या माहितीतील काही भाग कार्यकारी अभियंता यांचेकडे उपलब्ध होता, कार्यकारी अभियंता व उप अभियंता हे दोन्ही अधिकारी एकाच सार्वजनिक प्राधिकरणाचे भाग असल्याने व मूळात अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांच्याकडे मूळ माहितीचा अर्ज सादर केला असल्याने या प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी जन माहिती अधिकारी या नात्याने आपले, अपिलार्थीस माहिती देण्याचे, कर्तव्य पार पाडण्यास टाळाटाळ केली असल्याचे या प्रकरणी आयोगास प्रतीत होत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जावर सुनावणी मात्र अधिक्षक अभियंता यांनी घेऊन आपले आदेश पारीत केले आहेत हे पाहता तर आयोगाची धारणा अधिकच दृढ होत आहे. कार्यकारी अभियंता यांनी यापुढे अशा प्रकारे त्यांच्यावरील जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न इतःपर भविष्यात करु नये अशी त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उप अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर) औरंगाबाद यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून माहितीपोटी प्राप्त करुन घेतलेले रुपये ४३० त्यांना हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ३ दिवसाच्या आत परत करावेत.

३. उप अभियंता सोयगाव व वैजापूर यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. उप अभियंता कन्नड, सिल्लोड व खुलताबाद यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे सशुल्क पुरवावी.

५. सचिव (जलसंपदा) यांनी उपरोक्त प्रकरणी उप अभियंता सोयगाव व वैजापूर यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

६. कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे स्था. स्तर यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील पत मर्यादेच्या संदर्भातील माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

७. कार्यकारी अभियंता यांनी या प्रकरणी जबाबदारी टाळल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे ताकिद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २९-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, ए - ५१, नाथबाजार, सिंधी कॉलनीच्या पाठीमागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, सिल्लोड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, खुलाताबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, कन्नड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, सोयगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग, वैजापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था. स्तर) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०६

निर्णय दिनांक २९-०४-२००८

श्री. शशिकांत रामराव पिंपळे, : अपिलार्थी
प्लॉट नं. २३, माणक नगर, हिंदू राष्ट्र
चौक, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
तालुका औरंगाबाद अंजूमन बंगला,
क्रांती चौक, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
शक्ती सहकार इमारत, मध्यवर्ती
बसस्थानक मार्ग, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शशिकांत रामराव पिंपळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद श्री. ब्रिजेश लक्ष्मणराव जाधव (यापुढे त्यांना जन

माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था श्री. अनिलकुमार मुं. दाबशेडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष श्री. जीवन भाऊराव काळे (यापुढे त्यांना त्रयस्त पक्ष असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनपा शिक्षक सहकारी पत संस्थासंदर्भात दिनांक ०१-०४-१९९६ ते १५-१२-२००६ या कालावधीशी संबंधीत माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ अ) औरंगाबाद महानगरपालिका, शिक्षक सहकारी पतसंस्थेने, मागील (१०) वर्षात कर्ज थकबाकीदार सभासदावर कलम (१०१) अन्वये केलेल्या कारवाईचा तपशील खालील विवरणपत्रात उपलब्ध करावा.

विवरणपत्र क्र “अ”

| अ.क्र. | कर्जदार सभासदाचे नांव | संस्थेचा सभासद क्रमांक | थकीत रक्कम (आकडे रु.त) | तालुका निबंधक कार्यालयाचा मंजुरी संदर्भ (आदेश क्र. व दिनांक) |
|---|---|---|---|---|

(ब) सदरील शिक्षक सहकारी संस्थेने काही मयत, विकलांग कर्जदार सभासदांचे कर्ज माफीसाठी प्रस्ताव सादर केले असल्यास, आपल्या कार्यालयाकडून मंजूरी दिलेल्या संबंधीत सभासदांची यादी व रक्कमेचा तपशील खालील विवरणपत्रात द्यावा.

विवरणपत्र क्र. (ब)

| अ.क्र. | मयत कर्जदार सभासदाचे नांव | संस्थेचा सभासद क्रमांक | थकीत रक्कम (आकडे रु.त) | माफ केलेली सव्याज रक्कम (रु.त) | तालुका निबंधक कार्यालयाचा मंजुरी आदेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|

क) दि. १-४-१९९६ ते १५-१२-०६ या कालावधीत सदरील पतसंस्थेने थकीत कर्जदार सभासद किंवा कर्जदार सभासद मयत असल्यास त्यांचे वारसदार सभासदांच्या बाबतीत घेतलेले ठराव व सहकार खात्या कडे परवानगीसाठी पाठविलेल्या व परवानगी दिलेल्या ठरावाच्या साक्षांकीत सत्यप्रती.

ड) मा. अ. अ. २००५ च्या कलम (२) अन्वये मागील पाच वर्षाच्या कालावधीतील सदरील पतसंस्थेच्या खालील दस्तऐवज, अभिलेख्यांची पाहाणी / तपासणी करावयाची आहे. आवश्यकता वाटल्यास तत्संबंधीत दस्तऐवज व अभिलेख्यांच्या प्रमाणीत प्रती घ्यावयाच्या आहेत.

I) दि. १-४-२००१ ते १५-१२-२००६ या कालावधीत सदरील सहकारी पतसंस्थेने आपल्या कार्यालयाकडे कलम (१०१) अन्वये दाखल केलेल्या प्रस्तावांच्या व त्यावर आपल्या कार्यालयातर्फे कारवाई केलेल्या संचयिका व याद्या यांची पाहणी करावयाची आहे.

II) सदरील म. न. पा. शिक्षक सहकारी पत संस्थेविरुध्द मागील पाच वर्षाच्या कालावधीत आपल्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व त्यावर आपल्या कार्यालयाने केलेल्या कारवाई संदर्भातील तपशील आणी तत्संबंधीत नस्तिकांची, अभिलेख्यांची पाहणी व तपासणी करावयाची आहे.

III) मागील १० वर्षाच्या (दि. १-४-१९९६ ते ३१-३-२००६) या कालावधीच्या सदरील शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या ऑडीट रिपोर्टसची पाहणी, तपासणी व सदरील कालावधीतील वसूल झालेल्या थकबाकीदार सभासदांची यादी (मुद्दल व व्याज) पाहिजे.

वरील माहितीची मला आवश्यकता असून, मा. अ. नियम २००५ कायद्याच्या कलम ७ (१) प्रमाणे / तरतुदीनुसार निर्धारत शुल्क रोखीने भरावयास मी तयार आहे.”

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीपोटी १०० रुपये इतके शुल्क शासकीय कोषागारात भरण्याची सूचना दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने दिनांक ०८-०२-२००७ रोजी १०० रुपये इतके शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक नसलेल्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०९-०२-२००७ रोजी पुरविल्याचे जन माहिती अधिकारी आज सुनावणीमध्ये सांगत आहेत तर सदर माहिती अपिलार्थीस दिनांक १२-०२-२००७ रोजी प्राप्त झाली असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण २ पानांची माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. दोन पानाच्या माहितीसाठी शंभर रुपये इतके शुल्क का आकारले हे विचारले असता यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण दिले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती संस्था पातळीवरची असून ती त्यांना संबंधीत संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. अपिलार्थीस नक्की किती पानाची माहिती द्यावी लागेल यासंदर्भात त्यांनी संस्थेकडे त्यावेळी तोंडी विचारणा केली असता सदर संस्थेने त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती अंदाजे ५० पृष्ठांची असल्याचे कळविल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस १०० रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. त्यांनी अपिलाची, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती दिली, अभिलेख्याचे निरिक्षण करण्यास परवानगी दिली नाही व अवाजवी फी आकारली अशी कारणे दिली आहेत व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २९-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०४-०४-२००७ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्याची पाहणी करण्यास अनुमती देण्याचे आदेशीत केले व तसेच त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली परिपूर्ण माहिती अपिलार्थी यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांच्या कडून काहीही कारवाई न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उशिरा, अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे नमूद केले आहे. तसेच केवळ २ पानांच्या माहितीसाठी त्यांनी १०० रुपये शुल्क अधिक आकारल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अभिलेख पाहण्यासाठी आदेश करुनही त्यांनी अपिलार्थीस अभिलेख पाहण्यासाठी परवानगी दिली नाही व त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये जन माहिती

अधिकारी यांनी अडथळे निर्माण केल्याचे नमूद करुन राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या या अपिलामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ माहितीसाठीचा अर्ज दिल्यापासून ४९४ इतक्या दिवसांचा कालावधी लोटल्यानंतरही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही. तसेच संस्थेचे सर्व रेकॉर्ड पाहण्यासाठी त्यांना अडथळा निर्माण केला. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई करावी. ते माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक ०५-०२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले असता संबंधीत कार्यालयीन अधीक्षक श्री. सोनटक्के यांनी त्यांना दुरुत्तरे करुन माहिती देण्याचे नाकारले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती ही महानगरपालिका शिक्षक सहकारी पतसंस्थेशी संबंधीत होती. सदर माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नव्हती व ती त्यांच्याकडे कधीही उपलब्ध असत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, संबंधीत सहकारी संस्था आपल्या पातळीवर, आपल्या कार्यालयात स्वतंत्ररित्या ठेवत असते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी संस्थे-कडे विचारणा केली असता सदर माहितीपोटी अपिलार्थी यांच्याकडून ५० पृष्ठांकरिता १०० रुपये इतके शुल्क घेण्याची सूचना त्यांना संबंधीत पत संस्थेकडून प्राप्त झाली व त्यानुसार त्यांनी १०० रुपये इतके शुल्क शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मागणी

केलेली माहिती संबंधीत संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन ती दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या अभिलेख्याची पाहणी / तपासणी करावयाचे म्हटले होते ते सर्व दस्तऐवज, अभिलेखे हे संबंधीत संस्थेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध होते. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अभिलेखे तपासणी संदर्भातील मुद्दयाबाबत संबंधीत संस्थेला त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या अभिलेख्याची तपासणी करण्याचे आदेश दिले होते व या दिनांक ०९-०५-२००७ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थी यांना अग्रेषित केली होती. त्यानंतर सदर संस्थेला परत त्यांच्या कार्यालयातील ११-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणी स्मरणपत्र देखील त्यांच्या कार्यालयाने पाठविले होते. सदर संस्थेने अद्यापही अपिलार्थीस त्यांच्याकडील अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या प्राप्त झालेल्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २९-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ०४-०४-२००७ रोजी पारीत केले आहेत व अपिलार्थीचे अपील मान्य केले आहे. आपल्या युक्तिवादामध्ये पुढे त्यांनी असे सांगितले की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील सर्व उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी महाराष्ट्र सहकार कायद्यातील कलम १०१ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेऊन दिली आहे. अपिलार्थीच्या उर्वरीत माहितीच्या मागण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत संस्थेला वेळोवेळी आदेश देऊन त्याचा पाठपुरावाही केला आहे. संबंधीत संस्थेने अद्यापही अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन व तसेच कोणतेही अभिलेखे

अपिलार्थीस तपासणीसाठी न उपलब्ध करुन देऊन त्यांनी आदेशाचे उल्लंघन केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती व त्यांनी तपासणीसाठी मागितलेले अभिलेखे, नस्त्या उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेचे व्यवस्थापक जे माहिती अधिकारी म्हणून नेमले गेलेले आहेत त्यांच्यावर येते. तेव्हा या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा कोणताही दोष नाही.

या प्रकरणातील त्रयस्थ पक्ष श्री. जीवन भाऊराव काळे, व्यवस्थापक मनपा शिक्षक सहकारी पतसंस्था यांची या प्रकरणी साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती पुरविली असून अपिलार्थीने उपनिबंधक यांच्या कार्यालयाकडे त्यांच्या संस्थेविरुध्द एक तक्रार केली आहे. अपिलार्थी हेतूपूरःस्सर या संस्थेस बदनाम करण्याकरिता या संस्थेवर वेगवेगळे आरोप करत आहेत. आयोगाने आदेशीत केल्यास ते अपिलार्थीस त्यांच्याकडील अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यस तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने केलेल्या अर्जातील बहुतांश माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सहज उपलब्ध असलेली, अशी माहिती नव्हती. अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीच्या शुल्काची रक्कम त्यांनी, संबंधीत पत संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन त्याप्रमाणे अपिलार्थीस १०० रुपये शासकीय कोषागारात भरण्याचे त्यांनी सूचित केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मुद्दा क्रमांक “ड” अन्वये संबंधीत पतसंस्थेच्या दस्तऐवजाची व अभिलेख्याच्या पाहणीची मागणी जन माहिती अधिकारी यांचेकडे केली होती. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत पत संस्थेस दिनांक ०९-०५-२००७ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडील अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी सूचित केले होते व

यासंदर्भात संबंधीत पत संस्थेस दिनांक ११-०७-२००७ रोजी स्मरणपत्र देखील पाठविले होते. तथापि संबंधीत पत संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आदेशाचे पालन केले नसल्याने व त्यामुळे अपिलार्थीस पूर्ण माहिती प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ड (ii) अन्वये सदर संस्थेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या तक्रारीवर त्यांनी केलेल्या कारवाई यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कडे विचारणा केली होती. तथापि या मुद्दयाची दखल जन माहिती अधिकारी यांनी घेतली नसल्याचे व त्याव्दारे अपिलार्थीचे अर्धवट माहिती त्यांच्याकडून पुरविली गेल्याचे येथे दिसून येते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व दोन्ही बाजुंनी केलेल्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळण्या-साठी त्रयस्थ पक्ष म्हणजेच महानगरपालिका शिक्षक सहकारी पतसंस्था ही प्रामुख्याने जबाबदार असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून हेतूतः त्यांचेकडील कोणतीही माहिती दडविल्याचे अथवा त्यांना त्यांचेकडील उपलब्ध माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अधीक्षकानी अपिलार्थी यांच्याशी गैरवर्तन केल्याचे अपिलार्थीने त्यांचे म्हणणे त्यांच्या युक्तिवादामध्ये मांडले आहे. अपिलार्थीने यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही लेखी तक्रार केलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. तथापि या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थिती जाणून घेऊन आवश्यक वाटल्यास संबंधीत कर्मचा-यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ‘‘ड II” संदर्भात -- संबंधीत संस्थेच्या विरुध्द केलेल्या तक्रारीबाबत जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही -- या मुद्दयाची जन माहिती अधिकारी यांनी दखल घेतल्याचे आयोगास आढळून येत

नाही. त्यामुळे त्यांनी आता पर्यत अपिलार्थी यांना दिलेली माहिती अर्धवट ठरते. त्रयस्त पक्ष ही सहकारी पतसंस्था असून या संस्थेस माहिती अधिकार अधिनियतील तरतूदी लागू होत आहेत. हे पाहता सदर संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदींचा भंग केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. संबंधीत संस्थेने त्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत संबंधीत संस्थेवर जन माहिती अधिकारी यांनी सहकार अधिनियमातील तरतुदीनुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्यासाठी त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षाने (संबंधीत व्यवस्थापकाने) अपिलार्थीस पाहण्यासाठी आवश्यक असलेले अभिलेखे त्यांना ७ दिवसाच्या आत पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे. त्रयस्त पक्षाने आज सुनावणीत कबूल केल्याप्रमाणे ते अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत त्यांच्याकडील सर्व अभिलेखे पाहण्यासाठी फक्त एकदा उपलब्ध करुन देतील असे जन माहिती अधिकारी यांनी पहावे. अपिलार्थीस जर त्यांनी सदर अभिलेख या मुदतीत पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिले नाही तर सदर संस्थेवर महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० मधील तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस संस्थेचे अभिलेखे तपासणीसाठी संबंधीत संस्थेने कोणतेही शुल्क लावू नये. अपिलार्थी यांनी सदर अभिलेख्याची तपासणी जास्तीत जास्त चार तासाच्या आत पूर्ण करावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून

कोणतीही माहिती हेतूपूरःस्सर दडविल्याचे अथवा ती देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणतीही कारवाई आदेशीत करण्यात येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून अशा प्रकारच्या आपल्या कार्यशैलीतील त्रुटी त्यांनी येथून पुढे टाळाव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. त्रयस्थ पक्ष -- औरंगाबाद महानगरपालिका शिक्षक सहकारी पतसंस्था यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे तपासणीसाठी उल्लेखित केलेले सर्व अभिलेखे, नस्त्या त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत फक्त एकदाच पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

४. त्रयस्थ पक्ष राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन करतील असे जन माहिती अधिकारी यांनी पहावे.

औरंगाबाद<br>
दिनांक २९-०४-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शशिकांत रामराव पिंपळे, प्लॉट नं. २३, माणक नगर, हिंदू राष्ट्र चौक, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालुका औरंगाबाद अंजूमन बंगला, क्रांती चौक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, शक्ती सहकार इमारत, मध्यवर्ती बसस्थानक मार्ग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०७

निर्णय दिनांक २९-०४-२००८

श्री. काळुराम खंडुजी घोडके, : अपिलार्थी
माजी सरपंच रा. सावरगाव भागडे, पो.
सेवली, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप अभियंता, ल. पा. विभाग (स्था.
स्तर.) उपविभाग, कार्यालय, तालुका
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्था.
स्तर) कार्यालय, तालुका जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. काळुराम खंडुजी घोडके, जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. विभाग (स्था. स्तर.) उपविभाग व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्था. स्तर) कार्यालय हे सर्व

त्यांना आयोगाच्या कार्यालयाने दिनांक १६-०४--२००८ रोजी दूरध्वनीव्दारे आजच्या सुनावणीबाबत कळवूनही आयोगाच्या सुनावणीस विनापरवानगी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामा संदर्भात खालील प्रमाणे मागितली होती.

> “ भागडे सावरगाव शिवारातील पाझर तलाव क्र. (८) चे चालू असलेल्या कामाचे १) अंदाजपत्रक टि. एस. प्रतीमध्ये २) प्रशासकीय मान्यता प्रत ३) कामाची वर्क ऑर्डर या १ ते ३ प्रती झेरॉक्स सर्टिफाईड प्रत मिळणे बाबत. ”

अपिलार्थीचे सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०१-०३-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जावर दिलेल्या पोच सहीवरुन दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने व माहिती देण्यासाठी सबंधितांनी टाळाटाळ केल्याने त्यांनी त्यांच्या मूळ माहितीसाठीचे हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी ठेवल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना लिहिलेल्या दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचा उल्लेख केला आहे व सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसावा.

जन माहिती अधिकारी यांनी या दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी रुपये ७०० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक त्या माहितीपासून कसे वंचित ठेवले गेले आहे याचे स्पष्ट निवेदन केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. आजच्या सुनावणीची कल्पना या तिघांनाही आयोगाकडील दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या नोटीसव्दारे दिली होती. तसेच आयोगाच्या कार्यालयातून दिनांक १६-०४-२००८ रोजी ११-२० वाजता दूरध्वनी वरुनही आज रोजीच्या या अपिलाच्या सुनावणीस हजर राहण्याची सूचना केली होती. आयोगाची सूचना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील शाखा अभियंता श्री. कासलीवाल यांना दिली होती. आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मर्यादित होती तसेच सदर माहिती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे क्लिष्ट अथवा अवघड नव्हते. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये कल्पना दिली होती. या पत्राचा संदर्भ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या पत्राशी जोडलेला आहे. सदर पत्र अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी केलेल्या प्रथम अपिलाशी संबंधीत असावे असे सकृतदर्शनी अनुमान काढण्यात येत आहे. यावरुन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची दखल जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०५-२००७ रोजी प्रथम घेतल्याचे दिसून येत आहे. तदनंतर मात्र अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कोणतेही प्रयत्न केल्याचे आयोगास दिसून येत नाही. अपिलार्थीने या प्रकरणात पोस्टमास्तर जालना यांच्याशी पत्रव्यवहार करुन त्यांच्या पत्त्यावर दिनांक ०१-०३-२००७ ते २०-०४-२००७ पर्यत लघुपाटबंधारे विभाग स्थनिक स्तर यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राविषयी माहिती मागविली असता त्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थी यांच्या नांवावर पोस्टाने कोणतेही टपाल आले नसल्याचा पोस्टमास्तर यांनी अपिलार्थीस खुलासा केला आहे. सदर खुलासा त्यांनी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपिलासोबत जोडला आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती मिळण्यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०५-२००७ व २८-०५-२००७ रोजी पत्रव्यवहार केल्याचेही येथे दिसून येत आहे. अपिलाथीने व्दितीय अपील अर्जासोबत दिलेल्या पत्राच्या प्रतीवरुन जन माहिती अधिकारी व जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे केलेल्या अर्जावर / अपील अर्जावर कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास दिसून येत नाही. कदाचीत अपिलार्थीस मागणी केलेली माहिती द्यावयाची नाही असा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चिय केला होता किंवा कसे असे वाटण्याइतपत येथे परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती विचारण्याचा हक्क आहे व अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे व मुदतीत देणे हे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम ७ अन्वये अपेक्षित आहे. हे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती देणे अनिवार्य आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य माहिती देणे भाग आहे. अपिलार्थीचा दिनांक ०१-०३-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला आहे व सदर अर्जाची पोच जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जावरील झेरॉक्स प्रतीवर दिली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही हा दावा आयोग फेटाळून लावत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित

ठेवल्याबद्दल व त्याव्दारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (जलसंपदा विभाग) यांनी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची व बेपर्वाईची त्यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (जलसंपदा) यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २९-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काळुराम खंडुजी घोडके, माजी सरपंच रा. सावरगाव भागडे, पो. सेवली, तालुका जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल. पा. विभाग (स्था. स्तर.) उपविभाग, कार्यालय, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल. पा. (स्था. स्तर) कार्यालय, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा विभाग) मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००४

निर्णय दिनांक : २९.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रशांत पोपशेटवार,<br>रा. गांधी चौक, ता. भोकर<br>जि. नांदेड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नांदेड. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. प्रशांत पोपशेटवार (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.तर जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड. यांचे प्रतिनिधी

उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) श्री. मनोहर धोंडीबाराव पाटील, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्थ पक्ष श्री. नंदू मनोहरराव बारडकर हे हजर आहेत

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षा संदर्भात एकूण सहा मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहेत.

> '१) आपल्या प्रा.शिक्षण विभागात नंदू बारडकर हे जि.प.प्रा.शा.नविन कौठा येथील शिक्षक प्रतिनियुक्तीवर किती वर्षे (कार्यकाळ) होते त्यांच्या प्रतिनीयुक्ती ची व कार्यालयातून कार्यमुक्तीच्या आदेशाच्या प्रति मिळणेबाबत.
>
> २) उपरोक्त प्राथमिक शिक्षकाला कार्यालयामध्ये प्रतिनियुक्तीवर असण्याचे कारण काय त्यांना ज्या पदावर नियुक्त करण्यांत आले होते. त्या पदाचा शैक्षणिक जाणकार, अनुभवी कर्मचारी आपल्या कार्यालयात उपलब्ध नव्हता का किंवा तशी शैक्षणिक पात्रता असलेला कर्मचारी कार्यालयातच नव्हता का त्यांनी प्रतिनियुक्ती कार्यकाळात केलेल्या कामाच्या तपशिलाच्या साक्षांकित प्रति मिळणे.
>
> ३) प्रतिनियुक्ती कार्यकाळात कर्मचाऱ्यांना ज्यादा वेतवाढ देण्यात येते का असे शासन नियमाला अनुसरुन आहे का असल्यास त्याची तपशिलवार माहिती.
>
> ४) आयुक्तांनी प्रतिनियुक्ती त्यांच्या परवानगीशिवाय करण्यात येवू नये असे आदेश काढले होते, संबंधीत शिक्षकांची प्रतिनीयुक्ती आयुक्तांच्या आदेशाला अनुसरुन आहे का याचे उत्तर कळावे.
>
> ५) संबंधीत शिक्षकांना आपल्या विभागातून कार्यमुक्त का करण्यात आले त्यांच्या शै.पात्रतेनुसार दुसरा कर्मचारी आपल्या विभागास उपलब्ध झाला का किंवा दुसरे कारण काय समजावे.
>
> ६) उपरोक्त प्रमाणे मागितलेली सपुर्ण माहिती उपलब्ध नसल्यास त्याचे कारणे पत्र सोबत जोडावे.'

अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अर्जास अधिनियमातील तरतुदीअन्वये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर दि. २६.२.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २६.२.२००७ रोजी पारित केले. सदर आदेश खालीलप्रमाणे आहेत.

> ‘श्री. नंदु बारडकर यांचे प्रतिनियुक्ती केल्याचे आदेश व प्रतिनियुक्ती रद्द केल्याचे आदेशाची प्रत. श्री. नंदु बारडकर यांना अतिरिक्त वेतनवाढ दिलेल्या आदेशाची प्रत व ज्या प्रस्तावामध्ये श्री. बारडकर यांचे नाव आहे. त्याप्रस्तावातील त्यांचे नाव ज्या पानावर आहे त्यापानाची सत्य प्रत देण्यांत यावी.‘

जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २.३.२००७ रोजी त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिली. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करतांना जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची त्यांनी विनंती केली होती. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडाची कोणतीही कार्यवाही न केल्याने व्यथित होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.४.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल

अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना वेळेवर माहिती न दिल्याने, त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजुन सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांचे कार्यालयात दि. २२.१२.२००६ रोजी प्राप्त झाला.सदर अर्जातील माहिती शिष्यवृत्ती विभागाशी संबंधित असल्यामुळे, तो अर्ज सर्वसाधारण परिस्थितीत शिष्यवृत्ती विभागाकडे जाणे अपेक्षित होते. तथापि नोंदणी विभागाकडून अपिलार्थीच्या अपिल अर्जावर, 'नियुक्ती विभाग' असे नोंदविण्यात आल्याने अपिलार्थीचा अर्ज नियुक्ती विभागाकडे पाठविला गेला. अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर अंदाजे १५ दिवसांचे कालावधीनंतर अपिलार्थी स्वतः माहिती घेण्यासाठी उपस्थित झाल्यानंतर, अपिलार्थीने अशाप्रकारचा माहितीसाठीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे केला असल्याचे त्यांना प्रथम समजले. त्यानंतर त्यांनी तो अर्ज प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तयार करुन ठेवली. तथापि मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.१.२००७ रोजी प्रथम अपिल केले होते. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.२.२००७ रोजी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस, त्यांना अपेक्षित असलेली माहिती दि. २.३.२००७ रोजी व्यक्तीशः देण्यात आली. सदर माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीस त्यांचे कार्यालयातील दि. १.३.२००७ रोजीच्या पत्रावरील अपिलार्थीची पोचसही आयोगास दाखविली. सदर माहिती अपिलार्थीस दि. २.३.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे या पोचसहीवरुन दिसून येते.

त्रयस्थ पक्ष यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने करण्यात आलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र. ४,५ व ६ या संदर्भातील माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या माहितीच्या अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडून कारणे व खुलासा अपेक्षित केला आहे, जो अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्या क्र. १,२ व ३ च्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत माहिती देणे आवश्यक होते. तथापि या प्रकरणात जी माहिती अपिलार्थीस दि. २१.१.२००७ रोजी सर्वसामान्य परिस्थितीत मिळणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, त्यांचेकडील दि. १.३.२००७ च्या पत्रान्वये दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती तितकीशी बरोबर नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्यांतील मुद्दा क्र.२ मध्ये त्रयस्थ पक्षांने त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कार्यकाळात केलेल्या कामाच्या तपशीलाच्या साक्षांकित प्रती मागितल्या होत्या. जन माहिती अधिकारी यांना आज सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षाने प्रतिनियुक्तीच्या काळात त्यांचेकडे निश्चितपणे कोणते काम केले, अशी विचारण केली असता, त्यांनी त्रयस्थपक्षाने या कालावधीमध्ये सहायकाचे काम केले होते,असे आयोगास सांगितले. त्रयस्थ पक्षाने केलेले काम कोणत्याही परिमाणाने मोजता येणे शक्य नसल्याने व त्यांनी वर्कशीटही ठेवले नसल्याने, ही माहिती अपिलार्थीस मिळवता आली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती देतांना मुद्दा क्र. २च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाने निश्चित कोणत्या प्रकारचे काम केली, याचे सर्वसाधारण स्वरुप कळविण्यास सर्वसाधारण परिस्थितीत

हरकत नव्हती, परंतु त्यांनी तशाप्रकारची माहिती अपिलार्थीस दिली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून उशिरा माहिती प्राप्त झाली असल्याचे कारणावरुन त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती आयोगास केली आहे. अपिलार्थीस जी माहिती दि. २१.१.२००७ रोजी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त होणे आवश्यक होते, ती माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. १.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना प्राप्त झाली आहे. अधिनियमाद्वारे माहिती देण्यासाठी विहित कालावधी वजा केला असता सदर माहिती अपिलार्थीस एकूण ३९ दिवसांच्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे युक्तीवादामध्ये वर स्पष्ट केले आहे. केवळ अपिलार्थीचा प्रथम अर्ज चुकीच्या शाखेला पृष्ठांकित केला गेल्याने अपिलार्थीस अंतिमतः माहिती उशिरा प्राप्त झाली. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे अपिलार्थी यांनी अर्ज दिल्यानंतर सुमारे १५ दिवसांचे कालावधीनंतर तो जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर देखिल अपिलार्थीस त्यांना आवश्यक ती माहिती पुरविण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने दि. २४.१.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केले. जर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती द्यावयाची इच्छा असती तर त्यांनी कमीत कमी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केल्यानंतर लागलीच ती देऊ केली असती. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी व अधिकारी यांनाही माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती प्राप्त होण्यास जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक हे जबाबदार ठरतात. अपिलार्थीस एकूण ३९ दिवसांच्या विलंबाने त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरवून जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी स्वतःला अधिनियमातील

कलम २० च्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांचेवर विलंबाचे प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण ३९ दिवसांचे विलंबाकरिता रु. ९७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा जास्तीत जास्त ५ हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात करण्यात यावा.

> '००७० इलुङ्क सुह्रिंुक ैहु-६० इलुङ्क ैहु-८०० इलुङ्क ज्रु ३क्कु-१८ ठुं ल्लुटु अुयुकुङ्क ००७०-००६-१'

शास्तीच्या रकमेचा १ ला हप्ता माहे जून, २००८ मध्ये भरावा. या शास्तीची अधिकारी/कर्मचारी निहाय विभागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत करावी व संबंधित कर्मचारी हे या शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात दरमहा नियमितपणे करतील असे पहावे. आपला अनुपालन अहवाल शास्तीची संपूर्ण रक्कम भरणा होईपर्यंत दरमहा आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

५. अपिलार्थीचे अपिल मान्य.

६. जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विहित मुदतीपेक्षा ३९ दिवस माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल, लावलेल्या विलंबासाठी, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.९७५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत भरावी.

७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर

अधिकारी/कर्मचारी यांना लावण्यात आलेल्या शास्तीची कर्मचारी/अधिकारीनिहाय विभागणी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावी.

८. संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी शासकीय कोषागारात सदर शास्तीचा भरणा केल्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी जुन, २००८ पासून पुढे दरमहा आयोगास आपला अहवाल, सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे जमा होईपर्यंत, सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक : २९.०४.२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त ,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रशांत पोपशेटवार,रा. गांधी चौक, ता. भोकर जि. नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०८

निर्णय दिनांक : २९.०४.२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे,<br>नांदेड. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा अधिव्याख्याता, जीवरसायनशास्त्र विभाग,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अधिष्ठाता,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, जीवरसायनशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड श्री. विनायक गोविंदराव तांदळे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड श्री. प्रकाश तुळशीराम वाकोडे (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २०.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन १९९१ ते २००६ या कालावधीशी संबंधित वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या संबंधात खालीलप्रमाणे दोन मुद्यावर माहिती मागितली होती.

> '१) सन १९९१ साली वर्ग-४ रुग्णालयीन व महाविद्यालयीन एस.एस.सी. पास कर्मचाऱ्यांची एकत्रीत जेष्ठता यादी आणि
>
> २) आजच्या तारखेत वर्ग-४ रुग्णालयीन व महाविद्यालयीन एस.एस.सी.पास कर्मचाऱ्यांची एकत्रीत जेष्ठता यादी मिळणेबाबत.'

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये दि. २३.०३.२००७ रोजी प्रथम अपिल सादर केले आहे. सदर अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार

अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले असून या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. आयोगाकडे सादर केलेल्या या अर्जामध्येही त्यांनी संबंधितांनी त्यांना विहित कालावधी पूर्ण होऊनही दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कोणती माहिती दिली, याचा पुरावा त्यांनी या द्वितीय अपिल अर्जासोबत जोडला नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपिल अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर जानेवारी, २००८ पासून कार्यरत असून अपिलार्थी यांनी मूळ अर्ज करतेवेळी ते या पदावर कार्यरत नसल्याने त्यांना या प्रकरणाची काहीही माहिती नाही. तथापि ते आता अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते जन अपिलीय अधिकारी या पदावर २२.१२.२००७ पासून कार्यरत असून त्यांना या प्रकरणाची काहीही माहिती नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती सरळ व सोपी होती. तथापि इतकी सोपी माहिती देखिल जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस सुमारे सव्वा वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही देऊ शकले नाहीत, ही बाब दुर्दैवी आहे. वैद्यकीय

खात्याच्या प्रशासनाची पातळी किती खाली येऊ शकते, याचे हे प्रकरण म्हणजे मुर्तीमंत उदाहरण ठरत आहे, असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारची सकारात्मक कार्यवाही केल्याचे येथे दिसून येत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणाची काहीही माहिती नसल्याचे त्यांनी केलेल्या युक्तीवादावरुन स्पष्ट होत आहे. कोणत्याही जन सामान्यांच्या माहितीच्या अर्जाप्रती याहून मोठा अनादर शासकीय यंत्रणांकडून व्यक्त केला जात असेल असे वाटत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकाने सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितल्यास ती ३० दिवसांचे आत देण्याबाबतची तरतुद सर्व शासकीय प्राधिकरणांना अवगत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंमलात येण्यापूर्वी राज्यामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या तरतुदी अंमलात होत्या, त्यामुळे माहिती अधिकाराचे महत्व जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना माहित नव्हते, असे मानण्याचे कोणतेही कारण नाही. केवळ इच्छाशक्तीचा अभाव, याच एका कारणास्तव त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी त्यांचेकडील दि. २२.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकाऱ्याकडे पाठवून दिला आहे. संबंधित प्रशासकीय अधिकारी यांनी दि. १८.१२.२००६ रोजी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसदृश माहिती, जन माहिती अधिकारी यांना पुरविली देखिल आहे. तथापि सदर माहिती अपिलार्थीस मिळाली किंवा कसे, हे उपलब्ध

कागदपत्रांवरुन कळून येत नाही. संबंधित प्रशासकीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, असे दिसून येते की, त्यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या दि. १.१.२००१ रोजीच्या सेवाजेष्ठता याद्या जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविल्या होत्या. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे १९९१ व २००६ या वर्षीच्या दोन वेगवेगळया सेवाजेष्ठता याद्या मागितल्या होत्या. तथापि प्रशासकीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २००१ ची एकच सेवा जेष्ठता यादी दिल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थीस द्यावयाची माहिती तयार करतांना त्यांचेकडून या प्रकरणामध्ये आवश्यक तितके लक्ष घातले नसल्याचे दिसून येते. थोडक्यात वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या बेपवाई व अनास्थेमुळे अपिलार्थी हे त्यांना संबंधितांकडून माहिती मिळविण्याचा हक्क असतांनाही माहिती प्राप्त करुन घेण्यास मात्र वंचित राहिलेले आहेत. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस देण्यास कोणत्याही प्रकारे विलंब लागणे,कशाही प्रकारे संभवत नाही. अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यामागे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव, माहिती अधिकाराच्या तरतुदीविषयी असलेली अनास्था व कार्यशैलीतील एकूण बेपर्वाई असे त्यांच्या कार्यपध्दतीतील विविध घटक कारणीभूत असल्याचे दिसून येते. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वत:ला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस नि:संशयपणे पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवण्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त पाच हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात करण्यात यावा.

"००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा- ८०० इतर जमा रक्कम-१८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१"

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याकरिता त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांना देखिल माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे. त्यामुळे याप्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी या सर्वांना मिळून ही शास्ती एकत्रित लावण्यात येत आहे. सदर शास्तीची अधिकारी/कर्मचारीनिहाय विभागणी अधीष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत करावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी/कर्मचारी हे शासकीय कोषागारात नियमितपणे शास्तीचे हप्ते भरतील, असे पहावे व त्याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास जून, २००८ पासून नियमितपणे शास्तीच्या रकमेचा शासकीय कोषागारात पूर्णपणे भरणा होईपर्यंत आयोगास दरमहा सादर करावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशार्त ि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ स्पष्ट केली आहे, याची नोंद सचिव (वैद्यकीय शिक्षण) यांनी यथायोग्यरितीने घ्यावी, असे त्यांना या प्रकरणी सूचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपिलार्थीचे अपिल मान्य.

२. जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय सव्वा वर्ष माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल लावलेल्या विलंबासाठी, विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- याप्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रकमेचा भरणा त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत शासकीय कोषागारात करावा.

३. अधीष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांनी वरील आदेश क्र. २ चे अनुपालन वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद<br>
दिनांक : २९.०४.२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त ,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, संपादक साप्ताहिक प्रवक्ता, पत्रपेटी क्र.५, मुख्य पोस्ट ऑफीस, नांदेड-१.

२ जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, जीवरसायनशास्त्र विभाग,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (वैद्यकीय शिक्षण), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ कोषागार अधिकारी, नांदेड कोषागार कार्यालय, नांदेड.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/११०९

निर्णय दिनांक : २९.०४.२००८

१ श्री. सादूल्लाखान हमिदखान, : अपीलार्थी
घ.क्र.९-२-२१, ब्रम्हपूरी चौफाळा
पाणीटाकीजवळ, चौफाळा, नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
नांदेड.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सादूल्लाखान हमिदखान (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड व त्रयस्थ पक्ष श्री. मोहंमद इब्राहिम शेख लाल हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नांदेड श्री. साहेब संतुका तोटेवाड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ०४.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड शहरातील सिटी सर्व्हे क्रमांक १३१५१, १३१५५ व १३१५७ च्या मालकीहक्काचे संदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"फेर क्रमांक ५०५ दि. २३.६.८९ ची संचिकेची संपूर्ण प्रती"

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.१०.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची नस्ती त्यांचे कार्यालयात शोध घेऊनही मिळू शकली नसल्याचे कळविले आहे. थोडक्यात अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून पुरविण्यात आलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.११.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दि. १८.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती संबंधित कार्यालयाकडून मागितली असल्याचे कळवून संबंधितांकडून सदरची माहिती प्राप्त होताच, अपिलार्थीस कळविण्याविषयी त्यांनी आश्वासित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांचेकडे आज रोजी उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही १९८९ सालातील असून, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या या पी.आर.कार्डामध्ये झालेला फेरबदल दि. २३.६.८९ रोजी कोर्टाच्या निर्णयानुसार केलेला आहे. अपिलार्थीने मागितलेले अभिलेखे कोणत्या प्रवर्गात मोडतात,, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संबंधातील अभिलेखे 'ब' प्रवर्गात मोडत असल्याचे स्पष्ट केले. 'ब' प्रवर्गातील अभिलेखे जतन करण्याचा कालावधी तीस वर्षांचा असतो, हे जन माहिती अधिकारी यांना सांगितल्यानंतर त्यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली संचिका त्यांचे कार्यालयात पुःनश्च् शोधण्याचे आयोगास आश्वासित केले. अपिलार्थीने ज्या सिटी सर्व्हे क्रमांकाच्या फेरफाराच्या संचिकेची प्रत जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती, त्या सर्व्हेनंबरची सर्व पी.आर.कार्डस् त्यांनी अपिलार्थीस मोफत पुरविली आहेत. या पी.आर.कार्डवरुन सध्याचे संबंधित सि.स.क्रमांकाचे मालक कोण आहेत याचा बोध होत आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही 'ब' प्रवर्गाच्या अभिलेखामध्ये मोडत असल्यामुळे व सदर कालावधी अद्याप व्यपगत झाला नसल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असणे गरजेचे आहे. यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा त्यांनी पुःनश्च् शोध घेणे सोईचे होईल, असे आयोगास वाटते. सबब अपिलार्थीस माहिती मिळण्याचे दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांनी मागणी

केलेली माहिती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पाश्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दि. ४.९.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २९.०४.२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सादूल्लाखान हमिदखान,घ.क्र.९-२-२१, ब्रम्हपूरी चौफाळा,पाणीटाकीजवळ, चौफाळा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७२३

निर्णय दिनांक ३०-०४-२००८

श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, : अपिलार्थी
नगरपरिषद सदस्य, उस्मानाबाद
मेन रोड, निबाळकर गल्ली,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी नगरपरिषद,
उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक
संचालक, नगरपरिषद प्रशासन,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, उस्मानाबाद
जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद उस्मानाबाद श्री. रवि रामचंद्र पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे

संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार श्री. पद्‌माकर कुलकर्णी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील घर क्रमांक ३/७९ संदर्भात १९८३ ते २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " घर क्र. ३/७९ मेन रोड उस्मानाबाद मालक श्री. दगडू संताजी पाटील हे मयत झाल्यानंतर (दि. ३/७/१९८३) त्यांचे नामांतर नगरपरिषदेने शिवजी संताजी पाटील कोणत्या कागदपत्राअधारे केले त्या कागदपत्राची सत्यप्रत तसेच शासनाच्या आदेशाप्रमाणे आवश्यक असलेल्या कागदपत्राची नावे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेत उपलब्ध होती ती संचिका वाळवीने नष्ट झाल्याने सदर माहिती अपिलार्थीस देता येत नसल्याचे कळविले. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील उर्वरीत मुद्यांची माहिती अपिलार्थीस त्यांनी या पत्रामध्ये दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न देऊन नगरपरिषदेमधील गैरकारभारास पाठीशी घातल्याचे प्रयत्न केल्याचे

म्हटले व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ३१-०३-२००६ रोजी पारीत केले. सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना नामांतराची संचिका घर क्रमांक ३/७९ मेन रोड उस्मानाबाद वाळवी लागल्यामुळे नष्ट झाल्या प्रकरणाची चौकशी करण्याची व संबंधीत कर्मचा-यावर यथोचित कारवाई करण्याचे आदेश दिले तसेच संचिकेतील काही भाग उपलब्ध असल्यास तो ज्या स्थितीमध्ये होता त्या स्थितीत त्या भागाची सत्यप्रत अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे या आदेशामध्ये म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांना अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीन्वये दंडीत करण्याची आयोगास विनंती केली आहे. या अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीपासून माहिती दडवून ठेवत आहेत, त्यांना माहिती मिळण्यास अडथळे निर्माण करुन व त्यांनी माहिती नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे त्यामळे त्यांच्याकडून अधिनियमातील कलम २० (२) प्रमाणे कारवाई होण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती बरीच जुनी असून ती १९८३ ते २००५ या कालावधीशी संबंधीत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध होती त्या संचिकेस वाळवी लागून ती नष्ट झाली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ ते आयोगाससमोर शपथपत्र सादर करण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दुस-या मुद्यावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केलेली चौकशी ते एक महिन्याचे आत पूर्ण करण्यास व संबंधित दोषी कर्मचा-यावर कार्यवाही करण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २४-०३-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दिनांक ३१-०३-२००६ रोजी पारीत केले आहे. आपल्या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना वाळवी लागलेल्या रेकॉर्ड नष्ट झाल्याच्या प्रकरणात चौकशी करण्याचे आदेश दिले होते व संचिकेतील काही भाग उपलब्ध असल्यास त्या भागाची आहे त्या स्थितीत अपिलार्थीस सत्यप्रत देण्याचे आदेशीत केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १ दिवसाच्या विलंबाने पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात आयोगासमोर असे स्पष्ट केले की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे अधिनियमातील कालावधीमध्ये कधीही फिरकले नाहीत. अपिलार्थीने मागितलेली

माहिती त्यांच्याकडे दिनांक २०-०२-२००६ रोजी तयार होती तथापि अपिलार्थी हे ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी एक दिवस उशीरा आल्याने त्यांना ती उशिराने प्राप्त झाली. अपिलार्थीस उशिराने माहिती प्राप्त होण्यासाठी प्रामुख्याने ते जबाबदार आल्याचे येथे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती ज्या संचिकेत होती ती संचिका वाळवीग्रस्त झाल्याने त्यातील माहिती नष्ट झालेली आहे या घटनेस जबाबदार असलेल्या कर्मचा-यावर जन माहिती अधिकारी यांनी शिस्तभंगाची करवाई करण्याकरिता दिनांक ३०-०६-२००६ रोजी नोटीस देखील पाठविली आहे. आजच्या सुनावणीमध्ये या चौकशीची कारवाई एक महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आश्वासीत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एक दिवस विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत असून अशा प्रकारचा विलंब त्यांनी यापुढे टाळावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सदर माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध होती ती संचिकाच आता नष्ट झाल्याने सदर माहिती आता अपिलार्थीस प्राप्त होऊ शकणार नाही हे उघड आहे. याचबरोबर अभिलेख्यास वाळवी लागण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांचा सरळ संबंध पोहोचत नाही. कागदपत्रास वाळवी लागणे या प्रक्रीयेस प्रदीर्घ कालावधी लागत असतो मात्र महत्वाचे अभिलेखे नीटपणे जतन करण्याचे काम त्यांच्याकडील संबंधित कर्मचा-याने चोखपणे पार पाडले नसल्याचे येथे सिध्द होत आहे. अर्थात यासंबंधातील चौकशी पूर्ण करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची कबूली जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दिली आहे. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी पूर्णतः जबाबदार ठरवता येत नाही तसेच त्यांनी या अभिलेख्यास मुद्दाम वाळवी लावून ते नष्ट केल्याचा प्रत्यक्ष पुरावा अपिलार्थीने आयोगासमोर सादर केला नसल्याने अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांनी माहिती नष्ट करण्याचा

प्रयत्न केला, ती त्यांच्यापासून दडवून ठेवली व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्यापासून ते अडथळे निर्माण करीत आहेत हे सर्व आरोप आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे एक दिवस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ३०-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, नगरपरिषद सदस्य, उस्मानाबाद मेन रोड, निबाळकर गल्ली, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१११०

निर्णय दिनांक ३०-०४-२००८

श्री. श्रीरंग मारुती वारे, : अपिलार्थी
मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सदस्य सचिव, पीपल्स एज्युकेशन
सोसायटी, आनंदभवन, जी. एन. रोड,
फोर्ट, मुंबई - २३

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन
सोसायटी, आनंदभवन, जी. एन. रोड,
फोर्ट, मुंबई - २३

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०४-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. श्रीरंग मारुती वारे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व उपाध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई श्री. दत्ता गणेश देशकर हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सदस्य

सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी व जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या पदाधिका-यांच्या संदर्भात खालील प्रमाणे एकूण ६ मुद्यावर माहिती मागितली होती.

" अ. मा. चेअरमन के. एच. रंगनाथ ज्या तारखेस पी. ई. एस. चे चेअरमन झाले, ती तारीख, महिना व वर्षाची माहिती द्यावी.

ब. डॉ. गंगाधर पानतावणे, डी. जे. गांगुर्डे व श्रीमान भालचंद्र वराळे ह्यांना संस्थेचे सदस्य म्हणून जाहीर केल्याची तारीख, महिना व वर्ष, ही माहिती द्यावी.

क) प्राचार्य ए. एच. शामकुलेंना सस्पेंड करण्यासाठी सह संचालक उच्च शिक्षण ह्यांची परवानगी घेतली होती काय ? घेतली असल्यास त्याची झेरॉक्स प्रत द्यावी.

ड) प्राचार्य ए. एच. शामकुलेंना सस्पेंड करण्यासाठी गव्हर्निंग बॉडीत हा ठराव चेअरमनने मंजूर करवून घेतला होता काय ? हा ठराव मंजूर झाला असल्यास त्याची झेरॉक्स प्रत द्यावी.

इ) प्राचार्य शामकुलेंना पदावनत (लेक्चरर) करण्यासाठी गव्हर्निंग बॉडीच्या मिटींगमध्ये हा ठराव मंजूर करण्यात आला होता काय ? मंजूर झालेल्या ठरावाची झेरॉक्स प्रत द्यावी.

फ) प्राचार्य शामकुलेंना पदावनत करण्याचे कारणांची माहिती द्यावी. तसेच ज्या आधारावर त्यांना पदावनत करण्यात आले तो कायदा, नियम, जी. आर. वा सर्क्यूलर ह्याची झेरॉक्स प्रत द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे आयोागास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी यासंदर्भात त्यांनी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे नमूद करुन त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती संस्थेतील भ्रष्टाचाराशी संबंधीत आहे. माहितीचा अधिकार कायद्याचा मूळ उद्देश सफल होत नसल्याने या संस्थेची तंत्रशिक्षण खात्यातील सहसंचालक दर्जाच्या अधिका-याकडून चौकशी होणे अगत्याचे आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा मूळ उद्देश प्रशासनातील भ्रष्टाचार संपुष्टात आणण्याचा आहे. परंतु हा कायदा पीपल्स एज्युकेशन

सोसायटीचे सचिव श्री. गांगुर्डे यांनी पाळला नाही. कायद्यानुसार त्यांना माहिती मिळाली नसून माहिती अधिका-याने या कायद्याचा हेतू नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच माहिती अधिका-याने त्यांना माहिती न देऊन त्यांच्या मूलभूत अधिकारावर गदा आणून संविधानाचा व माहिती अधिकार कायद्याचा अवमान केला आहे. त्यांनी मागितलेली माहिती भ्रष्टाचाराशी संबंधीत असल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती पुरविण्यात आली नाही. यासंदर्भात त्यांनी कायद्याचे कलम १९ (१) अन्वये संस्थेचे चेअरमन श्री. रंगनाथ यांच्याकडे अपील सादर केले होते. परंतु त्यावर त्यांनी सुनावणी न घेऊन कायद्याच्या मर्यादा ओलांडल्या आहेत. संस्थेचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे दोघे आपल्या पदाचा बेकायदेशीररित्या दुरुपयोग करत असून जनतेच्या पैशाची अफरातफर होत आहे. त्यामुळे पी. ई. एस. ही संस्था पूर्णतः बदनाम झालेली आहे. या सर्व प्रकारामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले. आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना त्वरीत देण्याची व माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या भ्रष्ट कारभाराच्या चौकशीची जनतेच्या हितार्थासाठी आदेश पारीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती ते त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. यापेक्षा त्यांना जास्त काहीही सांगावयाचे नाही. अपिलार्थीच्या माहिती अर्जाची व अपील अर्जाची संबंधीतांनी दखल न घेतल्याची कारणे त्यांना आज रोजी माहित नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने पी.

ई. एस. या संस्थेसंदर्भात एकूण ६ मुद्दयावर संस्थेचे जन माहिती अधिकारी यांच्या कडे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन केले असता सदर माहिती संबधीत संस्थेकडे निश्चितपणे उपलब्ध असली पाहिजे याची खात्री पटते. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यातील मुद्दा क्रमांक ''क'', ''ड'' व ''इ'' चा सुरुवातीचा भाग वगळता अधिनियमाव्दारे विहित केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याचेही दिसून येते. अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे दखल घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अशाच प्रकारचे वर्तन संस्थेच्या जन अपिलीय अधिकारी यांचे त्यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात आहे. कोणत्याही नागरिकास कायद्यातील तरतुदीनुसार माहिती मागण्याचा हक्क असूनही ती त्यांना कोणत्याही प्रकारे मिळूच द्यावयाची नाही असा जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी पण केला असावा असे वाटण्याइतपत या प्रकरणी परिस्थिती झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याचा हक्क आहे व सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण असल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना अधिनियमातील विहित मुदतीत पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. अपिलार्थीने माहिती मागवूनही त्यांच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ नुसार व जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) नुसार कोणत्याही कारवाई केली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विहित मुदतीत न देण्यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी कोणतीही कारणमिमांसा आयोगासमोर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी

या दोघांच्याही मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण अपिलार्थीस माहिती मिळू न देण्यासंदर्भात आहे असे आयोगास वाटते. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन कलम ७ चा व अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन जन अपिलीय अधिकारी यांनी कलम १९ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. या संस्थेच्या संदर्भात आयोगाकडे यापुर्वी बरीच व्दितीय अपिले प्राप्त झाली. त्यातील सर्व सुनावणींच्या वेळेस संबंधीत जन माहिती अधिकारी हे नेहमीच वैद्यकीय कारणास्तव गैरहजर राहिले आहेत. आजच्या सुनावणीस देखील यांनी संस्थेच्या प्रतिनिधीस आयोगासमोर सुनावणीसाठी हजर केले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये न पुरवून स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी यांना_माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक - ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) - या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती देण्याची अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्याने आता ही माहिती अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (त्यातील मुद्दा क्रमांक ''क'', ''ड'' व ''इ'' मधील प्रश्नांची उत्तरे वगळून उर्वरीत माहिती) त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये या संस्थेच्या भ्रष्टाचाराची चौकशी तंत्र शिक्षण सहसंचालक यांच्याकडून व्हावी असे आदेश देण्यासाठी आयोगाकडून अपेक्षा केली आहे यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की त्यांच्या या संस्थेच्या कथित भ्रष्टाचाराबाबत काही तक्रार असेल तर ती त्यांनी तंत्र शिक्षण खात्याच्या योग्य त्या प्राधिकरणाकडे स्वतंत्ररित्या करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (प्रश्नांची उत्तरे वगळता) त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहकारी आणि कर्मचारी यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळाकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर रुपये

२५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदरील शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे करावा.

औरंगाबाद
दिनांक ३०-०४-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. श्रीरंग मारुती वारे, मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, आनंदभवन, जी. एन. रोड, फोर्ट, मुंबई - २३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, आनंदभवन, जी. एन. रोड, फोर्ट, मुंबई - २३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अधिदान व लेखा अधिकारी अ व ले कार्यालय, प्रशासकीय इमारत, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००५

निर्णय दिनांक : ३०.०४.२००८

१ श्री. रमेशचंद्र एस.रामावत, : अपीलार्थी
जेलकॉर्नर, अंबाजोगाई,जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
नगर परिषद, अंबाजोगाई,
जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सा.प्र.)
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. रमेशचंद्र एस.रामावत (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद, अंबाजोगाई जि.बीड श्री. जाधव देविदास शिवाजीराव ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.)

विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार श्रीमती अनिता शंकरराव भालेराव (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १७.०८.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे कार्यक्षेत्रातील तलावाच्या कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> "१) अंबाजोगाई येथिल हनुमान मंदीर तलावातील गाळ काढणे, मुरुम टाकुण भर घालणे, भिंत उभी करुन लोखंडी जाळया लावणे, झाडे तोडुन तलावाचे पात्र वाढविणे व इतर कामे करुन घेतलेली आहे. या कामासाठी एकुण किंवा वेगवेगळे किती लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले त्याबाबत तपशीलवार लेखी माहिती देण्यात यावे.
>
> २) तलाव दुरुस्ती कामाबाबत दिलेले "वर्क आर्डरची"ची झेरॉक्स प्रत तथा त्या सोसायटी, एजंसीचे नाव देण्यात यावे.
>
> ३) तलाव दुरुस्ती कामाबाबत किती रुपयाचे बिल अदा केले आहे किंवा नाही याबद्दल लेखी माहिती देण्यात यावे.
>
> ४) तलाव व परिसरातील किती झाडे तोडली व झाडाचे लाकडांच्या सदयस्थितीबद्दल माहिती देण्यात यावे.
>
> वरील माहिती बांधकाम विभाग,बिल अदा विभाग, नगर परिषद अंबा. येथे उपलब्ध आहे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी तयार असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व सदर माहिती हस्तगत करुन

घेण्यापोटी प्रतिपृष्ठ रु.२०/- या दराने सदर माहिती त्यांना पुरविण्यात येईल, असेही त्यांनी पत्रामध्ये पुढे म्हटले आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे त्यांचे कार्यालयीन कर्मचाऱ्यामार्फत पाठविले होते. तथापि अपिलार्थी हे त्यावेळी घरी नसल्यामुळे या पत्राची तामिली अपिलार्थीस होऊ शकली नाही. तदनंतर दि. २७.९.२००६ रोजी सदर पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यामार्फत अपिलार्थीस हस्तांतरित करण्यात आले. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ रु. २०/- इतका दर कसा लावण्यात आला, याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी सदर दर साक्षांकित प्रतीचा व नगरपरिषदेने निश्चित केलेला आहे, असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २२.१०.२००६ रोजी प्रथम अपिल केले. या प्रथम अपिलअर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेश द्यावेत व जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० नुसार कार्यवाही करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. १०.१.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपिल मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १.२.२००७ रोजी माहिती दिली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दि. २.२.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज आयोगासमोर कबूल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांचे वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.४.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये जन माहिती अधिकारी

यांनी त्यांना पुरविलेल्या माहितीबद्दल त्यांचे मनात संभ्रम निर्माण झाल्याने पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई व जिल्हाधिकारी, बीड यांना झाडेतोड प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश द्यावेत व जन माहिती अधिकारी आणि त्यांचे सहायक यांचेवर कलम २० नुसार कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नाही, कायद्याला महत्त्व दिले नाही, असंयुक्तीक फी वसूल केली, चुकीचा पत्रव्यवहार केला, अशाप्रकारचे आरोप जन माहिती अधिकारी यांचेवर केले आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीच माहिती प्रथमतः पुरविली नाही, एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही ७ दिवसांचे आत माहिती देण्याऐवजी त्यांनी २० दिवसांनंतर त्यांना अपेक्षित माहिती देऊन माहिती अधिकार अधिनियमाची अवहेलना केली आहे. त्यांनी केलेल्या अशाप्रकारच्या अनियमितपणाबाबत त्यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच या प्रकरणी माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात वारंवार जावे लागले व मनस्ताप सहन करावा लागला, याची नुकसान भरपाई जन माहिती अधिकारी यांचेकडून मिळावी, याचबरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे तलाव परिसरातील झाडे किती तोडली व त्या लाकडाच्या सद्यस्थितीबद्दल माहिती मागितली होती, या बाबत तपशीलवार माहिती न पुरविता त्यांना ‘नगर परिषद अंबाजोगाई यांनी झुडपे काढली असून झाडे तोडली नाहीत’, असे लेखी उत्तर दिले आहे. त्यांनी ज्या तलावासंदर्भात माहिती मागविली होती, त्या तलावाची देखभाल व सुशोभीकरण करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी जय महेश मजूर संस्था अंबाजोगाई यांना रु. ३,२१,०००/- चा कार्यारंभ आदेश दिला होता. त्यानंतर या परिसरातील झाडे तोडली आहेत. या बाबत दिवाणी संहिता १९०८ अन्वये वन परिक्षेत्र अधिकारी,

अंबाजोगाई , पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई व जिल्हाधिकारी,बीड यांनी चौकशी करण्याचे आदेश द्यावेत,असे त्यांनी नमुद केले आहे.

आज जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दि. १२.७.२००७ पासून कार्यरत आहेत. त्यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांचे कार्यालयाने त्यांचेकडील दि. १.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली असून सदर पत्र अपिलार्थीस २.२.२००७ रोजी प्राप्त झाले आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केलेल्या झाडेतोड प्रकरणाची त्यांनी काहीही माहिती नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दि. २२.१०.२००६ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर त्यांनी दि. १४.११.२००६ रोजी आपले आदेश दि. १०.१.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये अपिलार्थीचे अपिल मान्य करुन, अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत सर्व माहिती विनामूल्य देण्याची सूचना केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. १७.८.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सरळ व सोपे होते, तदवत्‌च सदर माहितीची व्याप्ती मर्यादित स्वरुपात होती. एवढे असूनही अपिलार्थीस एवढी साधी माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी सुमारे ४ महिने १५ दिवस इतक्या कालावधीचा विलंब लावलेला असल्याचे दिसून येते, अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २२.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रतिसादही चुकीचा आहे. राज्य शासनाने माहिती अधिकार अधिनियमाद्वारे माहिती पुरविण्यासाठी प्रतिपृष्ठ रु.२/- असा दर दि. ११.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निश्चित केला आहे. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रति पृष्ठ रु.२०/- या दराने अपिलार्थीस माहिती देऊ केली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये साक्षांकित माहिती

मागविली नव्हती तरी देखिल अपिलार्थी हे नेहमी प्रमाणित नकलांची मागणी करीत असल्यामुळे व या प्रकरणी देखिल त्यांनी प्रमाणित माहिती मागवली असणार असे गृहित धरुन त्यांना रु.२०/- प्रति पृष्ठ हा चुकीचा दर जन माहिती अधिकारी यांनी लावलेला आहे. अपिलार्थी यांनी जरी पूर्वी काही प्रकरणात प्रमाणित प्रतींची माहिती मागितली असली तरी या प्रकरणात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रमाणित माहिती मागितलेली नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या इतर दुसऱ्या अर्जाचा संबंध, या प्रकरणात कोणतीही आवश्यकता नसतांना, या अर्जाशी लावलेला आहे व शेवटी या गृहितकावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.२०/-असा दर कळविला आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे द्योतक आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १०.१.२००७ रोजीच्या आदेशाद्वारे ७ दिवसांत अपिलार्थीस माहिती देण्याच्या सूचना करुनही अंतीमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १.२.२००७ रोजी माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांचेकडे दि. २२.९.२००६ रोजी तयार होती. जर त्यांचेकडे सदर माहिती दि. २२.९.२००६ रोजी तयार होती तर त्यांनी अपिलार्थीस ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर म्हणजेच दि. १०.१.२००७ नंतर लागलीच का दिली नाही, या प्रश्नाचे उत्तर जन माहिती अधिकारी यांचे युक्तीवादामध्ये सापडत नाही, किंबहुना अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २२.९.२००६ रोजी खरोखरीच तयार होती किंवा कसे, याबाबत आयोगाचे मनात संदेह निर्माण होत आहे. अपिलार्थीस उशिरा माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला व त्यांचे सहकाऱ्यांना अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सहायक

अधिकारी/कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे. या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक एकत्रितरित्या जबाबदार ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने माहिती पुरविल्यामुळे विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत आयोगास सरळ सादर करावा. सदर खुलासा त्यांचेकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपिल अर्जामध्ये उल्लेखिलेल्या झाडेतोड प्रकरणी संबंधित विभागीय वन संरक्षक, वन विभाग, बीड यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी नगर परिषद, अंबाजोगाई यांचे कार्यक्षेत्रातील तलावाच्या भोवतालच्या सन २००६ मध्ये झालेल्या वृक्षतोडीसंदर्भात सखोल चौकशी करुन त्यावर आवश्यक ती कार्यवाही पुढे करावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल विलंबाचे प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेशचंद्र एस.रामावत,जेलकॉर्नर, अंबाजोगाई, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,नगर परिषद, अंबाजोगाई,जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१११३

निर्णय दिनांक : ३०.०४.२००८

१ श्री. मिर फकर अली मीर जफर अली, : अपीलार्थी

एस.आर.टी. घ.क्र. ११८, लेबर कॉलनी,

औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,
औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, वक्फ मंडळ,पानचक्की,
औरंगाबाद

प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी : अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मिर फकर अली मी जफर अली (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद श्री. शेख जफर शेख इब्राहिम ( त्यांना

यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद श्री. अब्दुल रऊफ शेख (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २९.०१.२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्व्हे नं. १३९ येथील 'दर्गा अब्दुल्ला शाह' महमंदपूरा वाडा आयआयएचएम होस्टेलच्या मागे या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"a) The copy of the total land belonging to the above mentioned Dargah.

b) The appointed Muttawali of the said Dargah by the Waqf Authority if any ?

c) The copy of the NOC given by the waqf Board to the persons who had made the Plotting of the said property and selling the plots by doing Registry."

अपिलार्थीने सदर अर्ज महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील जन माहिती अधिकारी यांच्या नावाने केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.३.२००७ रोजी पत्र देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा त्यांच्या कार्यालयात शोध घेणे चालू असून, ती प्राप्त होताच त्यांना पुरविण्यात येईल, असे कळविले. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ७.५.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे नमुद केले आहे. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे कार्यवाही केल्याचे आयोगास

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांचेकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संपर्क साधण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचेकडील अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापही त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात कोणतीही माहिती दिली नाही. सदर माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे टाळाटाळ करीत आहेत.

आज जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथे कार्यरत असून अपिलार्थीने मागितलेली माहिती औरंगाबाद जिल्हयाशी संबंधित आहे व वक्फ बोर्डाच्या कामकाजामध्ये प्रत्येक जिल्हयातील जिल्हा वक्फ अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांचेकडे त्यांना आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी संपर्क साधण्यास त्यांचेकडील दि. १८.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त करुन घेतली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलाथीने त्यांचा प्रथम अपिल अर्ज जरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून केला असला तरी, त्यांनी प्रत्यक्षतः तो अपिल अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात

सादर केला होता. सदर अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यालयास प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या अपिल अर्जावर ते कोणतीही कार्यवाही अथवा सुनावणी घेऊ शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती सरळ व सोपी होती. अपिलार्थी यांनी त्यांचा माहितीचा अर्ज सादर करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयातील माहिती अधिकाऱ्यास उद्देशून केला होता. संबंधित माहिती अधिकारी यांनी सर्व प्रथम अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती शोधण्याचे काम त्यांचे कार्यालयात चालू असल्याचे त्यांचेकडील दि. १५.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. त्यानंतर अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल केल्यानंतर त्याच माहितीसाठी माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जिल्हा वक्फ अधिकारी,औरंगाबाद यांचेकडे जाण्याचे सूचित केले. या सर्व प्रकारामध्ये अपिलार्थी हे, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. अपिलार्थी यांनी कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहितीसाठी अर्ज करतांना त्यांचा अर्ज जर चुकीच्या अधिकाऱ्याकडे केला असेल तर त्या अधिकाऱ्याने अपिलार्थीचा सदर अर्ज योग्य त्या प्राधिकरणाकडे, त्यांना सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांचे आत हस्तांतरित करावा, अशा स्पष्ट तरतुद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३)(i) मध्ये आहे. तथापि अशाप्रकारची कृती संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून या प्रकरणी केली गेली नसल्याचे दिसून येत आहे. आजही, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती जिल्हा वक्फ अधिकारी,औरंगाबाद यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी, असे आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तीवाद आयोगास मान्य नाही, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यास जबाबदार

असलेले जिल्हास्तरावरील जन माहिती अधिकारी व मुख्य कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग आहेत व त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(i) प्रमाणे त्यावेळी कोणतीही कार्यवाही केली नाही. या सर्व कारणास्तव अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे उत्तरदायित्च मुख्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांचे आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रथम प्रतिसाद देऊन व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणत्याही असमर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ या प्रकरणी दर्शविली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या या प्रकरणातील कार्यशैलीमुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपिलार्थीचे अपिल मान्य.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांचेवर हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मिर फकर अली मीर जफर अली,एस.आर.टी.घर क्र. ११८, लेबर कॉलनी,औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१११४

निर्णय दिनांक : ३०.०४.२००८

१ श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी, : अपीलार्थी
प्लॉट नं. २४०, सद्‌गुरु निवास,
टिळकनगर, सिल्लोड, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,सिल्लोड
जिल्हा औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सा.प्र.)
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०.०४.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,सिल्लोड जि.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी प्रशासकीय अधिकारी श्री. साळवे डी. एस. (त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार

श्रीमती ए. एस. भालेराव (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. १७.०२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण नऊ मुद्यांवर, १०.१.१९८९ ते १७.२.२००७ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली आहे.

"१) सिल्लोड नगर परिषद हद्दीत पिण्याचे पाण्यासाठी दिलेल्या एकुण नळ जोडणी किती आहे (निवासी/अनिवासी वेगवेगळे देणे) नळजोडीची जाडी किती, वार्षिक पाणीपटीचे त्याचे दर किती

२) सर्व नळ जोडणी धारकांचे (ग्राहकांचे अ.क्र.,नांव पत्ता, सर्वे क्र. वॉर्ड क्र. भुखंड क्र./नळ जोडणी दिल्याचे दिनांक/नळ जोडणी देताना फी व अनामत रक्कम व इतर वसुल केलेल्या रक्कमेची पावती क्रमांक व दिनांकासह वर्षनिहायप्रमाणे सविस्तर तक्ते तयार करुन देणे.

३) सर्व नळजोडणी धारकांची पाणीपट्टी रकमेची माहिती वर्षनिहाय तक्ते तयार करन देणे जसे की, मागील थकबाकी, चालु वर्षाची पाणीपट्टी बांधलेली रक्कम दिनांक व पावती क्रमांकसह, व वर्षाअखेर पाणीपटीची राहीलेली येणे बाकी रक्कम याप्रकारे वर्षनिहाय तक्ते तयार करुन देणे.

४) वरिल कालावधीत ज्या नळधारकांची नळजोडणी खंडीत केली त्याचे पुर्ण नाव, नळ जोडणी केल्याची दिनांक व त्यावेळी त्याचे नावे असलेली पाणीपट्‌टी थकबाकीतुन वसुल केलेली रक्कम,दिनांक, पावती क्रमांकासह देणे व नळजोडणीपूर्वत करणेसाठी वसुल फीची रक्कम व दिनांक,पावती क्रमांकासह देणे, सर्व नळधारकांचे वर्षनिहाय तक्ते तयार करुन देणे.

५) दि. १४.२.२००७ पर्यंत पाणीपट्टीचे सर्वात जास्त रकमेचे थकबाकीदार कोण कोण आहेत त्यांची नावे द्यावीत व त्यांची जळजोडणी खंडीत केव्हा केली किंवा काय कार्यवाही केली पुर्ण सविस्तर माहिती द्यावी.

६) दि. १४.२.२००७ रोजी एकुण किती नळजोडणी खंडीत केली त्याचे पुर्ण नावे व पत्ते व त्याचेकडील २००७ मार्चअखेरची थकबाकी किती आहे.

७) नगर परिषदेत १.४.२००६ पासून दि. १७.२.२००७ पर्यंत पिण्याचे पाण्यासाठी नळजोडणी दिली असेल तर दि. व वसुल रकमेची पावती क्रमांक व दिनांकासह द्यावी.

८) नगर परिषद,सिल्लोड पिण्याचे पाण्याचा पुरवठा दररोज न करता एक दिवस आड पाणी पुरवठा करण्याचे ठरावाची छायांकित सत्यप्रत देणे व कोणत्या दिनांकापासुन, वर्षापासून एक दिवस आड पाणी देण्यास सुरु केले आहे.

९) नगर परिषद सिल्लोड यांचेकडे वर्षनिहाय पाणीपट्टीची वसुल झालेली रक्कम किती व पाणीपुरवठा करण्यासाठी आलेले सर्व खर्च किती व केव्हा करण्यात आला हे वर्षनिहाय तपशिलवार माहिती देणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क रु. १५५८२/- इतके, त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. सदर पत्र अपिलार्थीस दि. १६.३.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये आज कबूल केले.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राद्वारे त्यांना मागणी केल्याप्रमाणे माहिती न मिळाल्याने व सदर पत्रात अपिलार्थीच्या मते चुकीची फी आकारली गेली असल्यामुळे, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या

तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ७.४.२००७ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.४.२००७ व ११.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या अपिल अर्जासंदर्भात आपले आदेश दि. १५.५.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपिल मान्य करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेले दि. १४.३.२००७ रोजीचे पत्र रद्द केले आहे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्रतिपृष्ठ रु. २/- नुसार शुल्क आकारुन ती अपिलार्थीस देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. ७.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या कळवून अपिलार्थीस परत त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण रु. १५५८२/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याच्या सूचना केल्या. तथापि अपिलार्थीने त्या प्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीअन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.६.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जामध्ये ज्या तक्त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मागविली आहे त्या तक्त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन दिल्यास त्याची फी देण्यास ते तयार आहेत.

आज जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये म्हटल्याप्रमाणे कोणताही तक्त्याचा नमुना त्यांचे प्रथम अर्जासोबत पाठविला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जानुसार त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १५५८२/- भरण्यासाठी दि. १४.३.२००७ रोजी पत्र पाठविले होते, तथापि ते अपिलार्थीने स्वीकारण्यास नकार दिल्याने त्यांना सदरचे पत्र रजिस्टर्ड पोस्टाने

पाठविले. अपिलार्थीने माहितीची मागणी ज्या तक्त्याच्या स्वरुपात केली आहे, ते तक्ते जन माहिती अधिकारी यांनी दाखविले असता त्यांनी अपिलार्थीस या तक्त्याच्या स्वरुपात माहिती द्यावयाची झाल्यास त्यासाठी त्यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागेल, असे आयोगासमोर स्पष्ट केले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे वेगळया स्वरुपात उपलब्ध असून ती माहिती पुरविण्यासाठी ते तयार आहेत. सदर माहिती अपिलार्थीस दिल्यास त्यांचा तक्त्याचा आग्रह कायम राहणार का, असे अपिलार्थीस विचारले असता अपिलार्थीने त्यास होकारार्थी उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये पुढे असेही प्रतिपादन केले की, अपिलार्थीने सदर माहिती त्यांचे कार्यालयाचा केवळ वेळ वाया घालविण्यासाठी मागितली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. ७.४.२००७ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर त्यांनी आपले आदेश दि. १५.५.२००७ रोजी पारित केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे प्रथम माहितीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड प्रमाणात असून अपिलार्थीस सदर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना, त्यांचेकडील कार्यालयीन मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे, हा युक्तीवाद आयोग मान्य करीत आहे. याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी काही रक्कम भरावी लागेल, याची स्पष्ट कल्पना अपिलार्थीस दिलेली आहे. किंबहुना ही रक्कम पाहूनच अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांचेकडे, त्यांना आवश्यक असलेली माहिती विशिष्ट तक्त्यात भरुन मागत आहेत. जेणेकरुन माहितीची पृष्ठ संख्या कमी होईल. येथे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दाखविली

नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १५.५.२००७ रोजीच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ७.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या प्रस्तावित माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठीचा प्रतिपृष्ठ दर देखिल कळविला आहे. एवढे असूनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करणे पसंत केले. आजही अपिलार्थी, त्यांना विशिष्ट तक्त्यामध्येच माहिती हवी असल्याचा आग्रह करीत आहेत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक तक्त्यामध्ये माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांचे कार्यालयातील साधनसामग्री व मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागणार असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे व अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती पोटीचे शुल्क भरण्यास या प्रकरणातील कोणत्याही टप्प्यावर तयार नाहीत असे दिसून येत आहे. या प्रकरणी या टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांची भूमिका स्पष्ट करणे अवश्य आहे, असे आयोगास वाटते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांची भूमिका माहिती, अभिलेखे इ. कागदपत्रे जतन करुन ठेवणाऱ्या विश्वस्ताची आहे. अर्जदाराकरिता त्यांनी मागितलेल्या तक्त्यांमध्ये जन माहिती अधिकारी यांनी नव्याने माहिती उपलब्ध करुन देणे वा तयार करुन देणे येथे अभिप्रेत नाही.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ३०.०४.२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी,प्लॉट नं. २४०, सद्‌गुरु निवास,टिळकनगर, सिल्लोड, जि.औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती